
महाराष्ट्राचे
शिल्पकार

# वसंतराव नाईक



३

उत्तम रुद्रवार

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# वसंतराव नाईक

## कृषि-औद्योगिक क्रांतीचे प्रणेते

डॉ. उत्तम रूद्रवार

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : जुलै २००४
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. २४

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४ ५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : रु. ३५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे, अशा व्यक्तींची साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती ''महाराष्ट्राचे शिल्पकार'' या योजनेअंतर्गत पुस्तकरुपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील ''वसंतराव नाईक'' हा चोविसावा चरित्रग्रंथ आहे.

वसंतराव नाईक हे सलग अकरा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर एवढ्या प्रदीर्घ काळापर्यंत मुख्यमंत्री पद भूषविणारे ते एकमेव मुख्यमंत्री होते.

वसंतराव नाईक हे सलग अकरा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते म्हणून त्यांचा या चरित्रग्रंथमालिकेत समावेश करण्यात आलेला नसून एका वेगळ्या कारणासाठी त्यांचा या चरित्रग्रंथमालिकेत समावेश करण्यात आलेला आहे.

''शेत जमिनीची किमान धारणा कितीही कमी ठेवा; परंतु सामान्य शेतकऱ्यांच्या राहणीमानाची पातळी कुठल्या कर्मचाऱ्यांच्या पातळीवर तुम्ही ठरविणार आहात, याचा निर्णय अगोदर घ्या. शासनाच्या दरबारातील सचिव, सहसचिव, सहाय्यक सचिव, कक्ष अधिकारी, लिपीक की चपराशी? यापैकी कुठल्या पातळीवर तुम्ही शेतकऱ्याचे जीवनमान ठेवू इच्छिता?''

असा एक प्रश्न त्यांनी कृषीतज्ञांच्या परिषदेत एकदा विचारलेला होता. शेतकऱ्यांच्या वास्तव स्थितीचे त्यांना नेमके किती आणि कसे भान होते हे त्यांनी विचारलेल्या प्रश्नातून प्रत्ययाला येतो.

शेतकरी हा कारखानदार व्हायला हवा, असे त्यांना प्रकर्षाने वाटत असे. शेतीला उद्योगधंद्याची जोड दिली तरच शेती हा फायदेशीर व्यवसाय ठरू शकतो; यावर त्यांची निष्ठा होती. या निष्ठेतूनच त्यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात योजना आखल्या आणि कार्यान्वित केल्या.

''आमदार, खासदार, उपमंत्री, मंत्री व मुख्यमंत्री असा त्यांचा राजकीय कर्तृत्वाचा आलेख अभिनंदनीय आणि कौतुकास्पद आहे. तथापि नाईकसाहेब रमले मात्र शेतीत. शेती आणि शेतकरी हा त्यांचा आत्यंतिक जिव्हाळ्याचा विषय होता. धरतीच्या कणाकणातून समृद्धी फुलली पाहिजे, हा त्यांचा उत्कट ध्यास होता. काळ्या मातीचे हिरवे स्वप्न साकार करणारा हा खरा भूमिपुत्र होता.''

''शेती यंत्राने आणि तंत्राने होणार नाही, आणि मंत्रानेही होणार नाही. शेतीत गाडून घेतल्याशिवाय ती फुलत नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीत मी बसलेला असलो तरीदेखील मी शेतीच्या बांधावर बसलेला आहे.''

शेतीच्या बांधावर बसलेल्या महाराष्ट्राच्या या मुख्यमंत्र्यांचा हा चरित्रग्रंथ मराठीच्या वाचकांना आवडेल असा मला विश्वास आहे.

**रा. रं. बोराडे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई
दिनांक : ८ जुलै, २००४

## पुसद नगरी

यवतमाळ जिल्ह्यातील पुसद हे आडवळणाचे गाव. गावाला चारही बाजुंनी घाट. वाशीम मार्गावर खंडाळ्याचा प्रसिद्ध घाट. नागपूर रस्त्यावर धुंदी-घाटोडीचा घाट. खरं तर धुंदी-घाटोडी म्हणजे धुंद-घाटवाडी. वळणा-वळणाचा रस्ता आणि घनदाट जंगल. तर माहूर रस्त्यावर धनोड्याचा घाट. अशी पार्श्वभूमी लाभलेल्या पुसद गावाची रचना द्रोणासारखी खोलगट अशी आहे. आणि म्हणूनच कदाचित, येथील उन्हाळा अतिशय कडक, जणू वैशाख वणवा म्हटलं तरी चालेल. आणि हिवाळ्यात कडाक्याची थंडी. उन्हाळ्यात तापमानाचा सबंध देशात कधी उचांक तर हिवाळ्यात तापमानाचा कधी निचांक. उन्हाळा आणि हिवाळा या दोन परस्पर विरोधी हवामानात शेवटचे टोक गाठणाऱ्या या गावाची भौगोलिक रचना तशी वाईटच. महाराष्ट्राची उपराजधानी आणि विदर्भातील सगळ्यात महत्त्वाचे आणि मोठे शहर असलेले नागपूर पुसदपासून सुमारे २६० कि.मी. अंतरावर, जिल्ह्याचे ठिकाण असलेले यवतमाळ ११० कि.मी. अंतरावर तर पश्चिम विदर्भाचे (यवतमाळ, अकोला, अमरावती, वाशीम आणि बुलढाणा जिल्हे) महसूल विभागीय केंद्र असलेले अमरावती हे शहर १६० कि.मी. अंतरावर. विदर्भ-मराठवाड्याला जोडणाऱ्या आणि मराठवाड्याची सांस्कृतिक राजधानी असलेले नांदेड हे शहर १२० कि.मी. अंतरावर असे हे दूरस्थ गाव. भूगोल वाईट पण इतिहास अतिशय उज्ज्वल. भारतीय असंतोषाचे जनक कै. लोकमान्य टिळक १२ फेब्रुवारी १९१८ रोजी पुसदला येऊन गेलेत. पुसनदीच्या पात्रात त्यांची मोठी जंगी, जाहीर सभा त्या काळात झाली. त्यांच्या सभेला देशप्रेमाने भारलेला विशाल जनसागर त्यावेळी लोटला. ते पाहून 'स्वराज्याची पंढरी' या शब्दात त्यांनी पुसदचा गौरवपूर्ण उल्लेख केला. केसरीतून प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या दौऱ्याच्या वृत्तांतात याचा स्पष्टपणे निर्देश

आहे. महापुरुष द्रष्टे असतात, क्रांतदर्शी असतात; याचा सुखद प्रत्यय पुढील काळात पुसदच्या जनतेला आणि महाराष्ट्राला आला. लोकमान्यांनी गौरविलेली ही नगरी पुढील काळात खरंच महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू ठरली. आणि लोकमान्यांची उक्ती किती सार्थ होती हे प्रत्ययाला आले.

## कौटुंबिक पार्श्वभूमी

जुन्या पुसद तालुक्यात उमरखेड, महागाव या तालुक्यांचा सहभाग होता. ग्रामीण भागात, एकूणच परिसरात बंजारा समाजाची मोठी वस्ती. बंजारा बहुल असाच हा परिसर. बोली भाषेत बंजाऱ्यांना लमाण असे म्हणतात. पूर्वी जीवनावश्यक वस्तू असलेले लवण (मीठ) याचा हे लमाण व्यापार करीत असत. लदेनी (वाहून नेणे) यावरून लमाण हा शब्द प्रयोग रूढ झाला असावा असे वाटते. विदर्भ-मराठवाडा-आंध्र प्रदेश-कर्नाटक-राजस्थान-बिहार जवळ-जवळ देशभरात हा समाज पसरलेला आहे. जवळ-जवळ ४ कोटीच्यावर सबंध देशात त्यांची लोकसंख्या असेल. 'गोरमाटी' ही त्यांची स्वतंत्र अशी बोली भाषा. मारवाडी बोलीशी जवळीक असणारी. या दोन्ही बोलीत खूपच साम्य व सादृश्य. व्यापाराच्या निमित्तानं एकाठिकाणी राहून स्थिरपद झाला तो मारवाडी व्यापारी. आणि व्यापाराच्याच निमित्तानं परंतु आपल्या कुटुंब-कबिल्यासह बाहेर पडलेला विमुक्त भटका असा हा समाज म्हणजे बंजारा. असे म्हटल्यास ते चुकीचे ठरू नये. पुसदपासून सुमारे २० कि.मी. अंतरावर असलेल्या 'गहुली' या छोट्याशा खेडेगावी आपला चरित्र नायक वसंतराव नाईक यांचा जन्म बंजारा समाजाचे नायक, तांडा प्रमुख कै. फुलसिंग नाईक यांच्या पोटी १ जुलै १९१३ रोजी झाला. फुलसिंग नाईकांचे वडील चतुरसिंग नाईक यांनी हे गाव वसविले. वसंतरावांच्या आईचे नाव 'हुणकाबाई'. त्यांचे आरंभीचे नाव 'हाजुसिंग'. उपनाव राठोड. पुढे विद्यालयीन जीवनात हाजुसिंगचे वसंतराव आणि वडिलांच्या नायकत्वामुळे नाईक हे नाव रूढ झाले. फुलसिंग नाईकांना लोक 'बापू' म्हणत. वसंतरावांपेक्षा मोठे असलेले राजुसिंग हे आणखी एक पुत्र त्यांना होते. घरातील मंडळी त्यांना 'मोठे बाबा' व वसंतरावांना 'छोटे बाबा' म्हणत. बंजारा समाजाची गावामध्ये स्वतंत्र वसाहत असे. त्यांना तांडा म्हणतात. तांडा म्हणजे टोळी, कळप. बंजारा समाजातील व्यक्तींच्या विशेष नावात 'सिंग' हा जो शब्द आहे तो सिंह या शब्दाचा अपभ्रंश आहे. राजस्थानातील व्यक्तींच्या नावात जसा सिंह शब्द असतो तसाच हा प्रकार. शेती

आणि शेजमजुरी हा बंजारा समाजाचा व्यवसाय. तसा हा समाज मागासलेलाच. दरिद्री, शिक्षणाची ज्ञानकिरणे तांड्यातल्या झोपडीपर्यंत कधी न शिरलेली. तांड्याच्या रूपानं छोटीशी वसाहत. या मागासलेल्या अवस्थेतील आपल्या समाजाला शेती करायला फुलसिंग नाईकांनी प्रवृत्त केले. शेती व्यवसायामुळे त्यांच्या भटकंतीला पुष्कळच विराम लाभला. एक स्थिरपद जीवन त्यांना प्राप्त झाले. स्वत: फुलसिंग नाईक बंजारा समाजातील त्या काळातील एक सधन शेतकरी होते. प्राथमिक शिक्षणासाठी मात्र वसंतरावांना खूपच भटकंती करावी लागली. कधी पोहरादेवी, कधी भोजला, कधी उमरी, कधी बान्सी तर कधी विठोली. त्यानंतर नाईकसाहेब डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी स्थापन केलेल्या शिवाजी शिक्षण संस्थेच्या अमरावती येथील शिवाजी विद्यालयात शिकत होते. त्या काळातील एक आठवण अतिशय उद्‌बोधक आहे. जुन्या पुसद तालुक्यातील उमरखेड भागातील रहिवासी आणि तेथील पंचायत समितीचे माजी सभापती कै. सखाराम धावजी मुडे ऊर्फ मुडे गुरुजी. हे नाईकसाहेबांच्या बंजारा समाजातील जुन्या पिढीतील एक सामाजिक कार्यकर्ते. ते शिक्षणाच्या निमित्ताने अमरावती येथे वास्तव्याला गेले होते. त्यांनी सांगितलेली ही आठवण-

१९३०-३१ चा तो काळ. प्राथमिक शिक्षकांसाठी आवश्यक असणारे एक प्रशिक्षण घेण्यासाठी मुडे गुरुजी अमरावती येथे होते. वलगाव रोडवर त्यांचे वसतिगृह व प्रशिक्षण केंद्र होते. आपल्याच परिसरातील आपल्याच जातीचा एक मुलगा अमरावती येथे शिकत आहे असे पाहून मुडे गुरुजींना नाईकसाहेबांना भेटण्याची इच्छा झाली. शोध घेत शिवाजी विद्यालयाच्या वसतिगृहात ते गेले. ताटव्यांनी बांधलेले ते साधे वसतिगृह होते. बंजारा समाजातील सधन कुटुंबातील हा मुलगा शिक्षणाच्या हेतूने एका साध्या वसतिगृहात राहतो आहे, हे पाहून त्यांना आश्चर्य आणि आनंद वाटला. सामान्यत: बाहेरगावी शिकायला गेलेले विद्यार्थी विवंचनेत असतात. आणि त्यातील मध्यमवर्गीय-गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांची तर महिन्याला तोंड मिळवणी करताना मोठी दमछाक होते. नाईकसाहेब त्या काळात आपल्याच जातीच्या अडचणीत असलेल्या मुडे गुरुजींना मदत करीत असतच. तथापि आपल्या मित्र परिवारातील इतर जातीतील विद्यार्थ्यांनाही प्रसंग विशेषी मदत करुन सहकार्याचा हात ते पुढे करीत. विद्यार्थिदशेतच नाईकसाहेबांच्या ठिकाणी असलेल्या या औदार्याचा प्रत्यय त्यावेळी त्यांच्या अनेक सहाध्यायी गरीब होतकरू मित्रांना आला. या मित्र मंडळीच्या अनौपचारिक गप्पांमध्ये नाईकसाहेब शैक्षणिक-

सामाजिक आदी विषयांवर बोलत. त्यातून सामाजिक कार्याबद्दल त्यांना वाटणारी आवड, समाज सुधारणेबद्दल त्यांच्या मनात निर्माण झालेली जाण आणि वृत्तीचा पुरोगामीपणा दृष्टोत्पत्तीस येतो. म. गांधींच्या अर्थशास्त्रीय विश्वकल्पनेचे मूळ त्यांच्या या वृत्तीत होते. हा मुडे गुरुजींचा अभिप्राय यथार्थ आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून नागपूरच्या नीलसिटी हायस्कूलमधून त्यांनी मॅट्रिकची परीक्षा १९३३ मध्ये उत्तीर्ण केली. आणि जुन्या मॉरिस कॉलेजमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. आता त्यांचेच नाव त्या महाविद्यालयाला देण्यात आले असून 'वसंतराव नाईक समाज विज्ञान संस्था' असे आता नामकरण करण्यात आले आहे. त्या महाविद्यालयातून त्यांनी बी.ए.ची परीक्षा १९३७ मध्ये चांगल्या तऱ्हेने उत्तीर्ण केली. वसंतरावांचे व्यक्तिमत्व अतिशय राजस. महाविद्यालयीन जीवनात नागपूरच्या प्रतिष्ठित घाटे घराण्यातील वत्सलाबाई या रूपवान तरुणीशी त्यांचा परिचय झाला. परिचयाचे रुपांतर प्रेमात आणि प्रेमाचे रुपांतर विवाहात झाले. दि. ६ जुलै १९४१ रोजी संपन्न झालेल्या या विवाहात वधू वत्सलाबाई ब्राह्मण या उच्चवर्णीय जातीतील तर वर वसंतराव बंजारासारख्या भटक्या विमुक्त जमातीतील होते. या विवाहाला दोन्ही बाजुकडून प्रखर विरोध झाला. तथापि वसंतरावांच्या समंजस, पुरोगामी आणि उमद्या व्यक्तिमत्वाने विरोधाची धार बोथट झाली. आणि हे शुभमंगल पार पडले. तत्पूर्वी १९४० साली नागपूर विद्यापीठाच्या विधी महाविद्यालयातून वसंतरावांनी एल.एल.बी.ची पदवी परीक्षा उत्तीर्ण केली होती. विदर्भातील प्रख्यात वकील आणि पुढे केंद्रीय कृषिमंत्री बनलेले डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या समवेत अमरावती येथे आणि पुढे पुसद येथे त्यांनी वकिलीच्या व्यवसायाला आरंभ केला. त्यावेळी येथील काँग्रेस पक्षाचे प्रभावशाली नेते कै. गोधाजीराव ऊर्फ बाबासाहेब मुखरे यांच्याशी वसंतरावांचा परिचय झाला. पुढे परिचय गाढ मैत्रीत रुपांतरित झाला.

वसंतराव नाईकसाहेबांनी वकिलीची सनद प्राप्त करून घेऊन पुसदला वकिली सुरू केल्यानंतर सामाजिक कार्यात रस घेऊन ग्राम सुधारणा करण्याच्या कामात त्यांनी लक्ष घातले. समाज शिक्षणाच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना प्रशस्तीपत्रही प्राप्त झाले. ९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईला भरलेल्या अ.भा. काँग्रेसच्या अधिवेशनाला श्री. मुखरे यांच्या समवेत ते मुद्दाम गेले. त्यांच्याच प्रयत्नाने वसंतरावांचा काँग्रेस पक्षात, पर्यायाने राजकारणात प्रवेश झाला. नखशिखांत शस्त्रसज्ज असलेल्या आणि आपल्या साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नाही अशी

शेखी मिरविणाऱ्या बलाढ्य ब्रिटीश साम्राज्यशाहीला अव्यभिचारी राष्ट्रनिष्ठेचे प्रात:स्मरणीय वंदनीय नेते म. गांधी यांनी ९ ऑगस्ट १९४२ च्या याच सभेत जो 'चले जाव'चा नारा दिला त्या घटनेचा, गांधीजींच्या लोकोत्तर व्यक्तिमत्वाचा आणि त्यांच्या विचारांचा नाईकसाहेबांवर मोठा प्रभाव पडला. पुसदला परतल्यानंतर काँग्रेसच्या कार्यात रुची घेऊन ते राजकीय-सामाजिक कार्य करू लागले. त्याच्या क्रियाशीलतेमुळे १९४३ साली ते पुसद तालुका काँग्रेस समितीचे अध्यक्ष बनले. जवळ-जवळ सात वर्षे ते या पदावर कार्यरत होते. स्थानिक राजकारणात प्रविष्ट झाल्यानंतर बाबासाहेब मुखरे, डॉ. भगवानसिंग काकण, डॉ. द. शं. सरनाईक, देवराव पाटील चोंढीकर आदी मित्रांच्या मदतीने पंचक्रोशीतील जवळ-जवळ बारा खेड्यांचा त्यांनी चेहराच बदलून टाकला. गावात नवीन रस्ते तयार करून ते रस्ते पुसदला जोडले. यानिमित्तानं खेडी पुसदच्या संपर्कात आलीत. या गावांमध्ये गहुली, चोंढी, बान्सी, मुंगशी व पिंपळखुटा या गावांचा समावेश होता. त्या काळातील दलित समाजातील एक क्रियाशील कार्यकर्ते श्री. दौलतराव ऊर्फ अण्णासाहेब खडसे यांना त्यांनी मुद्दाम पुसदला आणले. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी लोकहित विद्यालय आणि वसतिगृह श्री. खडसे यांनी पुसद येथे सुरू केले. आरंभीच्या काळात नाईकसाहेबच त्या संस्थेचे अध्यक्ष होते. आज या संस्थेचा खूप मोठा विस्तार झालेला आहे. पुढे अण्णासाहेब आमदार झाले. 'दलित मित्र' या उपाधीने त्यांचा यथोचित गौरवही झाला. त्याकाळात त्यांना नाईकसाहेबांनी या विधायक कामात मोठी साथ केली.

## लोकप्रिय नगराध्यक्ष

१९४६ साली आपल्या सहकारी मित्रांच्या सहकार्याने पुसद नगर परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. नाईकसाहेबांच्या सार्वजनिक कार्याला खऱ्याअर्थाने येथूनच सुरुवात झाली. नगराध्यक्ष म्हणून ते अतिशय लोकप्रिय राहिले. त्यांनी आपल्या नि:पक्षपातीपणाचा प्रत्यय आणून दिला. 'बापू बालक मंदिर' या नावाची पूर्व प्राथमिक शाळा त्यांनी पुसद येथे सुरू केली. आजही ती शाळा चांगल्या पद्धतीने कार्यरत आहे. शेतकऱ्यांच्या धान्याला बाजारपेठ प्राप्त करून देण्यासाठी धान्यगंज (ग्रेन मार्केट) शहराच्या मध्यभागी उभारले. आज महाराष्ट्रामध्ये पाणी टंचाईने उग्ररूप धारण केले आहे. पेयजलाची समस्या भीषण आहे. पुसद मात्र या समस्येला उज्ज्वल अपवाद आहे. पुसदची लोकसंख्या सुमारे ७५ हजार एवढी

आहे. आणखी एवढ्याच लोकसंख्येला पाणी पुरवठा करता येईल अशी जीवन प्राधिकरणाने व्यवस्था केलेली आहे. पण एकेकाळी पुसदला पाण्याचे मोठे दुर्भिक्ष्य होते. शहरात असलेल्या अनेक विहिरींना खारे पाणी होते. फार थोड्या विहिरी गोड पाण्याच्या होत्या. नाही तर मग नदीवर जाऊन पाणी आणावे लागत होते. बायकांचे मोठे हाल होत असत. नाईकसाहेब नगराध्यक्ष असताना पाणी योजना (वॉटर स्कीम) सुरू करण्यासाठी प्रयत्न केले गेले. पुढे त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्याच कार्यकाळात ही योजना कार्यान्वित झाली. नगर विकास करण्याच्या हेतूने नाईकसाहेबांनी शहराला लागून असलेला २४ एकरचा भाग नगर परिषदेसाठी ताब्यात घेतला. पुढे त्यातील सुयोग्य जागेवर चांगले बसस्थानक उभारण्यात आले.

## कौटुंबिक भावजीवन

राजकारण-समाजकारण आणि सार्वजनिक जीवनात दीर्घकाळ वास्तव्य करणाऱ्या राजकीय नेत्यांचे, समाजसेवेचे आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे कौटुंबिक भावजीवन जनतेला अज्ञात असते. एखाद्या दुसऱ्या सार्वजनिक प्रसंगातून त्याचे अस्पष्ट असे दर्शन किंवा त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितलेल्या काही आठवणीतून हे भावजीवन जनतेला ज्ञात होते.

६ जुलै १९४१ रोजी नाईकसाहेबांशी नोंदणी पद्धतीने विवाहबद्ध झालेल्या वत्सलाबाई (पूर्वाश्रमीच्या वत्सला घाटे) यांनी सांगितलेल्या काही आठवणी हृद्य आणि भावोत्कट आहेत. श्रीमती वत्सलाबाईंच्या शब्दात 'वसंतराव नाईक' ह्या आपल्या लेखात त्या म्हणतात, ''वसंतरावांच्या दिलखुलास स्वभावाचे आकर्षण वाटून मी त्यास 'होकार' दिला असावा. एवढे खरे! त्याकाळी मिश्रविवाहांचे प्रमाण आजच्या एवढे नव्हते, त्यामुळे आपल्या विवाहाने तेव्हा खळबळ उडाली असणे साहजिकच आहे. पण आम्हाला, निदान मला तरी त्याचा उपद्रव झाला नाही. माझी आई एवढेच म्हणाली, ''वसंतराव ब्राह्मण असते तर त्यांना मी माझी कन्या दिलीच असती ना!'' जाती-पातीपासून माणसांचा उच्चनीचपणा मोजायची सवय घाटे कुटुंबीयांस कधीच नव्हती. पण यात खरी हिंमत होती वसंतरावांची. पुसदला त्यांच्या घरी व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेला तोंड देण्याचे कार्य त्यांना करावे लागले.''

हे घाटे कुटुंब मुळचे अकोल्याचे, मुलांच्या शिक्षणाच्या निमित्ताने गंगाधरराव उपाख्य तात्यासाहेब व त्यांच्या पत्नी मधुबाई हे नागपूरला वास्तव्याला आलेत. तात्यासाहेब हे अकोल्याचे नामवंत आणि निष्णात वकील होते. त्यांना एकूण आठ

अपत्ये. सहा मुले आणि दोन मुली. सर्वांत थोरले के. जी. घाटे हे सत्र न्यायाधीश होऊन पुढे निवृत्त झाले. दुसरे बी.जी. घाटे हे पोलीस खात्यात महासंचालक पदापर्यंत जाऊन निवृत्त झाले. तिसरे डॉ. छोटू घाटे हे प्रशासकीय सेवेमध्ये आय.ए.एस. अधिकारी होते. त्यानंतरच्या वत्सलाबाई. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले. आपल्या शिक्षणाचा लाभ समाजाला झाला पाहिजे. आपणाला जशी शिक्षणाची संधी मिळाली तशी इतर मुलींनाही मिळाली पाहिजे. आणि म्हणून आपल्या मोठ्या भावांचा विरोध असतानाही त्याला विश्वासात घेऊन आपली भूमिका समंजसपणे सांगून मध्यप्रदेशातील नरसिंगपूर ह्या गावी त्यांनी काही काळ शिक्षिकेची नोकरी केली. शाळेत शिक्षकांच्या ऐवजी शिक्षिका असेल तर मुली शिक्षण घ्यायला अधिक रस घेतात. ही त्यांची भूमिका खरोखरच विचार करण्यासारखी आहे. १९३९-४० साली नोकरी करीत असलेल्या त्यांच्या नरसिंगपूर येथील शाळेतील ७ मुली मॅट्रिकच्या परीक्षेला बसल्यात, आता त्या घटनेचे कोणाला काही विशेष वाटणार नाही. पण त्या काळामध्ये मात्र ही घटना क्रांतिकारीच मानली पाहिजे. विवाह झाल्यानंतर वसंतराव सपत्नीक पुसदला वास्तव्याला आलेत आणि पुसद येथे राहू लागले. वकिलीच्या व्यवसायात त्यांचा चांगला जम बसला. मूळच्या सधन असलेल्या आणि वकिलीत खूप पैसा मिळाल्यामुळे माहेरी जशी श्रीमंती तशीच सासरीदेखील ऐश्वर्य आणि वैभव नांदत होते. ''पुसदचे आमचे तेव्हाचे जीवन किती सुखाचे होते! वकिलीत त्यांना खूप पैसा मिळायचा आणि स्वभावही तसाच खर्चिक... उत्तमोत्तम वस्तू खरेदी करण्याची अनावर हौस !! घरी फर्निचर खूप, नोकर-चाकरही भरपूर. खूप मेहनत करून पैसा मिळवावा आणि रसिकतेने त्याचा उपभोग घ्यावा. हा वसंतरावांचा स्वभाव.'' असे खुद्द वत्सलाबाई सांगतात.

वसंतराव वृत्तीने रसिक, हौशी आणि समाजात मिळून-मिसळून वागणारे असल्यामुळे, खेरीज राजकीय जीवनात वावर असल्यामुळे त्यांचा वकिलीच्या व्यवसायात लवकरच जम बसला. या व्यवसायात त्यांनी बऱ्यापैकी पैसा कमविला. पैशाच्या श्रीमंतीबरोबर अंतःकरणाची श्रीमंतीची त्यांना लाभली होती. आयुष्यभर सावलीसारखी साथ केलेल्या श्रीमती वत्सलाबाई यांनी त्यांच्या गुण वैशिष्ट्यांचे मोठे सुरेख वर्णन केले आहे. ''वृत्तीमध्ये हौशीपण असल्यामुळे ते मोठे सढळ हाताने खर्च करीत. जीवन आनंदाने आणि रसिकतेने उपभोगावे असे त्यांना वाटे. फोटोग्राफी, पिकनिक, गप्पा-गोष्टी आणि पत्ते हे त्यांचे छंद होते. पूर्वायुष्यात

वसंतराव आपल्या कुटुंबीयांसमवेत खूप वेळा पिकनिकला गेले होते. उन्हाळ्याच्या दिवसात कोर्टाला सुटी असली की, ते कुटुंब-कबिल्यासह प्रवासाला निघत. भारतातील सर्व प्रेक्षणीय स्थळे त्यांनी आवर्जून पाहिली होती. पुढे मंत्री, मुख्यमंत्री झाल्यानंतरही आपल्या कुटुंबीयांसमवेत ते पत्ते खेळीत. 'स्वीप'नावाचा पत्याचा खेळ त्यांच्या विशेष आवडीचा होता. बुद्धीबळातही त्यांची चांगली गती होती. उत्तम पोषाख करण्यात त्यांना मोठा आनंद वाटे. भारीचे कापड, निष्णात शिंप्याकडून चांगली केलेली शिलाई यावर त्यांचा कटाक्ष राहत असे.'' १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत सहभागी झाल्यानंतर त्यांनी खादी वापरायला सुरुवात केली होती. पण खादीच्या कपड्यातही त्यांचे राजबिंडे व्यक्तिमत्व उठून दिसत असे. आपल्या पत्नीसाठी, मुलांसाठी आठवण ठेवून मुद्दाम हौशीने ते उत्तमोत्तम पोशाख बाहेरगावी गेले म्हणजे घेऊन येत असत. वसंतरावांना एकूण तीन अपत्ये. मोठी 'अरूंधती' नावाची मुलगी. तिला ते बेबी म्हणत. दुसरे अविनाश आणि तिसरे निरंजन. त्यांच्या मोठ्या मुलीचे अकाली निधन झाले. ती अतिशय बुद्धिमान आणि कवी अंत:करणाची मुलगी होती. तिच्या दु:खद निधनाने नाईकसाहेबांच्या भावविश्वाला मोठा धक्का बसला होता. या दारूण दु:खाचा आघात मोठ्या धीर-गंभीरपणे त्यांनी सहन केला. अविनाश नाईक तर आता हुबेहूब नाईकसाहेबांसारखेच दिसतात. ते काही काळ आमदार आणि महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री होते. सध्या ते मुंबई येथील 'वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण प्रतिष्ठान' या संस्थेचे अध्यक्ष आहेत. शिकारीचाही नाईकसाहेबांना मोठा शौक होता. घनदाट जंगलात जाऊन सावज हेरण्यात, त्याची शिकार करण्यात त्यांना मोठे रोमांचकारी अनुभव आले होते. 'वन्य प्राण्यांना संरक्षण' या धोरणात्मक निर्णयामुळे त्यांचा हा शौक पुढे बंद झाला. वसंतरावांचे राजकीय उत्तराधिकारी ठरलेल्या आणि पुढे महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविलेल्या सुधाकरराव नाईकांनादेखील शिकारीची मोठी आवड होती. काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केल्यानंतर १९५१ साली वसंतराव विदर्भ प्रदेश काँग्रेस समितीचे व तिच्या कार्यकारिणीचे सदस्य झाले.

वसंतरावांच्या निधनानंतर वत्सलाबाई व त्यांची मुले राजकारणाच्या धकाधकीपासून दूरच राहिलीत. मात्र मधल्या काळात राज्यपालांनी विधान परिषदेवर अविनाश नाईक यांना मनोनीत केले होते. शरद पवार यांच्या मंत्रिमंडळात काही काळ ते राज्यमंत्रीही राहिलेत. नाईकसाहेब अविनाश नाईकांना 'बाळू' म्हणत असत.

खूप जुनी आठवण आहे. जुहूला समुद्र किनाऱ्यावर अविनाश सहलीला गेले असता समुद्रामध्ये बुडणाऱ्या एका विद्यार्थ्याला त्यांनी धावत जाऊन वाचविले. त्यांच्या या धाडसाचे त्यावेळी मुंबईच्या जवळ-जवळ सर्वच वृत्तपत्रांनी कौतुक केले. त्याला पुरस्कारही मिळाले. निरंजनचीदेखील अशीच एक आठवण. यवतमाळ जिल्ह्यातील नाईकसाहेबांचे सहकारी राहिलेल्या आबासाहेब पारवेकरांनी सांगितली आहे- एकदा वसंतराव आणि सौ. वत्सलाबाई युरोपच्या दौऱ्यावर गेले असताना अविनाश प्रकृती दाखविण्याच्या निमित्ताने त्यावेळी त्यांनी त्यालाही सोबत घेतले होते. निरंजन मात्र एकटाच घरी थांबला होता. नाईकसाहेबांना पुसद परिसरात सर्वजण काका किंवा काकासाहेब म्हणत. त्यांचे पुतणे सुधाकरराव, मधुकरराव, मनोहरराव हे त्यांना काका म्हणत असल्यामुळे अविनाश आणि निरंजन देखील त्यांना काकाच म्हणत. युरोपच्या दौऱ्यावरून परत आल्यानंतर निरंजनने काकांना विचारले, ''काका मला कां बरं तुमच्या बरोबर लंडनला नेले नाही?'' त्यावर नाईकसाहेब म्हणाले, ''भारत सरकारच्या आणि पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री यांच्या परवानगीने मी परदेशात गेलो होतो. आणि लंडन येथे वैद्यकीय उपचारासाठी अविनाशला सोबत घेतले होते.'' अर्थातच या उत्तराने निरंजनचे समाधान झाले नाही. एकदा शास्त्रीजी काही कार्यक्रमानिमित्त मुंबईला आले असताना वत्सलाबाईंच्या समवेत असलेल्या निरंजनने समारंभ सुरू असताना शास्त्रीजींची भेट घेतली आणि अतिशय निरागसपणे त्याने शास्त्रीजींना विचारले, ''शास्त्रीजी आपण काकांना लंडनला पाठविता, आईला व दादालाही पाठविता मला का नाही पाठवत?'' यावर शास्त्रीजींना निरंजनच्या बोलण्याचा एकदम बोध झाला नाही. जवळच बसलेल्या वसंतरावांना आपला मुलगा शास्त्रीजींशी काही तरी बोलत आहे हे त्यांच्या लक्षात आले. जवळ जाताच लंडनला जाण्याची शास्त्रीजींजवळ परवानगी मागतो आहे. हे त्यांना कळाले. नाईकसाहेबांनी मागील सर्व वृत्तांत शास्त्रीजींना सांगितला. शास्त्रीजींनी निरंजनचा एक गोड पापा घेऊन त्याला दिल्लीच्या पत्त्यावर पत्र पाठवून परवानगी मागायला सांगितली आणि गंमत अशी की, निरंजनने खरेच शास्त्रीजींना पत्र पाठविले. त्यावर शास्त्रीजींनी त्याला उत्तर पाठविले. भारताचा लोहपुरुष असलेल्या शास्त्रीजींचे ते पत्र निरंजनने आपल्या संग्रहात जपून ठेवले. कोणत्याही कुटुंबवत्सल माणसांचे जीवन असावे असेच ते नाईकसाहेबांचे होते. राजकारणाच्या रखरखत्या वाळवंटातही कौटुंबिक जीवनातील ही हिरवळ त्यांचे विश्रांतीस्थान होते. कोणत्याही वडिलांचे असावे

असेच त्यांचे आपल्या मुलांवर-पुतण्यांवर निःसीम प्रेम होते. राजकारणात प्रसंग विशेषी कर्तव्य पूर्ततेच्या पोटी कठोर वागणारे नाईकसाहेब वृत्तीने भावनाशील होते; प्रेमळ होते.

वसंतरावांचे थोरले बंधू राजुसिंग नाईक यांना सर्व जण 'बाबासाहेब' म्हणत. त्यांच्या दोन पत्नी. प्रमिलाबाई आणि पार्वतीबाई. प्रमिलाबाईपासून त्यांना एक मुलगी तर पार्वतीबाईपासून सुधाकरराव, मधुकरराव आणि मनोहरराव ही तीन मुले आणि सहा मुली अशी अपत्ये झालीत. थोरले सुधाकरराव गहुलीच्या सरपंच पदापासून राज्याच्या मुख्यमंत्री पदापर्यंत व हिमाचल प्रदेशाच्या राज्यपाल पदापर्यंत जाऊन पोहचले. बाबासाहेबांचे ज्येष्ठ पुत्र या नात्याने त्यांना वसंतराव नाईकसाहेबांचा संजीवक सहवास दीर्घकाळ लाभला. या सहवासातून त्यांच्या राजकीय जीवनाची जडण-घडण झाली. मधले 'मधुकरराव' हे गहुली येथेच वास्तव्याला असून आपल्या कुटुंबाची शेती सांभाळतात. धाकटे मनोहरराव मा. श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या मंत्रिमंडळात जलसंधारण खात्याचे राज्यमंत्री आहेत. आणि राज्याच्या विधी मंडळात पुसद विधानसभा मतदार संघाचे ते प्रतिनिधीत्व करतात.

आपले थोरले बंधू बाबासाहेब नाईक यांच्याबद्दल नाईकसाहेबांना मोठा आदर होता. नाईकसाहेबांच्या प्रदीर्घ राजकीय जीवनात पुसदचे आणि यवतमाळ जिल्ह्याचे स्थानिक राजकारण बाबासाहेबांनी समर्थपणे सांभाळले. त्यांचा लोकसंग्रह अफाट होता.

## आमदार व राजस्व उपमंत्री

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५२ साली झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून नाईकसाहेबांना पुसद विधानसभा मतदार संघातून उमेदवारी प्राप्त झाली. त्यावेळी त्यांचे प्रमुख विरोधक होते सटवाराव नाईक. या निवडणुकीत ते चांगल्या मताधिक्याने निवडून आलेत. त्यांच्या अगोदर गोधाजीराव उपाख्य बाबासाहेब मुखरे पुसदचे आमदार होते. नाईकसाहेब निवडून आल्यानंतर पं. रविशंकर शुक्ल यांच्या मंत्रिमंडळात राजस्व खात्याचे उपमंत्री म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यांच्या या नियुक्तीसाठी यवतमाळ जिल्ह्यातील सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठे प्रयत्न केले. त्यावेळी विदर्भ मध्यप्रदेशात होता. त्याच काळात वसंतराव मध्यप्रदेशाच्या गृहनिर्माण मंडळाचेही अध्यक्ष होते. तसेच मध्य प्रदेशाच्या भूसुधारक समितीचे उपाध्यक्ष पदही त्यांनी भूषविले होते.

त्यावेळच्या मंत्री मंडळात विदर्भातील मा. सां. कन्नमवार, पी. के. देशमुख, रा. कृ. पाटील व ब्रिजलाल बियाणी आदी वैदर्भीय मंत्री होते. राजस्व खात्याचे मंत्री होते भगवंतराव मंडलोई. मात्र विदर्भातील महसूल खात्याशी संबंधित कोणताही प्रश्न आला की, मंडलोईसाहेब ते काम नाईकसाहेबांवर सोपवित. तेवढा त्यांचा नाईकसाहेबांवर विश्वास होता. नाईकसाहेबांच्या उपमुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात पूस नदीला पावसाळ्याच्या दिवसात मोठा पूर येत असे. पावसाळ्याच्या दिवसामध्ये हे पुराचे पाणी गावात घुसत असे. मोठी हानी होत असे. नाईकसाहेबांनी एक-दोनदा नदीच्या पात्रात बांध घालून पाहिला. परंतु पुराच्या लोंढ्यात तो बांध वाहून गेला. तेव्हा नदीच्या पात्रापासून काही अंतरावर पूर प्रतिबंधक बांध घालण्यात आला. पुराचे पाणी बांधाला अडत असे, परिणामतः मोठे संकट टळले. पुढे या बांधाला नाईकसाहेबांचे ज्येष्ठ मित्र आणि स्थानिक राजकारणातील जुन्या पिढीतील प्रभावशाली नेते बाबासाहेब मुखरे यांचे नाव देण्यात आले. यासाठी २ लाख ५८ हजार ५३२ रुपये त्यावेळी खर्च आला. आणि बांध २ हजार ८०० फूट लांब आणि दहा फूट रूंद आहे. हा बांध १९५६ साली झाला. त्यावेळी नाईकसाहेब उपमंत्री होते.

दळणवळणाच्या दृष्टीने यवतमाळ जिल्हा फार मागासलेला होता. पक्के असे रस्ते नव्हतेच. आंध्र प्रदेशाला जोडल्या गेलेला जो पांढरकवडा, पाटणबोरी, घाटंजी, मुकूटबन व चनाखा हा जो भाग आहे. आणि इकडे जुन्या पुसद तालुक्यातील मराठवाड्याला जोडलेले महागाव, ढाणकी-बिटरगाव आदी गावांना जोडणारे रस्ते तयार करण्याची योजना मध्यप्रदेश सरकारने हाती घेतली. जिल्ह्यात त्यांच्या उपमंत्रीपदाच्या काळात यवतमाळ जिल्ह्यात दोनदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. रस्ते निर्माण मोहीम हाती घेतल्यामुळे मजुरांना काम मिळाले आणि या कामातून रस्तेही निर्माण झाले. पुढे महाराष्ट्रात अभूतपूर्व दुष्काळ पडल्यानंतर रोजगार हमी योजना सुरू करण्यासाठी हा अनुभव नाईकसाहेबांच्या उपयोगाला आला. १९५६ साली पुसद तालुक्यात भीषण दुष्काळ पडला. त्यावेळेला ते आजारी होते. परंतु त्याही वेळी दुष्काळग्रस्त भागाचा दौरा काढून दुष्काळ निवारणाच्या कामासाठी सर्वतोपरी मदत केली. याच काळात यवतमाळ जिल्ह्यातील सर्व नद्या आणि मोठे नाले यांच्या माध्यमातून जलसिंचनाची योजना कार्यान्वित करण्याच्यादृष्टीने आवश्यक ती पाहणी करण्यात आली. पुढे पांढरकवडा तालुक्यात सायखेडा येथे व पुसद तालुक्यातील पूस नदीवर मोठे धरण उभारण्यात

आले. परिणामतः या परिसरातील जमीन ओलिताखाली येऊ शकली. १९५७ साली पुसद शहराचे विद्युतीकरण झाले. पाणी आणि वीज या दोन्ही महत्त्वाच्या बाबींची पूर्तता झाल्यामुळे पुसद शहराचा झपाट्याने विकास झाला. १ नोव्हेंबर १९५६ रोजी गुजरात आणि महाराष्ट्राचे मिळून विशाल द्विभाषिक राज्य निर्माण झाले. मध्यप्रदेशातून विदर्भ, मुंबई प्रांतातून पश्चिम महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशातून मराठवाडा बाहेर पडून गुजराथी आणि मराठी भाषिकांचे हे राज्य निर्माण झाले.

## सहकारमंत्री

नव्याने निर्माण झालेल्या द्विभाषिकात सहकारमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात त्यांची निवड झाली. मध्यप्रदेशात राजस्व उपमंत्री म्हणून यशस्वीरित्या कार्य केल्याबद्दल त्यांना जणू ही पदोन्नती देण्यात आली. अर्थात या पदावर ते काही महिनेच होते. १ नोव्हेंबर १९५६ ते १० एप्रिल १९५७ असा हा त्यांचा सहकारमंत्री पदाचा कार्यकाळ होता.

## कृषिमंत्री

१९५७ मध्ये परत सार्वत्रिक निवडणुका झाल्यात आणि पुसद मतदार संघातून १८ हजार मताधिक्याने नाईकसाहेब द्विभाषिकांच्या मुंबई विधानसभेवर निवडून आले. आणि ११ एप्रिल १९५७ रोजी कृषिमंत्री म्हणून त्यांचा शपथविधी झाला. ११ एप्रिल १९५७ ते ३० एप्रिल १९६० पर्यंत ते कृषिमंत्री होते. आपल्या स्वभावधर्माशी अनुरूप असे आवडीचे शेती खाते नाईकसाहेबांना मिळाले. या क्षेत्रातील त्यांची सूक्ष्म जाण, त्यांनी केलेले अलौकिक कार्य पाहून भारतासारख्या कृषिप्रधान देश असलेल्या चीन सरकारच्या निमंत्रणावरून १९५८ साली ते चीनला गेले. तेथून ते जपानला गेलेत. टोकियो येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय अन्न व शेती संघटनेच्या बैठकीला ते उपस्थित राहिले. चीन-जपानचा दौरा पूर्ण करून परतताना ते सिंगापूर आणि सिलोनलाही जाऊन आलेत. या सर्व दौऱ्यात शेती विषयक कामाची त्यांनी अतिशय बारकाईने पाहणी केली.

या भेटीत त्यांच्यासमवेत त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती वत्सलाबाई नाईक होत्या. सिंगापूर आणि कोलंबो येथे थांबून त्यांनी कापसावरील प्रक्रिया उद्योगाचा विशेषत्वाने अभ्यास केला. याच काळात 'इंडिया कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल फायनान्स' सोसायटीचे सभासद म्हणून त्यांची निवड झाली. १९५८ साली जपानला

गेलेल्या आंतरराष्ट्रीय राईस कमीशनच्या भारतीय शिष्टमंडळात त्यांचा आवर्जून समावेश करण्यात आला होता. महाराष्ट्राचे कृषिमंत्री असताना त्यांच्या भगीरथ प्रयत्नांमुळे यवतमाळ जिल्ह्यातून एक लाख ३७ हजार एकर जमीन भूदानात प्राप्त झाली होती. नवभारताचे शिल्पकार आणि पहिले पंतप्रधान पं. जवाहरलालजी नेहरू यवतमाळ येथे या निमित्ताने या संस्मरणीय कार्यक्रमाला उपस्थित होते. १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य निर्माण झाले. महाराष्ट्राचा अमृत कलश नवमहाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतरावजी चव्हाण यांनी पं. जवाहरलालजी नेहरू यांच्याकडून स्वीकारला. यशवंतरावजीच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. आणि त्यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळात त्यांचे निकटचे सहकारी म्हणून वसंतराव नाईक यांचा राजस्वमंत्री म्हणून समावेश झाला. यावेळी शासनाने महत्त्वपूर्ण असा शेत जमीन कमालधारणेचा निर्णय घेतला. 'सिलींगचा कायदा' म्हणून लोकात हा कायदा सुपरिचित झाला. 'कसेल त्याची जमीन' या सामाजिक तत्त्वावर आधारित कूळ कायद्यामुळे शेतावर राबणारे शेतमजूर शेलमालक झाले. महाराष्ट्र शासनाने घेतलेला हा क्रांतिकारी निर्णय होता. मूठभर जमीनदारांनी त्याला प्रखर विरोध केला. या निर्णयाविरुध्द या बड्या जमीनदारांनी न्यायालयातदेखील आव्हान दिले. तथापि न्यायालयातूनही त्यांच्या याचिका फेटाळल्या गेल्यात. शासनाने या निर्णयाची अत्यंत निर्धाराने अंमलबजावणी केली होती. शासनाच्या या महत्त्वपूर्ण कार्यातील नाईकसाहेबांचे योगदान फार मोठे होते. राजस्वमंत्री म्हणून नाईकसाहेबांनी महाराष्ट्र पंचायतराज कायद्याची मुहूर्तमेढ रोवली. सत्तेचे विकेंद्रीकरण करून जिल्हा परिषद, पंचायत समिती यांना व्यापक अधिकार दिले. त्यातूनच ग्रामीण नेतृत्व पुढे आकाराला आले. ग्रामीण भागाचा चेहरा-मोहरा बदलविण्यात या स्थानिक स्वराज्य संस्थांचा मोठा वाटा राहिला आहे. पंचायत राज्याचे शिल्पकार म्हणून नाईकसाहेबांचे हेही कार्य महत्त्वपूर्ण असे आहे. १ मे १९६० ते ४ डिसेंबर १९६३ हा त्यांचा राजस्व मंत्रीपदाचा कार्यकाळ राहिला.

## महाराष्ट्राचे मुख्यमंत्री

१९६२ साली चीनने भारतावर आक्रमण करून 'हिन्दी-चिनी भाई-भाई' या घोषवाक्याला सुरूंग लावला. भारत-चीन युद्धामध्ये भारताला नामुष्कीचा पराभव पत्करावा लागला. त्यावेळी संरक्षणमंत्री होते कृष्णमेनन. त्यांच्याविरुद्ध देशभरामध्ये मोठा असंतोष उफाळला. हा रेटा इतका वाढला की, जनतेच्या असंतोषापुढे

पं. नेहरू यांना मान तुकवावी लागली. संरक्षणमंत्री पदावरून मेनन यांना हटवून महाराष्ट्राचे कर्तबगार मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीला पाचारण करण्यात आले आणि संरक्षणमंत्री पदाची धुरा त्यांच्या समर्थ खांद्यावर सुपूर्द करण्यात आली. वर्तमानपत्रांनी या घटनेचे मोठे काव्यमय वर्णन केले. 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला' या शब्दात यशवंतरावांच्या नियुक्तीचा गौरव करण्यात आला. आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी ज्येष्ठमंत्री मा. सां. उपाख्य दादासाहेब कन्नमवार यांची निवड करण्यात आली. तथापि २४ नोव्हेंबर १९६३ रोजी कन्नमवारांचे आकस्मिक दु:खद निधन झाले. आणि ५ डिसेंबर १९६३ रोजी नाईकसाहेब महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. ५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५ म्हणजे अकरा वर्षाहून अधिक काळ ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची निर्मिती झाली. तेव्हापासून गेल्या ४३ वर्षांच्या सुदीर्घ कालखंडामध्ये इतके दीर्घकाळ मुख्यमंत्रीपद नाईकसाहेबांखेरीज कुणालाही विभूषित करता आले नाही. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील ही विक्रमी नोंद आहे. हा केवळ विक्रमच नाही तर नाईकसाहेबांची कारकीर्द म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणाचे 'सुवर्णयुग' म्हणता येईल. देशात अन्यत्र जे दीर्घकाळ मुख्यमंत्री राहिलेत त्यात राजस्थानचे माजी मुख्यमंत्री मोहनलाल सुखडिया आणि पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री ज्योती बसू आणि त्यानंतर तिसरा क्रमांक नाईकसाहेबांचाच लागतो. नवमहाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्याकडून चालत आलेला नेतृत्वाचा वारसा नाईकसाहेबांनी अधिक समृद्ध आणि संपन्न केला. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या वेळी यशवंतराव चव्हाण म्हणाले होते, ''हे राज्य मराठा असणार नाही, मराठी राज्य असेल.'' फुले-आंबेडकर-शाहू महाराजांची परंपरा सांगणाऱ्या या पुरोगामी राज्यात जात-धर्म-पंथ-पक्ष या माणसां-माणसांमध्ये उभ्या असणाऱ्या भिंती कोसळून पडतील. विदर्भ-मराठवाडा-पश्चिम महाराष्ट्र-कोकण-मुंबई-खानदेश या मराठी भाषिकांमध्ये भावनिक ऐक्य निर्माण होईल. हा विश्वास यशवंतरावजींच्या वरील उद्‌गारात प्रतिबिंबीत झालेला होता. आचार्य अत्रे गंमतीने आणि महाराष्ट्राबद्दलच्या अभिमानाने म्हणत, ''इतर प्रांतांना फक्त भूगोल आहे. महाराष्ट्राला इतिहास आहे.'' या उद्‌गारामध्ये प्रांतीय अभिनिवेश नव्हता. तर महाराष्ट्राबद्दलचा सार्थ अभिमान होता. नाईकसाहेबांनी हे सर्व ध्यानात घेऊन महाराष्ट्राची घडी नीट बसविली. १९७२ चा भीषण दुष्काळ, कोयना भूकंप या नैसर्गिक आपत्तीत विचलित न होता या अस्मानी आपत्तीला धैर्याने

तोंड देऊन महाराष्ट्राचा गाडा सुरळीतपणे चालविला. 'सीमा प्रश्न' महाराष्ट्रातील ज्वलंत व अस्मितेचा प्रश्न. डांग, बेळगांव, कारवार हा सीमावर्ती मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रात विलीन करण्यासाठी त्यांनी शर्थीचे प्रयत्न केले. कृष्णा-गोदावरीच्या पाणी वाटप प्रश्नावर केंद्र सरकारला योग्य ती जाणीव करून दिली. दारूबंदी शिथील करून विषाक्त दारू प्राशनामुळे होणारे मृत्यू टाळण्याचा प्रयत्न केला. तत्त्वाला व्यवहाराची सांगड घातली. राज्याला एक महसूल प्राप्त करून दिला. एकाधिकार कापूस खरेदी, रोजगार हमी योजना, ज्वारी, तांदूळ यासारखी धान्य खरेदी. महाराष्ट्र राज्य लॉटरी, मुंबईतील गर्दी कमी करण्यासाठी 'बॅक बे रिक्लमेशन योजना' इ. अनेक योजना-उपक्रम धडाडीने कार्यान्वीत केलेत. त्यांच्या कार्यकाळामध्ये महाराष्ट्रात काँग्रेसपक्षाची मोठ्या प्रमाणात पडझड झाली असतानाही महाराष्ट्रात विरोधीपक्षांना मात्र मोठे यश संपादन करता आले नाही. १९७२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत लोकसभेच्या ४४ च्या ४४ जागा नाईकसाहेबांनी आपल्या नेतृत्वाने जिंकून दिल्यात. १९६५ साली झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धामध्ये राष्ट्रीय संरक्षण निधीत महाराष्ट्राचे योगदान मोठे राहिले आहे. भाषावार प्रांत रचनेतील संकुचितपणा आणि फाजिल प्रांतीय अभिनिवेष न बाळगता महाराष्ट्राला देशाच्या राजकारणात एक महत्त्वाचे स्थान प्राप्त करून देण्याचे कार्य नाईकसाहेबांनी केले. पं. नेहरू यांच्या मृत्यूनंतर लालबहादूर शास्त्री यांची पंतप्रधानपदी निवड करताना भारतीय पातळीवरील महत्त्वाची भूमिका यशवंतरावांच्या बरोबरीने नाईकसाहेबांनी वठविली. नाईकसाहेबांच्या पुरोगामी नेतृत्वामुळे महाराष्ट्राचे सामाजिक जीवन एकजिनसी राहिले. ब्राह्मण-ब्राह्मणेतर, दलित-दलितेतर असा संघर्ष कधी निर्माण झाला नाही. सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया याच काळात अधिक गतिमान झाली. समाज जीवन एकात्म बनले. देशभरामध्ये एक पुरोगामी आणि प्रगत राज्य निर्माण करण्यात नाईकसाहेबांचा सिंहाचा वाटा राहिला. अकरा वर्षाची ही प्रदीर्घ कारकीर्द आदर्श राजकीय कारकीर्द राहिली. महाराष्ट्राला एक सुस्थिरता लाभली. त्याला कारण नाईकसाहेबांच्या ठिकाणी असलेली अशी गुण वैशिष्ट्येच होत. स्वकीयांचा विश्वास आणि विरोधकांबद्दल सहिष्णुता बाळगून बेरजेचेच राजकारण नाही तर गुणाकाराचे राजकारण त्यांनी केले. ज्येष्ठ समाजवादी नेते व विचारवंत एस.एम.जोशी, नाईकसाहेबांच्या कारकीर्दीचे मूल्यमापन करताना म्हणतात, ''यशवंतरावांनी त्यांना जी गादी दिली, ती केवळ सांभाळली नाही तर तिचा सन्मान राखून त्यांनी तिची प्रतिष्ठा वाढविली १) भारतीय समस्यांचे आकलन २) समूह

जीवनातील प्रश्नांची ओळख ३) सर्वांना सांभाळून घेण्याचे समन्वयाचे धोरण ४) दूरदर्शित्व हे सर्व गुण राष्ट्रीय नेत्यांजवळ असले पाहिजेत ते वसंतराव नाईकांच्या व्यक्तिमत्त्वात आढळतात.''

## खासदार

केंद्राचा आदेश प्राप्त झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची कटुता न बाळगता नाईकसाहेबांनी मुख्यमंत्री पदाची सूत्रे खाली ठेवली. आणि महाराष्ट्र विधी मंडळात एक साधे आमदार म्हणून राहण्यामध्ये कधीही कमीपणा मानला नाही. त्यानंतर १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका झाल्यात. ह्या निवडणुकीमध्ये देशभरात काँग्रेसपक्षाचे पानीपत झाले. मात्र नव्याने निर्माण झालेल्या 'वाशीम' लोकसभा मतदार संघातून काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर नाईकसाहेबांनी ही निवडणूक सहज जिंकली. मृत्यूपर्यंत ते याच पदावर होते. गहुली ते दिल्ली हा नाईकसाहेबांचा राजकीय प्रवास थक्क करून सोडणारा आहे.

## क्रांतदर्शी समाजसुधारक व प्रबोधनाचे पाईक

महाराष्ट्राला लाभलेली प्रबोधनाची परंपरा फार मोठी आहे. १९ व्या शतकाच्या मध्यापासून या समाज सुधारणेच्या कार्याला प्रारंभ झाला. या कार्याचे बीजारोपण मराठी संतांच्या सामाजिक कार्यात आणि त्यांच्या अक्षरवाङ्मयात आपणाला गवसते. नाईकसाहेबांवर म. जोतीराव फुले, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या विचाराचा मोठा प्रभाव होता. हे स्पष्टपणे जाणवते. तथापि आपण म. फुले आणि डॉ. आंबेडकर यांचे वारसदार आहोत, असा टेंभा त्यांनी कधी मिरविला नाही. आपल्या मनोधर्माशी अनुरुप असलेल्या ब्राह्मण कुटुंबातील उपवर मुलीशी आंतरजातीय विवाह करून आजपासून सुमारे ६० वर्षांपूर्वी त्यांनी आपल्या पुरोगामीत्वाचा परिचय करून दिला. त्या काळात तर जातीभेदाची तीव्रता प्रखर होती. केवळ घाटे कुटुंबाकडूनच नाही तर बंजारा समाजातूनही त्याला विरोध झाला. त्या काळाच्यामानाने ते स्वाभाविकही होते. परंतु नाईकसाहेबांच्या समंजस, प्रगल्भ, संयमी आणि सुसंस्कृत वृत्तीमुळे हा विरोध मावळला. आणि विवाहाचे मंगलकार्य निर्विघ्नपणे पार पाडले. नाईकसाहेबांनी 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे स्वत:पासून त्या कामाची सुरुवात केली. Charity begins at home असे म्हणतात. चांगल्या

कामाची सुरुवात ही स्वत:पासून करावी लागते. ज्या बंजारा समाजात नाईकसाहेबांचा जन्म झाला, त्या समाजातील अनिष्ट रुढी, दुष्ट परंपरा आणि वाईट चालीरिती यांचे निर्मूलन करण्यासाठी नाईकसाहेबांनी केलेले कार्य प्रशंसनीय असेच आहे.

शिक्षण हा पवित्र संस्कार आहे. आणि समाज परिवर्तनाची आधारशिला शिक्षण आहे. सगळ्या अनर्थाचे मूळ हे अविद्येत आहे. हे जसे म. फुल्यांनी ओळखून शिक्षणाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी महाराष्ट्रामध्ये खासगी शिक्षण संस्थेची पायाभरणी केली. तसेच नाईकसाहेबांनी आपणाला हवे तसे सामाजिक बदल करून आणावयाचे असतील तर आपला समाज शिकला पाहिजे. याकडे त्यांनी कटाक्षाने लक्ष दिले. आणि आपल्या समाजाला शेती करायला लावून राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणले. पूर्वी बंजारा समाजातील लोक पैसा-अडका जमा करून सोने-चांदी खरेदी करीत असत. आज बंजारा समाजबांधव शेती खरेदी करीत आहेत. स्वतः शेतात राबून ते शेती करीत असल्यामुळे त्यांची शेती फायदेशीर आणि प्रगत ठरली आहे. शेती व्यवसायामुळे त्यांच्या भटकंतीला आता विराम लाभला, एक स्थिरपद जीवन त्यांना प्राप्त झाले आहे. दारुच्या व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी नाईकसाहेबांनी आपल्या स्वकीयांशी संघर्ष केला. दारुचे दुष्परिणाम लोकांना पटवून देण्यासाठी खेडोपाडी जाऊन, तांड्या-तांड्यात जाऊन भेटी-गाठी घेऊन बंजारा बोलीत भाषणे देऊन त्यांनी लोक शिक्षणाचे मोठे कार्य केले. मंदिरात त्यांना शपथ घ्यायला लावली. स्त्रियांच्या पोषाखामध्ये तर आमूलाग्र बदल घडवून आणले. यासाठी स्वत:च्या घरापासून त्यांनी सुरुवात केली. बंजारा स्त्रिया जे घागऱ्याचे घेरदार वस्त्र परिधान करतात, त्याला 'लेहंगा' असे म्हणतात. आणि त्यासोबतची तशाच प्रकारची काचोळी घालणे यासाठी सुमारे ८ ते ९ मिटर कापड लागते. हा सगळा पोषाख अतिशय गैरसोयीचा, वेळ, पैसा यांचा अपव्यय करणारा. त्याऐवजी आपल्या समाजातील स्त्रियांनी भारतीय स्त्री जशी साडी-चोळी परिधान करते तसा पोषाख परिधान करावा असे आवाहन केले. पोषाखातून आपले व्यक्तिमत्व खुलावे, आणि आपला पोषाख आटोपशीर असावा या दृष्टीने त्यांनी लोक शिक्षणाद्वारे मोठे कार्य केले. बंजारा समाजाच्या स्त्रीची केशरचनादेखील विशिष्ट पद्धतीची होती. वेणी-फणी रोज किंवा दिवसाआड केल्या जात नव्हती. तर स्त्रिया आठ-आठ, पंधरा- पंधरा दिवस विशिष्ट पद्धतीची केशभूषा करीत असत. हे सर्व अतिशय वेळखाऊ होते. पुसद येथील प्रा. संजय चव्हाण वरील संदर्भात

'द्रष्टे समाज सुधारक' या लेखात म्हणतात, ''बंजारा समाजातील पोषाख पद्धतीत बदल करावा म्हणून नाईकसाहेबांनी गहुली-फुलउमरी या गावापासून सुरुवात केली. पोषाख बदलावा यामागील त्यांचा हेतू बंजारा संस्कृती, चालिरिती सोडणे असा नव्हता, तर समाजात आमूलाग्र बदल व्हावा हा होता.''

बंजारा स्त्रियांच्या पारंपरिक पद्धतीच्या वेषभूषेमुळे आणि केशभूषेमुळे स्त्रियांमध्ये अनेक त्वचा रोगाचा उद्‌भव होत असे. नाईकसाहेबांनी त्याच्या निर्मूलनासाठी एक कला पथक तयार करून घेतले. आणि या कलापथकाच्या माध्यमातून पोषाख परिवर्तन चळवळ राबविली. त्याला प्रतिसादही चांगला मिळाला. आणि थोडेफार अवशेष सोडले तर भारतीय साडी-चोळीच्या पोषाखात आणि सलवार-कुर्ता इ. आधुनिक पोषाखात आज बंजारा स्त्री वावरताना दिसते. क्रांतीची बिजे ही शिक्षणातच असतात. हे नाईकसाहेबांनी हेरले. आपल्या समाजातील मुलांना शिक्षण देण्यासाठी नाईकसाहेबांनी जीवाचे रान केले. त्यासाठी त्यांनी तांड्या-तांड्यांना जमिनी दिल्या. घरे बांधून दिली. आणि मग 'तांडा तेथे शाळा' ही घोषणा देऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात केली. कोल्हापूर येथील वसंत कुंभोजकर यांनी सांगितलेली एक आठवण अतिशय बोलकी आहे- गहुली येथे शाळा सुरू करतानाची ही आठवण, 'गहुली एवढ्या लहान गावात शाळा कशाला? मुलं पुसदपर्यंत जातील चालत' असा सूर काही गहुलीकरांनी काढला. त्यावर त्यांनी मार्मिक उत्तर दिले. ते म्हणाले, ''बाबांनो! आपण पिढ्यान्‌पिढ्या चालत आहोत, आता आपण स्थिर राहू, शाळा आपल्याकडे चालत येऊ द्या, नुसती शाळा उघडून भागणार नाही. शाळेत विद्यार्थी आले पाहिजे. पोटाची खळगी भरण्यासाठी वणवण भटकणाऱ्या, समाजातील पालक आपल्या मुलांना शाळेत काय पाठवतील? आणि पाठविले तरी मदिरेत आकंठ बुडालेला हा पालक आपल्या पोरांवर काय संस्कार करणार? घरात कोणते शैक्षणिक वातावरण असणार?'' म्हणून नाईकसाहेबांनी आश्रमशाळेची कल्पना राबविली. आणि १५-२० तांडे मिळून एक आश्रम शाळा सुरू केली. याच आश्रम शाळेत शिक्षण घेऊन, तेजस्वी संस्कार घेऊन बाहेर पडलेले अनेक बंजारा विद्यार्थी आज महत्पदावर उच्च पदस्थ अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. प्रा. कुंभोजकरांनी वसंतराव नाईकसाहेबांना 'तिसऱ्या प्रबोधनाचे श्रेष्ठ पाईक म्हटले आहे'. त्यांच्याच भाषेत सांगावयाचे झाल्यास 'एक नागरी प्रबोधनाची परंपरा आणि दुसरे नांगरी परंपरा आणि या दोन परंपरेतून राजकीय आणि सामाजिक आणखी एक परंपरा महाराष्ट्रात निर्माण होत आहे.' या देशात

फार मोठा असाही समाज होता की, त्याला गावकुसाबाहेरही स्थान नव्हते. शतकानुशतके हा समाज अक्षरश: पोटासाठी अखंड भटकत होता. अजुनही तो पूर्णपणे स्थिरावला आहे अशातला भाग नाही. अशा या भटक्या जाती-जमातींपर्यंत प्रबोधनाचा अगर शिक्षणाचा एखादा किरण स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही जाऊन पोहचला नव्हता. या समाजाच्या दु:खाचा आणि व्यथांचा विचार करून त्यांच्या भाळी कोरला गेलेला भटकेपणाचा आणि गुन्हेगारीचा शाप पुसला गेला पाहिजे. हा विचार मांडणारा महाराष्ट्रामधला पहिला कार्यकर्ता म्हणजे मराठवाड्यातील किनवटचे कै. बळीराम पाटील (राठोड) आणि तिसऱ्या प्रबोधनाची पताका खांद्यावर घेऊन भटक्या समाजाला 'स्थिर' करण्यासाठी ठोस प्रयत्न करणारा महाराष्ट्रामधला पहिला महापुरुष म्हणजे महाराष्ट्राचे भूतपूर्व मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक.

## हरितक्रांतीचे प्रणेते

१९५२ ते १९७९ अशी सत्तावीस वर्षे अखंडितपणे नाईकसाहेब राजकारणात वावरले. महाराष्ट्रातील जनतेची केवळ 'मतेच नाही तर मनेही जिंकणारा नेता' असे त्यांचे मोठ्या कौतुकाने आणि आदराने वर्णन केले जाते; हे अतिशयोक्तीवाचून खरे आहे. आमदार, खासदार, उपमंत्री, मंत्री व मुख्यमंत्री असा त्यांचा राजकीय कर्तृत्वाचा आलेख अभिनंदनीय आणि कौतुकास्पद आहे. तथापि नाईकसाहेब रमले मात्र शेतीत. 'शेती आणि शेतकरी' हा त्यांचा आत्यंतिक जिव्हाळ्याचा विषय. धरतीच्या कणाकणातून समृद्धी फुलली पाहिजे हा त्यांचा उत्कट ध्यास होता. काळ्या मातीचे हिरवे स्वप्न साकार करणारा हा खरा भूमिपुत्र होता. 'शेतकरी कारखानदार झाला पाहिजे' हे नाईकसाहेबांनी पाहिलेले सुंदर स्वप्न होते. महाराष्ट्राचे कवि वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांनी मोठ्या काव्यमय शब्दात त्यांच्या शेतीविषयक कामगिरीचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, ''वसंतरावांचा मूळ पिंड शेतकऱ्यांचा. शेती हा त्यांचा खरा जिव्हाळ्याचा विषय. व्यवसाय म्हणून शेती केली गेली पाहिजे. शेतकऱ्याला प्रतिष्ठा लाभली पाहिजे. हे त्यांच्या चिंतनगीताचे जणू धृपद होते.'' कृषिप्रधान भारताचा मूलभूत उद्योग शेती हाच आहे. आणि शेती हीच साऱ्या उद्योगाची जननी आहे. याचाच नाईकसाहेबांनी आयुष्यभर विचार केला. किंबहुना या विचाराभोवतीच त्यांनी आपले जीवितकार्य ठेवले. शेती हा नाईकसाहेबांचा श्वासोच्छ्वास होता. विदर्भातील एक प्रसिद्ध

लेखक, अर्थशास्त्रज्ञ प्रा. वा. सी. काळे हे पुसदच्या फुलसिंग नाईक महाविद्यालयाचे काही काळ प्राचार्य होते. महाविद्यालयाच्या विकासाच्या प्रयत्नाच्या संबंधात ते नाईकसाहेबांशी चर्चा करीत. मात्र ते शेतीविषयक प्रश्नांबाबत चर्चा करताना त्यांच्याशी रंगून जात. असेच त्यांनी आपल्या एका लेखात म्हटले आहे. शेतकरी हा आपल्या देशाचा खरा आधारस्तंभ आहे. 'शेतकरी जगेल तर कोण मरेल? आणि शेतकरी मरेल तर कोण जगेल?' असे शेतकऱ्यांविषयीच्या आदरापोटी आपण सगळेच म्हणतो. 'शेतकरी सुखी तर देश सुखी' हा वाक्प्रचार तर अतिशय प्रसिद्ध आहे. मात्र साक्षात अन्नपूर्णेला अवतार घ्यायला लावणारा हा अन्नदाता मात्र उपाशी असतो. अर्धपोटी राहतो, शेतकऱ्यांची हीन-दीन स्थिती पाहून नाईकसाहेबांचे आतडे तुटत असत. आपल्या देशाचा हा आधारस्तंभ पंगू आहे याची तीव्र जाणीव त्यांना होती. नाईकसाहेबांच्या कार्यकाळात शेतजमिनीच्या कमाल धारणेचा कायदा झाला. 'कसेल त्याची जमीन' हा विचार त्याच्या मूळाशी होता. सिलींगचा कायदा म्हणून हा कायदा ओळखला जातो. हा कायदा कार्यान्वित होण्याच्या दरम्यान राष्ट्रीय नियोजन परिषदेच्या बैठकीत सहभागी होताना नाईकसाहेबांनी एक अत्यंत कळीचा मुद्दा मोठ्या प्रभावीपणे त्या बैठकीत मांडला. त्या बैठकीत ते म्हणाले, ''शेत जमिनीची किमान धारणा कितीही कमी ठेवावी परंतु सामान्य शेतकऱ्यांच्या राहणीमानाची पातळी कुठल्या कर्मचाऱ्यांच्या पातळीवर तुम्ही ठरविणार आहात? याचा निर्णय अगोदर घ्या.'' शासनाच्या दरबारातील सचिव, सहसचिव, उपसचिव, सहाय्यक सचिव, कक्ष अधिकारी, लिपीक की चपराशी? यापैकी कुठल्या पातळीवर तुम्ही शेतकऱ्याचे जीवनमान ठेवू इच्छिता? या नाईकसाहेबांच्या प्रश्नाने सर्व स्तिमित झाले. त्यांच्या या विचारातून आणि प्रश्नातून शेतकऱ्यांबद्दलचा त्यांचा आत्यंतिक कळवळा आणि पोटतिडीक दिसून आली. सबंध बैठक प्रभावित झाली. शब्दातून तळमळ व्यक्त होत नसते. तळमळीतून जे शब्द बाहेर पडतात ते परिणाम करून जातात. नाईकसाहेबांचे शेतकऱ्यांबद्दलचे विचार आज जवळ-जवळ सर्वमान्य झाले आहेत. कवी यशवंत मनोहरांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, ''येताना उत्तरे घेऊन आलो होतो, जाताना प्रश्न ठेवून जाईन.'' या काव्यपंक्तीप्रमाणे नाईकसाहेबांनी केवळ प्रश्न उपस्थित केले नाहीत. त्याची उत्तरे शोधलीत. त्या उत्तरांच्या पाठीमागे एक तर्कसंगत असे शेतीविषयक तत्त्वज्ञान होते. शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान शेतीत विनियोजित केले पाहिजे. या विज्ञाननिष्ठ विचारावर नाईकसाहेबांची अभंग निष्ठा

होती. पारंपरिक पद्धतीने केलेली शेती आजच्या काळात फायदेशीर ठरू शकणार नाही. या महत्त्वाच्या विचाराचा प्रचार आणि प्रसार नाईकसाहेबांनी केला. चीनमध्ये झालेली कृषिक्रांती आणि रशियात झालेली औद्योगिक क्रांती अयशस्वी झाल्याचे कारण म्हणजे शेतकऱ्यांनी आपली शेती अवजारे टाकून दिली. तर कामगारांनी त्यांच्या हातातील साधने फेकून दिली. आणि ते शस्त्रशरण झाले. अशा माध्यमातून ती यशस्वी होत नसते. हरितक्रांती जर यशस्वी करावयाची असेल तर कृषिविषयक अवजारांच्याच माध्यमातून, त्याच्या परिवर्तनातून ती केली पाहिजे. विज्ञानाची कास धरली पाहिजे. याबाबतीत नाईकसाहेबांनी केलेले चिंतन अत्यंत मूलगामी होते. कोणत्याही व्यवसायाची अस्मिता ही त्या व्यवसायातील सत्त्व आणि तेज यावर अवलंबून असते. शेती-शेतकरी, पावसाचे पाणी आणि शेतात निर्माण होणारे धन-धान्य याचा एकमेकांशी अन्योन्य असा साधारण संबंध आहे. हे सगळे घटक एकमेकांशी एकरूप आहेत. शेतीचे अविभाज्य अंग आहेत. याचा सातत्याने नाईकसाहेबांनी मूलगामी असा विचार केला. आणि म्हणूनच कार्यक्रम कोणताही असो प्रसंग कोणताही असो हरिदासाची कथा जशी मूळ पदावर तसे नाईकसाहेब उत्स्फूर्तपणे शेती हा विषय घेऊन बोलत असत. अगदी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात उत्सवी-आनंदी विद्यार्थ्यांसमोर नाईकसाहेब शेतीवर बोलत असत. त्यांचे ते प्रकट चिंतनच असे. त्यांच्या पाठीमागे तर्कसंगत असा युक्तिवाद होता. शेतीविषयक त्यांची तळमळ इतकी उत्कट असे की ऐकणारे प्रभावित होत असत असे म्हणतात की, ''माणसांच्या भावना प्रामाणिक असल्या की त्याचे लेखन आणि वक्तृत्व प्रभावी होत असते. शेतीविषयक नाईकसाहेबांचे हे विचार घेऊन फुलणारे हे वक्तृत्व त्याचे मूर्तिमंत उदाहरण होय. शेती व्यवसाय म्हणून केली पाहिजे. समाज जीवनामध्ये शेतकऱ्याला सन्मान आणि प्रतिष्ठा लाभली पाहिजे. हा एकमेव ध्यास वसंतरावांनी घेतला होता. निर्विवादपणे एक गोष्ट मान्य केली पाहिजे की, वसंतराव नाईकसाहेबांच्याच प्रदीर्घ कार्यकाळात महाराष्ट्राच्या शेती विकासात मोठी क्रांती झाली. शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारले आहे. आपले न्याय्य हक्कदेखील शेतकऱ्याला आता समजू लागले. तो आत संघटित झाला. त्याची अस्मिता ही जागी झाली. सावकारी पाशात भरडल्या गेलेला दीनवाणा-लाचार शेतकरी ही त्याची प्रतिमा आता बदलली आहे, पावसावर अवलंबून असलेली कोरडवाहू शेती आता फायदेशीर ठरणार नाही. तेव्हा नदीवर बांध घालून, धरण घालून, पाणी अडवून या परिसरातील जमीन भिजली पाहिजे. ओलिताखाली आली पाहिजे.

यासाठी त्यांनी भगीरथ प्रयत्न केले. १९६५ साली भारत आणि पाकिस्तानचे युद्ध झाले. 'जय जवान जय किसान' हा शास्त्रीजींनी देशाला नारा दिला. देशाची लोकसंख्या आणि देशामध्ये उत्पादन होणारे धान्य याचा मेळ घालण्यासाठी शास्त्रीजींनी लोकांना आठवड्यातून एक वेळेला उपवास करायला सांगितले. मात्र धान्यासाठी लाचार होऊन कोणापुढे झोळी पसरणार नाही, असे बाणेदारपणाने सांगितले. या उद्‌गारातून शास्त्रीजींचे सत्त्व आणि तेज प्रकट झाले. जणू शास्त्रीजींच्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी ''दोन वर्षांत अन्नधान्याच्याबाबतीत महाराष्ट्र स्वयंपूर्ण झाला नाही तर मला फाशी द्या.'' असे भावोत्कट उद्‌गार काढून नाईकसाहेबांनी जनतेच्या काळजाला हात घातला. जोपर्यंत अन्नधान्याच्याबाबतीत आपण स्वयंपूर्ण होणार नाही तोपर्यंत इतर गोष्टी निरर्थक आहेत. असे त्यांना प्रामाणिकपणे वाटे. मूलभूत गोष्टींची पूर्तता झाली तरच विकासाच्या इतर गोष्टींना अर्थ असतो ही त्यांची भूमिका उदात्त आणि व्यवहार्यही आहे. पावसाचे पाणी वाहून जाते तेव्हा ते साठविले पाहिजे आणि पाणी टंचाईच्या काळात त्याचा उपयोग झाला पाहिजे, यासाठी पाझर तलाव, छोटे ओढे, नाले यांना घातलेले बांध, जमिनीचा कस कायम ठेवण्यासाठी तिला खत दिले पाहिजे. सकस बियाणे वापरली पाहिजेत. यासाठी खत, बियाणे, शासनामार्फत, सहकारी संस्थांमार्फत शेतकऱ्यांना माफक दरात पुरविले गेले पाहिजे. उधारीवर दिले गेले पाहिजे. आणि हंगामाच्या काळात शेतकऱ्याजवळ पैसा आला की, त्याच्या जवळून ते वसूल करण्यात आला पाहिजे. शेती फायदेशीर ठरावी म्हणून शेतमालावर सहकारी संस्थांच्या माध्यमातून प्रक्रिया उद्योग सुरू केले पाहिजे. जसे-विदर्भ-मराठवाडा, खानदेशात कापसाचे मोठे पीक होते. या भागातील शेतकरी त्याला पांढरे सोने म्हणतात. हे शेतकऱ्यांचे रोखीचे मोठे पीक आहे. कापसातून सरकी बाहेर काढण्यासाठी जिनींग, सरकी काढून टाकलेल्या रुईच्या गाठी बांधण्यासाठी प्रेसिंग, तेल बियांपासून तेल काढण्यासाठी तेलघाणी (Oil Mill) कापसापासून सूत तयार करण्यासाठी सूत व कापड गिरणी असे सहकाराचे जाळेच या भागात विणण्याचे काम त्यांच्याच कार्यकाळात झाले. या भागाचा चेहरा-मोहराच बदलून गेला आहे. बाजारपेठेत चैतन्य आले. नव्या बाजारपेठा उभारल्या गेल्या. लोकांच्या खिशात दोन पैसे खुळखुळू लागले. शेतकऱ्यांची मुले शाळा-महाविद्यालयात जाऊ लागली, शिकू लागली, ग्रामीण भागाचे नेतृत्व करू लागली. खेडी ही संस्कृतीची केंद्रे बनली. शेतीविषयक शिक्षणासाठी एक नाही, दोन नाही तर स्वतंत्र कृषि विद्यापीठे विभाग निहाय निर्माण

झालीत. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान याला धरून शेती विषयाचा साक्षेपाने अभ्यास केला जाऊ लागला. हे आधुनिक तंत्रज्ञान शेतीमध्ये विनियोजित करून अधिक उत्पादन काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला. नवीन संकरित बी-बियाणे पेरण्याची आणि सुधारित अवजारांचा उपयोग, वापर करण्याची नवी दृष्टी त्यांनी शेतकऱ्यांना दिली. सामान्यत: माणूस स्थितीशील असतो. रुळलेल्या, मळलेल्या परंपरेच्या पायवाटेवरून तो चालतो. बदल त्याला आवडत नाही. परिवर्तनाचा विचार त्याला पचत नाही. मात्र नाईकसाहेबांनी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन परिवर्तनाची दिशा दिली. १९७२ च्या सुमारास महाराष्ट्रात अभूतपूर्व असा दुष्काळ पडला. लागोपाठ दोन-तीन वर्षे अवर्षणाचे आले. आभाळमाया आटली. नाईकसाहेबांनी मात्र या विपरीत परिस्थितीत शेतकऱ्यांना, शेतमजुरांना हिंमत दिली. त्यांचे आत्मबळ वाढविले. त्यांना दिलासा दिला. ''दुष्काळ आला म्हणून माणसाने खचून जाऊ नये, त्याने धरतीला बळ दिले पाहिजे.'' असे ते म्हणत. संकरित ज्वारीचे बियाणे शेतकऱ्यांनी वापरावे म्हणून नाईकसाहेबांनी प्रचाराची राळ उडविली. प्रचाराचा जणू झंझावातच निर्माण झाला. पंचायत समित्या, जिल्हा परिषदा यांनी हे कार्य नेटाने केले. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात संकरित बियाणे तयार करण्याचे प्लॉटस् घेतलेत. त्याच्यातून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक लाभ झाला. नर आणि मादी यांचे बियाणे अंतर ठेवून कसे पेरतात, नंतर रोपे फुलोऱ्यावर आल्यावर त्यांचा संकर कसा होतो? आणि तत्पूर्वी त्याचे रोपिंग कसे होते. याचे प्रशिक्षणच शेतकऱ्यांना दिले. या सगळ्याची शास्त्रशुद्ध माहिती देणे व त्यावरील त्यांचे भाषण ऐकणे हा एक वेगळाच अनुभव होता. १९७० च्या दरम्यान खरोखरच महाराष्ट्र अन्न-धान्याच्याबाबतीत स्वावलंबी झाला. विक्रमी धान्य उत्पादन झाले. महाराष्ट्राची गरज भागलीच. इतर प्रांतांनाही त्यांनी धान्य पुरविले. विदर्भ-मराठवाड्यात 'हायब्रीड' ज्वारी हा परवलीचा शब्द बनला. जेमतेम धान्य उत्पादन होऊन आणि शेतावर काम करणाऱ्या मजुरांची गरज भागविणारा शेतकरी प्रचंड धान्याचे उत्पादन घेऊ लागला. त्याच्या शेतात संकरित धान्याची रास उभी राहिली. पोती ठेवायला घरे लहान पडू लागली. हा नवा चमत्कार नाईकसाहेबांनी घडवून आणला. एवढेच करून ते थांबले नाहीत. तर त्यांनी शेतमालाचे भाव बांधून दिले. अर्थशास्त्रामध्ये मागणीचा म्हणून एक नियम सांगितला जातो. 'किंमतीच्या व्यस्त दिशेने मागणी बदलते.' हे या नियमाचे सूत्र आहे. गरजेपेक्षा बाजारपेठेमध्ये मालाची आवक जास्त झाली की, किंमती उतरतात. हा सगळ्यांना माहीत असलेला नियम

होता. धान्य उत्पादन वाढल्याबरोबर धान्याच्या किंमती पडू लागल्या. काही वेळेला व्यापाऱ्यांनी मुद्दाम भाव पाडले. अशा वेळी शेतकरी अडचणीत येऊ नये म्हणून किमान हमी भावावर शासनामार्फत ज्वारीची-धान्याची खरेदी करून शेतकऱ्यांना सहकार्याचा हात नाईकसाहेबांनी दिला. शेतकऱ्यांनी शेतीमाल तर मोठ्या प्रमाणात उत्पादित करावाच. एवढ्यावर त्याने थांबू नये. शेतकऱ्यांमधल्या जाणकारांनी समोर यावे, पुढाकार घ्यावा आणि शेतीला उद्योगाची जोड द्यावी. केवळ हरितक्रांती नाही तर कृषिऔद्योगिक क्रांती झाली पाहिजे. ही क्रांती यशस्वी होण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

## हरितक्रांती

पिढ्यान्‌पिढ्या परंपरागत चालत आलेला शेती व्यवसाय आधुनिक पद्धतीने व्हावा यासाठी शेती व्यवसायाला लागणारे साहित्य उदा.-बियाणे, दोरखंड, औत, बैल-बारदाना या सर्वांमध्ये विज्ञानाधिष्ठित सुधारणा व्हावी असे नाईकसाहेबांना वाटत असे. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत यासाठी त्यांनी चार कृषी विद्यापीठे निर्माण केलीत. त्याद्वारा हा आधुनिक दृष्टिकोन अंगीकारण्यासाठी तशी मानसिकता तयार करण्यासाठी, लोकशिक्षणासाठी या संस्थांचा उपयोग त्यांनी करून घ्यावा. शेतकऱ्यांना संकरित बी-बियाणे यांचा पुरवठा भरपूर प्रमाणात व्हावा म्हणून ही विद्यापीठे प्रयत्नशील आहेत. प्रत्येक तालुका तथा पंचायत स्तरावर बीज गुणन प्रक्षेत्रांची निर्मिती केली. त्याचप्रमाणे विज्ञानाधारित अवजारे, कीटकनाशके, रासायनिक खते इ. आधुनिक शेतीस लागणारे साहित्य, त्यावर संशोधन करणाऱ्या संस्था अस्तित्वात आल्यात आणि हे सर्व शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहचविण्याचे विविध मार्गदेखील त्यांनी अवलंबिले. पडणाऱ्या पावसाचे पाणी शेतात मुरवून मातीतील ओल टिकविण्यासाठी मृदसंधारण योजना त्या त्या खात्यामार्फत अस्तित्वात आणल्या. शक्यतोवर प्रत्येक शेतकऱ्याने तथा प्रत्येक गावांनी संकरित बी-बियाणे स्वतःच्या शेतात निर्माण करावीत, सुधारित अवजारे तयार करावीत, ज्यामुळे शेतकरी आपल्यापरीने स्वावलंबी होईल. पूर्वीचा शेतकरी आपल्या व्यवसायाच्याबाबतीत जसा स्वावलंबी होता, तसा आधुनिक शेतीच्या बाबतीतही स्वावलंबी असावा. ही नाईकसाहेबांची हरितक्रांतीची योजना होती. भारत हा कृषिप्रधान देश असल्याने शेतीचे अर्थशास्त्र कृषिप्रधान असावे एवढेच नाही तर लोकशाहीचे तंत्र-मंत्रदेखील शेतकरीप्रधान असावे आणि लोकशाही व्यवस्थेच्या

केंद्रस्थानी हा शेतकरीच असावा. असे त्यांना वाटत असे.

## श्वेतक्रांती

लहरी पावसावर अवलंबून असणारा महाराष्ट्राचा शेती व्यवसाय त्याला पुरक उद्योगाची जोड दिल्याशिवाय किफायतशीर ठरणार नाही. या भूमिकेतून नाईकसाहेबांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात महाराष्ट्रात श्वेतक्रांती घडवून आणण्यासाठी विशेषत्वाने प्रयत्न केले. त्यामुळे महाराष्ट्रातील दूध समस्येचे निराकरण करणे सुलभ झाले आणि तसेच या प्रयत्नांकडे विशेष गांभीर्याने पाहिले गेले. त्यांच्या या कार्याला त्यांचे तत्कालिन सहकारी कै. शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील व मा.श्री. शरद पवार यांचे मोठे सहकार्य लाभले. महाराष्ट्रातील अपेक्षित दुधाची गरज भागविण्यासाठी व त्यासाठी दूध उत्पादन वाढविण्याकरिता संकरित गायींचा कार्यक्रम राबविण्याचे योजिले. त्यासाठी त्यांनी भारतीय कृषि उद्योग प्रतिष्ठानचे सहकार्य घेतले. दुधाची समस्याही सोडविली पाहिजे आणि शेतकऱ्याला अधिकचे दोन पैसेही मिळाले पाहिजे आणि शेतीचा व्यवसाय किफायतशीर ठरून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे, या नाईकसाहेबांच्या भूमिकेमध्ये दूरदृष्टी होती.

एक महत्वाकांक्षी प्रकल्प यादृष्टीने नाईकसाहेबांनी अतिशय खंबीरपणे संकरित गायींची योजना राबविली. आरंभी शासनाच्या पशुसंवर्धन खात्याने त्याला विरोधही केला. तथापि हळूहळू या विरोधाची धार बोथट झाली. अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने नाईकसाहेबांनी गाईच्या पचनेंद्रियांची आणि पोटाची रचना, चारा आणि पशुखाद्य याचे रक्तात आणि पर्यायाने दुधात रुपांतर करण्याची गायींची क्षमता म्हशीपेक्षा अधिक आहे हे समजावून सांगितले. खेरीज संकरित गाईचा भाकड कालावधी देखील म्हशीपेक्षा कमी असतो; अर्थात हे सर्व करीत असताना म्हशीची दूध उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी संशोधनाची आणि प्रजननशास्त्राची मदत घेऊन स्वतंत्रपणे कार्य करावे लागेल आणि म्हशीच्या विकासाच्या कामांकडे दुर्लक्ष होणार नाही हे नाईकसाहेबांनी मोठ्या अभ्यासपूर्णरितीने संबंधितांना पटवून दिले. हा कार्यक्रम राबविण्याचा निर्णय जर त्यांनी घेतला नसता तर महाराष्ट्रात दूध समस्येने भीषण रूप धारण केले असते.

प्रगत असे तंत्रज्ञान आणि आधुनिक विज्ञान ज्याप्रमाणे उद्योग आणि संरक्षणाच्या क्षेत्रात आपण विनीयोजित केले त्याचप्रमाणे ते पशुसंवर्धन आणि

विकासक्षेत्रातही उपयोगात आणले गेले पाहिजे ही नाईकसाहेबांची भूमिका होती. भावीकाळातील भारतीय जनतेची दूधाची गरज आणि नियोजन मंडळाने दूध उत्पादनाच्या संदर्भात ठरविलेले उद्दिष्ट पूर्ण करावयाचे असेल तर एकट्या म्हशीच्या दुधाने हे उद्दिष्ट साध्य होणार नाही. त्यासाठी संकरित गाईंच्या कार्यक्रमांवरच भर देण्याची आवश्यकता आहे. या कामात हरियाणातील कर्नाल येथील राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय संशोधन संस्थेचे तज्ज्ञ संचालक डॉ. सुंदरेशन यांच्या 'गाय किंवा म्हैस' या प्रबंधाचाही त्यांना मोठा आधार लाभला. नाईकसाहेबांनी या सर्व दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील दूध उत्पादन वाढीला जी दिशा दिली त्याच दिशेने वाटचाल करण्याची आज गरज आहे. याशिवाय गाईच्या दुधाला म्हशीच्या दुधाबरोबर भाव देण्याचा क्रांतिकारी निर्णयही त्यांनी घेतला. त्यांच्या याही निर्णयाला मोठा विरोध झाला. तथापि गाईच्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी नाईकसाहेबांनी या निर्णयाच्या रूपाने मोठे धाडस दाखविले. त्यासाठी त्यांना धन्यवादच दिले पाहिजे. शेतीसारखाच दुग्ध व्यवसायही तोट्यात चालणारा व्यवसाय होता. तेव्हा पुरक व्यवसाय व स्वतंत्र व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांनी या व्यवसायाकडे पहावे. व्यवस्थापनाचे तंत्र अंगी बाळगून गायींचा सांभाळ करावा आणि गायीला सकस आहार द्यावा, यावर त्यांचा कटाक्ष राहिला. प्रजननशास्त्रातील प्रगती गाय-वासरांचे आहारशास्त्र, त्यांच्या संगोपनाचे व्यवस्थापन, त्यांच्या आरोग्याचे संवर्धन आणि दुधाची शुद्धता ह्याकरिता आवश्यक असे लोकशिक्षणही करण्याची गरज आहे. म्हणजे महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने हरितक्रांतीबरोबर श्वेतक्रांती घडून येईल आणि देशाच्या समोर महाराष्ट्र हे एक या क्षेत्रातीलआदर्श वस्तुपाठ उभा करेल आणि तीच नाईकसाहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल असे वाटते.

## एकाधिकार कापूस योजना

विदर्भ-मराठवाडा आणि खानदेशात कापूस हे रोखीचे पीक मानले जाते. वर्षभराची आर्थिक तरतूद शेतकरी याच पिकाच्या भरवशावर प्रामुख्याने करतो. पूर्वी शेतकऱ्याचा कापूस, कापसाचे खरेदीदार अडते आणि दलाल यांच्यामार्फत खरेदी करीत होते. शेतकऱ्यांना मोठी अडत (दलाली) आपल्या कापसावर द्यावी लागत असे. खेरीज कापसाचा चुकारा तत्काळ मिळत नसे. आपला माल देऊनही अडत्यासमोर शेतकरी पैशासाठी लाचार बनत असे. याशिवाय हे कापसाचे खरेदीदार अतिशय कमी भावात हा कापूस खरेदी करीत असत. कापसाचे पीक

चांगले आले की, भाव पाडत असत. या जाचातून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी नाईकसाहेबांनी 'एकाधिकार कापूस योजना' १९७१ साली कार्यान्वीत करून एक मोठा क्रांतिकारी निर्णय घेतला. कापसाचे हमीभाव ठरवून दिले. खेरीज कापूस खरेदीवर लाभांश (Bonus) दिला. परिणामत: शेतकऱ्याला कापूस पिकाचे चांगले पैसे होऊ लागले. अजूनही ही योजना चालू आहे. यावरच या योजनेचे यश आपल्या लक्षात येते. नाईकसाहेबांच्या तत्त्वानुसार जर ही योजना राबविली गेली असती तर तिचा लाभ शेतकऱ्यांच्या पदरात पडला असता. या संदर्भात शेतकऱ्यांचे लोकशिक्षण करण्याच्या कामात शासन कमी पडले. आर्थिक अडचणींमुळे कापसाचे पैसे शेतकऱ्यांना मिळण्यास विलंब झाला. शेतकऱ्यांनीदेखील काही वेळेला दोन पैसे अधिक मिळतात हे पाहून परप्रांतात कापूस विकला. कथित भ्रष्टाचाराच्या काही घटना घडल्या आणि आज ही योजना जवळ-जवळ मोडीत निघाल्यात जमा आहे. तरीदेखील एकाधिकार कापूस योजनेमुळे शेतकऱ्यांना अधिकचे पैसे मिळू शकले. हमीभावामुळे किमान रक्कम प्राप्त झाली. हे नाकारता येत नाही. या कामात तत्कालीन सहकारमंत्री यशवंतराव मोहिते यांचे मोठे सहकार्य त्यांना लाभले. देशातील एकूण कापूस उत्पादनापैकी वर निर्देशित केलेल्या महाराष्ट्रातील भागात जवळ-जवळ ७५ टक्के कापूस पिकतो. सुमारे दहा लाख शेतकरी हे पीक घेतात. कापसाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ या योजनेमुळेच प्राप्त होऊ शकली. अडते आणि दलाल यांच्या कचाट्यातून त्याला मुक्त करण्यात या योजनेचे मोठे कार्य आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाचे भाव जर बांधून दिले तर तो स्वावलंबी बनतो आणि देशालाही स्वयंपूर्ण बनवू शकतो हे नाईकसाहेबांनी दाखवून दिले. देशाची अन्न-धान्याची गरज भागविण्यासाठी आणि धान्य टंचाई दूर करण्यासाठी आपल्या देशाला परदेशासमोर झोळी पसरवावी लागत असे. कृषिप्रधान असलेला हा देश आपल्याच देशातील जनतेची अन्न-धान्याची गरज भागवू शकत नव्हता. अमेरिकेसारखे राष्ट्र पशुखाद्य म्हणून त्यांच्या देशात वापरला जाणारा मिलो गहू (माय लव्ह) आपल्याला उधारीवर देत असे. अशी मोठी नामुष्कीची पाळी आपल्यावर आलेली होती. 'I know only one culture, and i. e. agriculture' एकच संस्कृती मला माहीत आहे ती म्हणजे 'कृषी संस्कृती' असे मोठ्या अभिमानाने सरदार वल्लभभाई पटेल यांनी एकदा म्हटले होते. या आपल्या कृषिप्रधान देशासमोर वाढत्या लोकसंख्येला धान्य पुरविण्यासाठी मोठे संकट निर्माण झाले होते. संकरित वाण वापरून आणि आधुनिक तंत्रज्ञान

विनियोजित करून नाईकसाहेबांनी धान्य उत्पादन कसे वाढविता येते याचा आदर्श वस्तुपाठच घालून दिला होता. 'बासमती' हा जो सुगंधी आणि महाग असा तांदूळ आहे त्याचाही प्रयोग अनेक ठिकाणी करून त्या पिकाचे उत्पादन नाईकसाहेबांनी घेतले. त्यामुळे केवळ तांदूळ पिकविणाऱ्या भागातच तांदळाचे पीक न घेता इतरत्रही शेतकरी हे पीक घेऊ लागले. मूठभर तांदळाला महाग झालेला हा देश बासमतीसारख्या अत्युच्च तांदळाचे पीक घेऊ लागला. ओलिताखाली शेती आल्यामुळे महाराष्ट्रदेखील गव्हाचे उत्पादन काढून त्याची निर्यात करू लागला. हा चमत्कार नाईकसाहेबांनी करून दाखविला.

## फलोत्पादन

संकराचा वापर करून केवळ धान्य उत्पादनच नाही तर फलोत्पादनही करता येते या संबंधातही नाईकसाहेबांनी प्रयोग केले. महाराष्ट्रात नाशिक भागात द्राक्षाचे उत्पादन होत असे. परंतु नाईकसाहेबांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिल्यामुळे पश्चिम विदर्भातही द्राक्षाची बागायत मोठ्या प्रमाणात होऊ लागली. पुसदसारख्या अनेक भागात शेतकऱ्यांनी द्राक्षाची बाग फुलविली. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. गोपालकृष्णन हे 'किंग ऑफ ग्रेप्स' म्हणून त्यावेळी प्रसिद्ध होते. द्राक्षतज्ज्ञ म्हणून त्यांचा मोठा लौकिक होता. त्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य घेऊन नाईकसाहेबांनी ट्रलिसच्या मांडवांची पद्धत उपयोगात आणून विदर्भात द्राक्षाची बाग फुलविली. प्रस्तुत लेखकाने त्या काळात पुसद भागात द्राक्षांच्या मोठ-मोठ्या घोसांच्या फळभारामुळे हे लोखंडी मांडवदेखील वाकलेले पाहिले. 'अनाबेशाही' या नावाच्या अतिशय उत्तमप्रतीच्या द्राक्षांचे वाण वापरून ही द्राक्षफळे घेतलीत. परिणामतः शेतकऱ्यांना त्या काळात अर्ध्या एकरात खर्च वजा जाता जवळ-जवळ पन्नास हजार रुपये शिल्लक राहू लागले. कर्जात जन्मलेला, सगळं आयुष्य कर्जात काढलेला आणि आपल्या मुला-बाळांसाठी कर्जाचा वारसा सोसलेला महाराष्ट्राचा शेतकरी ओलिताखाली शेती आल्यामुळे, दुबार पिके घेतल्यामुळे कर्जमुक्त होऊ लागला. त्याच्या जीवनात समृद्धी आली, त्याची पोरं-बाळं शिकू लागली. आणि पायी वणवण फिरणाऱ्या शेतकऱ्यांच्या दारामध्ये स्वयंचलीत वाहने उभी राहू लागली. तो ऐटित त्या वाहनावरून फिरू लागला. आपल्या शेतात जाऊ लागला हे सुखद धक्का देणारे चित्र आता सर्वदूर दिसत आहे.

तंत्र-मंत्रदेखील शेतकरीप्रधान असावे. लोकशाही व्यवस्थेच्या केंद्रस्थानी हा शेतकरीच असावा असे त्यांना वाटत असे आणि यासाठी 'शेतकरी समाज हितदर्शन योजना' कार्यान्वित करण्यासाठी ते प्रयत्नशील राहत असत. 'शेतकरी कारखानदार झाला पाहिजे' या घोषवाक्याचे स्पष्टीकरण करताना ते म्हणत, 'कारखानदार जसा कारखान्यातील माल मेहनताना, भांडवलावरील व्याज आणि नफा लावून उत्पादित कालाचा भाव जसा सांगतो. तसा शेतकऱ्याला सांगता आला पाहिजे. सर्व प्रक्रिया उद्योग शेतकऱ्याच्या मालकीचे असले पाहिजे. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा ते आवर्जून सांगत, ''जगात क्रांतीचा रंग लाल मानतात, परंतु त्याची पूर्तता क्रांतीचा रंग हिरवा असल्याशिवाय होणार नाही.'' जगामध्ये ज्या-ज्या वेळी असे दिसून आले त्या क्रांतिकारक नेत्याच्या नंतरच्या पिढीवर आपल्या नेत्याचे स्वप्न साकार करण्याची जबाबदारी येऊन पडली. म्हणून नाईकसाहेबांनी कृषिखात्याची प्रशासकीय पुनर्रचना करण्याचे योजिले. आपल्या शेतात विक्रमी धान्य उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना शेतामध्ये विविध प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांना, कृषिपंडितांना, शेतीनिष्ठ, शेतीभूषण अशा सन्मानदर्शक पदव्या देऊन त्यांचा गौरव आणि प्रतिष्ठा उंचावण्याचे उपक्रम शासकीय माध्यमातून त्यांनी अस्तित्वात आणले. 'बंजारा' या वाणिज्यवृत्तीच्या परंतु भटक्या समाजात जन्माला आलेल्या नाईकसाहेबांनी बदलत्या काळाची चाहूल ध्यानात घेऊन आपल्या समाजाला शेतीकडे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहण्यास शिकविले.

पिढीजात शेतकरी कुंटुंबात जन्मलेले नाईकसाहेब शेती विषयाकडे आत्यंतिक जिव्हाळ्याने आणि आपुलकीने पाहत असत. राजकीय कर्तृत्वाच्या पायऱ्या चढत जात असतानाही आणि राजकारणाच्या व्यस्ततेतही त्यांची ही आवड कधी कमी झाली नाही. मुंबई येथील मलबार हिलवरील आपल्या 'वर्षा' या मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थानी मोकळ्या जागेत जमिनीवर बसून भाज्या-फळझाडे आणि फुलझाडे यासंबंधी विविध प्रयोग त्यांनी केले. मुख्यमंत्री पदावरून निवृत्त झाल्यावर मुंबई येथीलच 'ग्रँड पराडी अपार्टमेंटस्' या आपल्या स्वतःच्या मालकीच्या घरात त्यांनी छान बगिचा फुलविला. नाईकसाहेबांना जमिनीच्या कणाकणात समृद्धी फुलविण्याचा ध्यास होता. शेतकऱ्यांच्या जीवनातील साऱ्या अडी-अडचणीची, सुख-दुःखाची, ऊन-पावसाच्या खेळाची त्यांना सूक्ष्म जाण होती.

भौमर्षी आचार्य विनोबा भावे यांच्या पवनार येथील आश्रमात त्यांच्या भेटीला जात असताना अलीकडेच असलेल्या दत्तपूरच्या शेतीच्या प्रयोगाची त्यांनी

काळजीपूर्वक पाहणी केली. त्यासाठी काटेरी तारेच्या कुंपनातून वाकून ते आत शिरले. त्या संदर्भातील क्रांतदर्शी साहित्यिक बाबा आमटे यांनी सांगितलेली एक आठवण-शेतीवर नाईकसाहेबांचे किती नि:सीम प्रेम होते. हे यावरून स्पष्ट होते. चंद्रपूर जिल्ह्यातील सिरोंचा येथे एकदा शेतकरी मेळावा आयोजित केला होता. चर्चेच्या वेळी मुद्दाम कोणीतरी खोडसाळपणे म्हटले, ''पलीकडच्या तीरावरील आंध्रची शेती पहा, सिरोंचा आंध्रात गेले असते तर.....?'' खट्याळपणे विचारलेल्या प्रश्नाचा रोख लक्षात घेऊन नाईकसाहेब ताडकन म्हणाले, ''बोला तुम्हाला काय पाहिजे?'' संबंधितांनी शंभर कूपनलिका मागितल्या. नाईकसाहेबांनी तिथल्या तिथे दीडशे कूपनलिका मंजूर केल्यात. शिवाय तो सगळा परिसर विद्युतमय करण्याचे आवश्यक ते सर्व प्रयत्न केले. असेच एका कास्तकारांच्या मेळाव्यात मिरचीचे अत्यंत कसदार शुद्ध बियाणे त्यांना दिसले. त्यातील दोन रोपे स्वत:साठी त्यांनी सोबत घेतली. नाईकसाहेबांचे शेतीप्रेम आंधळे नव्हते. त्या प्रेमाच्या पाठीमागे आयुष्यभर शेतीविषयाचे केलेले चिंतन होते. तर्कसंगत विचार होता. विज्ञाननिष्ठा होती, शास्त्राधार होता. शेतीबरोबरच पशुपालन आणि त्यातून दुग्ध व्यवसाय यासाठी जनावरांची प्रत सुधारण्याकरिता कृत्रिम गर्भधारणेचा त्यांनी केलेला प्रचार हरितक्रांतीला दिलेली श्वेतक्रांतीची जोड, रासायनिक खताचा वापर, पाण्याचे नियोजन, फळबागांची वाढ, 'कम्युनिझमचा पराभव ग्रेपिझमने करू' ही द्राक्षाबाबतची घोषणा, वसंत बंधाऱ्याच्या कल्पना, कुक्कुटपालन, दुष्काळ निवारण्यासाठी त्यांनी केलेले जीवाचे रान या साऱ्या गोष्टी शेत-शेतकरी आणि शेत मजुरावरील नि:सीम प्रेमाचे द्योतक आहे. नाईकसाहेबांच्या पहिल्या मंत्रिमंडळात पी. के. सावंत आणि यशवंतराव मोहिते हे कृषिखात्याचे मंत्री होते. ज्वारीचे मोठे उत्पादन झाल्यामुळे भाव पडू लागले होते. शेतकरी हवालदिल झाला होता. या घटनेने नाईकसाहेब अस्वस्थ झाले. यशवंतराव मोहित्यांनी शासनाने ज्वारी खरेदी करण्याची योजना त्यांच्यासमोर ठेवली. पणन महासंघाने आधारभूत किंमत देऊन ज्वारी खरेदी करावी अशी ती योजना होती. शेतकऱ्यांची ज्वारी कमी दराने लेव्हीच्या रुपात धान्य खरेदी करून खरेदी केलेली ती ज्वारी गोरगरीबांना स्वस्त धान्य दुकानातून विकण्याची पद्धत रुढ होती. मोहिते साहेबांनी सूचविलेली योजना नेमकी याच्या विरुद्ध गेली. त्याकाळी शासनाला आर्थिक शिस्त होती. शासन आर्थिक बाबतीत मोठे व्यवहारी होते. या योजनेमध्ये हा ज्वारी खरेदीचा व्यापार सहकार क्षेत्रामार्फत पणन महासंघाने करावयाचा व त्यासाठी सहकारातील शिखर

बँकेने कर्ज द्यायचे, अशी कल्पना होती. नाईकसाहेबांनी अतिशय शांतपणे ही योजना समजावून घेतली. यात शेतकऱ्यांचे हित आहे हे पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. तथापि या योजनेत तोटा आला तर शिखर बँक हा तोटा सहन करेल काय? किंवा ज्वारी खरेदीच्या पणन महासंघाच्या व्यवहाराला अर्थसहाय्य करेल काय? ही नाईकसाहेबांना शंका होती. शिखर बँकेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ हे होते. त्यांच्याशी मोहितेसाहेबांनी चर्चा करावी असे नाईकसाहेबांनी सुचविले. गाडगीळांशी झालेल्या चर्चेनंतर त्यांनाही आनंद झाला. साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या व्यापाऱ्याच्या तावडीतून शेतकऱ्याची मुक्तता करण्यासाठी सहकार चळवळ आहे. पणन महासंघ आहे तेव्हा शेतकऱ्याला मदत केली पाहिजे हे धनजंयरावांनी मान्य केले. सुदैवाने या व्यवहारात तोटा आला नाही. सरकारने ज्वारी खरेदी केल्यामुळे ज्वारीचे भाव पडले नाही. हे सर्व नाईकसाहेबांच्या प्रोत्साहनाने आणि क्रियाशील सहकार्याने शक्य झाले. शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी धान्य खरेदी करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले.

यशवंतराव मोहितेसाहेबांनी सूचविलेली वरील योजना नाईकसाहेबांना इतकी आवडली की, कृषी आणि सहकार या शेतकऱ्यांच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाच्या, जिव्हाळ्याच्या विषयावर त्यांच्याशी चर्चा करीत त्यांच्या कल्पनांचा-विचारांचा आदर करीत. त्या कल्पना ते नीट समजावून घेत. कृषी व्यवसायाला पूरक असा व्यवसाय म्हणजे दुग्ध व्यवसाय. एक चांगला जोडधंदा. पण महाराष्ट्रात गुजरातमधील 'आणंद' येथील दुधाच्या भरवशावर चालला होता. महाराष्ट्रातील दुग्ध उत्पादनाला प्रोत्साहन द्यायेच असेल, दुग्ध व्यवसाय वाढवायचा असेल तर म्हशीच्या व गाईच्या दुधाला सारखाच भाव द्यावा लागेल अशी भूमिका मोहितेसाहेबांनी घेतली व तशा आशयाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर ठेवला. त्यावर खूप वादंग उठले. कडाक्याची चर्चा झाली. अन्न-धान्याच्याबाबतीत जसा महाराष्ट्र स्वयंपूर्ण झाला तसाच तो दुधाच्याही बाबतीत झाला पाहिजे. शेतीच्या जोडीला ग्रामीण भागात जोडधंदा म्हणून हा प्रमुख व्यवसाय आहे. नाईकसाहेबांनी हे जाणले. आणि आवश्यकता पडल्यास सरकार आर्थिक बोजा उचलेल असे कबूल करून त्यांनी ही योजना कार्यान्वित केली. धान्य खरेदीच्याबाबतीत महाराष्ट्र जसा अग्रेसर राहिला तसाच दुग्ध व्यवसायाच्याबाबतीतही निर्णय घेणारे हे पहिले राज्य ठरले. त्याची परिणती श्वेत क्रांतीत झाली. आणि दूध विपुल प्रमाणात उपलब्ध

होऊ लागले.

पुसद येथील प्रगत कास्तकार व जुन्या पिढीतील नाईकसाहेबांचे स्थानिक राजकारणातील क्रियाशील कार्यकर्ते लक्ष्मणराव जाधव-पहेलवान हे नाईकसाहेबांच्या सहवासात आले. त्यांच्या ताकदीचा उपयोग नाईकसाहेबांनी शेतीत करवून घेतला. नाईकसाहेबांचा संजीवक सहवास-निसर्गाचे सानिध्य आणि शेतीतील कष्ट यामुळे लक्ष्मणराव जाधव यांच्या वृत्तीत बदल झाला. त्यांची शक्ती शेतीच्या कामी लागली. त्यांचा आणि त्यांच्या शेतीचा अक्षरश: कायापालट झाला. जेव्हा-जेव्हा नाईकसाहेब पुसदला आलेत. तेव्हा तेव्हा ते प्रामुख्याने शेती आणि शेतकरी याबाबत अतिशय आस्थापूर्वक चौकशी करीत असत. नाईकसाहेबांनी हायब्रीड ज्वारी पेरण्यासाठी लक्ष्मणरावांना प्रवृत्त केले. या ज्वारीची पेरणी त्यांच्या शेतात केल्यानंतर मुख्यमंत्री असतानासुद्धा त्यांच्या शेतात ज्वारीच्या पिकाची पाहणी करायला आलेत. हे संकरित बियाणे वाढले का? हे वातावरण त्याला मानवेल का? मात्र या बियाण्याचा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर त्यांचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहू लागला. लक्ष्मणराव जाधव पहेलवान यांनी सांगितलेल्या काही आठवणी नाईकसाहेबांच्या शेती आणि शेतकरी यांच्यावरील नि:सीम प्रेमाच्या द्योतक आहेत.

१९७० मध्ये नाईकसाहेब मुख्यमंत्री असताना त्यांनी लक्ष्मणरावांच्या शेतात बसराई-अर्धापुरी जातीच्या केळीचे बेणे आणून त्याबाबत वारंगा, जि. नांदेड येथील शेतकऱ्याला सांगितले आणि सोबत लागवडीची माहिती असणारी पुस्तिकासुद्धा दिली. त्या पुस्तिकेतील माहितीप्रमाणे लक्ष्मणरावांनी त्यांच्या शेतात केळीची लागवड केली. पुढे लक्ष्मणराव केळीचे विक्रमी उत्पन्न घेऊ लागले. बसराई-अर्धापुरी केळीची त्यांनी २५-२६ ची रास काढली. त्यानंतर हिवरा ता.महागांव येथील तेव्हाचे प्रगत कास्तकार एकनाथराव कदम यांच्या शेतातून 'हनुमान' जातीच्या केळी बेणे आणले. नाईकसाहेबांनी सांगितलेल्या तंत्रज्ञानाचा त्यांनी शेतीत विनियोग करून 'हनुमान' केळीचा किमान ७० ते ७२ किलोचा एकेक घड काढला आणि सातत्याने काढणे चालू आहे. त्यामुळे लक्ष्मणरावांच्या आयुष्याचा अक्षरश: कायापालट झाला.

त्यांच्या केळीच्या पिकाची प्रगती पाहून नाईकसाहेबांनी त्यांच्या पुसद नजीक असलेल्या सेलू येथील शेतातून लक्ष्मणरावांना मिरचीची रोपं दिलीत. आणि त्यांची लागवड करायला सांगितली. तेव्हा मिरच्या अतिशय कमी भावात विकल्या

जायच्या. अशाही परिस्थितीत लक्ष्मणरावांनी एकरी एक लाख पस्तीस हजार रुपयांची मिरची काढली. आणि तो एक कुतुहलाचा विषय ठरला होता. लोकांना याबाबत आश्चर्य वाटायचे. एवढ्यावरच न थांबता नाईकसाहेबांचे आवडीचे आणि अत्यंत विश्वासू कृषिशास्त्रज्ञ डॉ. मुकुंदराव गायकवाड ( पुणे ) यांना त्यांनी लक्ष्मणरावांच्या शेतावर पाठवून त्यांच्या शेतीची दखल घेतली. त्यामुळे त्यांच्या शेतीत विक्रमी उत्पन्न निघाले. त्याचे श्रेय ते नाईकसाहेबांना देतात.

लक्ष्मणरावांनी केळीच्या पिकाचे विक्रमी उत्पादन घेतल्याची दखल राज्यातील वृत्तपत्र आणि दूरदर्शन वाहिन्यांनी घेतली. राज्यभर तशी प्रसिद्धी दिली. याचा परिणाम असा झाला की, पुण्याचे प्रख्यात उद्योजक किर्लोस्कर यांनी कृषि-औद्योगिक प्रकल्पाच्या संदर्भातील लक्ष्मणराव जाधव यांची भूमिका जाणून घेतली. तद्वतच विको-वज्रदंतीचे मालक श्री. पेंढारकर वृत्तपत्राची कात्रणे घेऊन वस्तुस्थिती जाणून घेण्याच्या उत्कंठेने गोव्याहून थेट लक्ष्मणराव जाधव यांच्या पुसदच्या शेतात आले. केळीचा एकेक घड अतिशय बारकाईने न्याहाळू लागले. लक्ष्मणराव जाधव कोणते हे अगोदर त्यांच्या शेतातील गडी-कामगारांकडून विचारणा करून 'आपणच का लक्ष्मणराव जाधव?' अशी त्यांना विचारणा केली. त्यांच्या धोतर-सदऱ्यावरील केळीचे डाग आणि मळलेल्या कपड्यांकडे पाहून त्यांना विश्वास वाटेना. त्यांनी विको-वज्रदंतीचा मालक असल्याचे सांगून त्यांचे कार्ड लक्ष्मणरावांच्या हातावर ठेवले. सुट-बुटाची तमा न बाळगता त्यांनी केळीच्या बगिचाची पाहणी केली. आणि नंतर शेतातून बोलत-बोलत ते दोघे डांबरी रस्त्यावर असलेल्या त्यांच्या सफारी गाडीपर्यंत आले. लक्ष्मणरावांच्या यशाचं गमक त्यांनी विचारले असता लक्ष्मणरावांनी या यशाचं श्रेय नाईकसाहेबांना दिलं.

काही दिवसानंतर विको-वज्रदंतीच्या मालकाने मुद्दाम पुसदला येऊन त्यांच्या गाडीत बसवून लक्ष्मणरावांना नागपूरला नेले. त्यांच्या नागपूरनजीक असलेल्या शेतामध्ये केळीची लागवड केली होती. केळीची काळजी घेण्याच्यादृष्टीने जळगांव येथील केळीतज्ज्ञांनासुद्धा त्यांनी बोलविले होते. तेथे उपस्थित केळीतज्ज्ञांसमक्ष लक्ष्मणरावांना केळीच्या विक्रमी उत्पादनाबाबत अनुभव कथन करायला सांगितले. लक्ष्मणरावांनी नाईकसाहेबांकडून ते जे शिकले आणि कृतीत आणले ते तेथे सांगितले. यानंतर लक्ष्मणरावांना पुणे, जळगांव, सांगली, परभणी, अकोला व नाशिक येथे केळीचे उत्पादन काढणारे शेतकरी त्यांच्याकडे घेऊन गेले. त्यांच्या केळीची पाहणी करून झाल्यानंतर त्यांनी लक्ष्मणरावांना यशाचं कारण विचारलं

असता- त्यांनी नाईकसाहेबांच्या मार्गदर्शन आणि सहकार्यामुळेच हे शक्य झाल्याचे सांगितले. नाईकसाहेबांमुळे त्यांची प्रगती झाल्याचे ऐकताच शेतकऱ्यांनीदेखील अधिकच जवळीक दाखविली. आणि हा सगळा नाईकसाहेबांना मानणारा शेतकऱ्यांचा वर्ग होता हे सिद्ध केले. त्या शेतकऱ्यांनी लक्ष्मणरावांना त्यांच्यासमवेत नाईकसाहेबांची संग्रही असलेली छायाचित्रे दाखविलीत.

राजकारण-समाजकारण यापेक्षा अधिक वेगळ्या भूमिकेने नाईकसाहेब फक्त शेती आणि शेतकऱ्यांचा ध्यास घेऊन त्यांची भरभराट कशी करता येईल या विचारात मग्न असायचे. दुष्काळाच्या दाढेतून राज्याला कसे वाचविता येईल याची त्यांना चिंता होती. लक्ष्मणराव नाईकसाहेबांना जेव्हा जेव्हा भेटायचे, तेव्हा नाईकसाहेब त्यांना मुला-बाळांपेक्षाही अधिक आपुलकीने शेतीविषयक प्रश्न विचारत असत. याच आपुलकीपोटी राज्याचे मुख्यमंत्री असलेले नाईकसाहेब लक्ष्मणरावांसारख्या धोतराला गाठी असणाऱ्या शेतकऱ्याला कधीच विसरले नाहीत. असेच एकदा नाईकसाहेबांना भेटण्यासाठी ते मुंबईला गेलेत. त्यापूर्वी त्यांनी मुंबई कधीच पाहिली नव्हती. धोतराला गाठी आणि सदऱ्यावर केळीच्या पानांचे डाग अशा पोषाखात ते मुंबईला गेलेत. मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' बंगल्यावर गेल्यानंतर लक्ष्मणरावांच्या बाजुला काही अधिकारी टापटीप पोषाखात उपस्थित होते. मुख्यमंत्र्याच्या नोकराला लक्ष्मणरावांनी 'पुसदहून लक्ष्मण जाधव आला' म्हणून नाईकसाहेबांना निरोप द्या असे सांगितले. हा निरोप मिळताच नाईकसाहेब त्यांच्या बंगल्याच्या बाहेर पैदल चालत आलेत. आणि पोषाखातील अंतर बाजूला करून लक्ष्मणरावांना कडाडून भेटले. हाताला धरून बंगल्यावर नेले. बंगल्यातील मखमली खुर्चीवर बसायला सांगितले. अन् बसल्याबरोबर 'कशी आहे शेती?' असा प्रश्न विचारला. क्षणार्धात पोषाखातील अंतर गळून पडले. आणि सभोवती उभा असलेला अधिकारी वर्ग अवाक् झाला.

असेच एकदा नाईकसाहेब पुसदला आले असताना मनोहर वानरे हा कास्तकार रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतातील धुऱ्यावर हातात खोरं घेऊन उभा असलेला नाईकसाहेबांनी पाहिला. आणि जाता-जाता त्याला जीपगाडीतून नमस्कार केला. वानरे भांबावून गेले. वानरेंनी सर्व घटनाक्रम लक्ष्मणरावांना सांगितला. लक्ष्मणरावांनी त्यांना सांगितले, ''नाईकसाहेबांनी तुला नमस्कार न करता तुझ्यातील शेतकऱ्याला नमस्कार केला.'' नाईकसाहेबांच्या विरुद्ध पार्टीचा असलेला तो शेतकरी विचार करू लागला. आणि नाईकसाहेबांना धन्य-धन्य

म्हणून गौरवू लागला.....

या उदार अंत:करणाच्या नेत्याने आयुष्यभर देण्याचेच काम केले. कशाचीही अपेक्षा केली नाही. त्यांच्या हृदयाच्या कप्प्यातला एक आंतरकप्पा म्हणजे शेतकरी ! आंतरिक ओलाव्याने त्यांनी शेतकऱ्याला मार्गदर्शन आणि सहकार्य केले. एका अर्थाने ते शेतकऱ्यांचे मसिहा ठरले. जीवाला जीव देणारा हाडाचा माणूस त्यांनी तयार केला. केवळ विदर्भातच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील शेतकरी शेतीनिष्ठ केला. काळ्या मातीचं देणं घेण्याचं त्याला शिकविलं. राक्षसासारखा जबडा काढून बसलेला दुष्काळ मी नष्ट करेन, असा त्यांना आत्मविश्वास होता. त्यांच्या एका शब्दात जीवाचं रान करणारा शेतकरी त्यांच्या पाठीमागे असल्यामुळे ''जर मी दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्याच्याबाबतीत स्वयंपूर्ण करू शकलो नाही तर मला रस्त्यावरील खांबावर लटकवून फाशी द्या!'' अशी त्यांनी भीष्म प्रतिज्ञा केली. नाईकसाहेबांना खांबावर कसे लटकवू द्यायचे? या एकाच धास्तीने पेटून उठलेला शेतकरी शेतीशी एकरूप झाला. आणि नाईकसाहेबांच्या प्रतिज्ञेला वास्तविक रूप देण्यात यशस्वी झाला. माझा शेतकरी मला मरू देणार नाही. याची नाईकसाहेबांना जाण होती. एवढा प्रबळ विश्वास त्यांचा शेतकऱ्यांवर आणि शेतकऱ्यांचा त्यांच्यावर होता. शेतीशिवाय शेतमालाचाही विचार त्यांनी केला. वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, विखे पाटील आणि नाईकसाहेब यांच्या अथक परिश्रमाने महाराष्ट्राचे सहकार खाते निर्माण झाले व नावारुपाला आले. आज आशिया खंडातील सर्वात मोठे सहकार क्षेत्र महाराष्ट्रात आहे. या ध्येयवेड्या नेत्यांना राज्याच्या विकासाचा ध्यास होता. नाईकसाहेबांनी तत्कालीन सहकारमंत्री यशवंतराव मोहिते यांच्या सहकार्याने 'एकाधिकार कापूस खरेदी योजना सुरू करून पांढऱ्या सोन्याला न्याय दिला.' आज शेतकऱ्यांची स्थिती पाहता डोळ्यात पाणी येते. आणि तेवढ्याच प्रकर्षाने नाईकसाहेबांची आठवणही होते.

''पिकांकडे आपल्या लेकरांप्रमाणे पाहा, त्याला पाण्यावाचून तडफडत असल्याचा भाव मनात ठेवून जशी मनाची स्थिती होते; आणि त्याच्यासाठी आपण जी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो त्याच पोटतिडकीने पिकांना वेळोवेळी घागरीने पाणी घालून फुलवा'' म्हणणारा शेतकऱ्यांचा नेता मरतानासुद्धा हातात एक रोपटं घेऊन आमच्यातून निघून गेला. नाईकसाहेबांपासून प्रेरणा घेऊन चंद्रमौळी झोपडीत राहणारे लक्ष्मणराव जाधव आज पुसद परिसरातील एक प्रगत आणि सधन

कास्तकार आहेत. ही सगळी हरितक्रांतीची किमया.

नाईकसाहेबांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात कृषी उत्पादनाला विशेष सहाय्य मिळाले. मुख्यमंत्रीपदाची आपली विहीत जबाबदारी यशस्वीरितीने पार पाडीत असतानाच शेती क्षेत्रात नाईकसाहेबांनी केलेले प्रयोग व घेतलेले परिश्रम खरोखरच वाखाणण्यासारखे आहेत. लोकनायक बापुजी अण्यांसारख्या थोर नेत्यांनी त्यांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. बापुजी अणे म्हणतात, ''त्यांनी एखाद्या कृषी तज्ज्ञांसारखा शास्त्रीय सल्ला, शेतकरी म्हणून जो आपला खास अनुभव आहे; त्याची जोड देऊन शक्य तितक्या अल्पावधीत महाराष्ट्र राज्यात समाविष्ट झालेल्या मराठवाडा-विदर्भ इ. भागातील शेतकऱ्यांना दिला.'' नाईकसाहेबांच्या कार्यकाळात महाराष्ट्राने अन्न-धान्याच्या बाबतीत केलेली कामगिरी अभूतपूर्व अशीच म्हणावी लागेल. या कामगिरीतूनच भारत आर्थिक बाबतीत स्वावलंबी होण्याच्या कामाला गती प्राप्त झाली. या संदर्भात ते पुढे म्हणतात, ''वसंतरावांच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्या कल्पकतेमुळे व कृषी उत्पादन वृद्धीचे कार्य यशस्वी झाले तर महाराष्ट्रातील जनता आजच्यापेक्षा अधिक डोके उंच करून मोठ्या अभिमानाने दिल्लीच्या राजपदावरून कार्य करू शकेल.'' बापूजी अण्यांनी केलेले हे भाकीत पुष्कळ अंशी खरे ठरले आहे. केंद्राच्या राजकारणात मराठी अस्मिता आज मोठ्या दिमाखाने मिरविताना आपणाला दिसत आहे. १९६० साली महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर मुख्यमंत्रीपदावर एखादा दुसरा अपवाद वगळता शेतकरी कुटुंबातून आलेल्या नेत्यांनीच राज्याचे मुख्यमंत्रीपद विभूषित केले. मात्र नाईकसाहेबांनी ज्या शेतीचा विचार केला तसा विचार कोणी फारसा केलेला नाही. सुप्रसिद्ध समाजवादी विचारवंत ना. ग. गोरे यांनी केलेले हे विधान नाईकसाहेबांच्या कार्याचा यथोचित गौरव करणारे आहे.

गोरे यांनी पुढे जाऊन वरील संदर्भात केलेले विवेचनही चिंतनीय आहे. ''महाराष्ट्रातील शेतीला मुख्य गरज आहे ती पाण्याची, पाण्याचा जास्तीत जास्त वापर कसा केला जाईल याबद्दल अडाखे वसंतरावांनी आपल्या अवलोकनाने व अनुभवाने निश्चित केले असावेत. आणि महाराष्ट्रातील अन्न-धान्याची टंचाई हे एक आव्हान समजून त्याला तोंड देण्याचा त्यांनी निश्चय केलेला होता.'' 'हाताला काम आणि शेतीला पाणी' हे जणू नाईकसाहेबांच्या कार्याचे सूत्र होते. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात नाईकसाहेबांनी कृषी, सहकार आणि राजस्व या विविध खात्यांची जबाबदारी लीलया सांभाळली. मात्र ते रमले कृषी खात्यात. शेतकऱ्यांना संपन्न

पाहण्याचे स्वप्न ते सतत पाहत राहिले. ऑक्टोबर १९५८ मध्ये त्यांनी वत्सलाबाई-समवेत सपत्नीक चीन आणि जपानचा दौरा केला. सिंगापूर आणि कोलंबो येथे थांबून या भेटीत त्यांनी कापसावरील प्रक्रिया उद्योगाचा विशेषत्वाने अभ्यास केला. उत्तर भारतीय राजकारणातील एक वादळी व्यक्तिमत्त्व असलेले माजी पंतप्रधान चरणसिंग यांना शेतकऱ्यांचा मसिहा म्हटले जाते. त्यांचा हा गौरव यथायोग्यही असेल, चौधरी चरणसिंगांनी 'शेती आणि ग्रामीण अर्थशास्त्र' या विषयावर काही पुस्तके लिहिलीत. नाईकसाहेबांना राजकारणाच्या धकाधकीत अशी वाङ्मय-निर्मिती करणे शक्य झाले नाही. मात्र प्रसंगोपात त्यांनी केलेल्या व्याख्यानावर आधारित 'आवाहन' हे पुस्तक दिनेश देसाई यांनी प्रसिद्ध केले. पां. वा. गाडगीळांसारख्या पत्रपंडितांची त्यास विवेचक प्रस्तावना आहे. त्यात शेती विषयीची जी भाषणे आहेत ती मुळातून वाचावी इतकी मौलिक आहेत. नाईकसाहेबांचे शेतीविषयक ज्ञान पढीक नव्हते. त्यात पुस्तकीय पांडित्य नव्हते. शेती प्रश्नाविषयी असणारी पोटतिडीक-आत्यंतिक जिव्हाळा, शेतीवर स्वतः केलेले प्रयोग यातूनच त्यांचे व्याख्यान फुललेले असायचे. ते एक प्रकट चिंतनच होते. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात शेतीसंबंधात नाईकसाहेबांनी अत्यंत मूलगामी स्वरुपाचे निर्णय घेतले. प्रसिद्धीच्या झोतात ते राहतील याची फारसी काळजी त्यांनी घेतली नाही. उलट शेतकरी ताठ मानेने आपल्या पायावर उभा राहील याची काळजी मात्र वाहिली. 'शेतकरी हा महाराष्ट्र राज्याच्या सामर्थ्याचा कणा आहे. मूठभर उद्योगधंदे हे महाराष्ट्र राज्याचे खरे स्वरूप नव्हे. शेतीमध्ये आपण मागाल ते मिळू शकते. त्याच्यामध्ये रक्त आटवणारा, घाम गाळणारा माणूस हवा; असे ते म्हणत.

माजी केंद्रीय कृषिमंत्री कै.अण्णासाहेब शिंदे आणि नाईकसाहेब यांचे सूर शेतीविषयी वाटणाऱ्या जिव्हाळ्यातूनच जुळले.

**मधूर हे भावबंध ।**
**फुलवी जीवन गाणे ।।**
**बहरुनी ये वसंत ।**
**फुलवी हिरवे लेणे ।।**

त्यांनी या संदर्भात एक चांगली आठवण सांगितली आहे. अण्णासाहेब कृषिमंत्री असताना म्हणजे १९६२ ते १९८० या कालखंडात केंद्रीय कृषिखाते देशातल्या मुख्यमंत्र्यांच्या बैठका, धान्योत्पादन वाढीसाठी घ्यायचे. त्यांवेळी

नाईकसाहेबांचे जे भाषण व्हायचे त्या तोडीचे भाषण कोणताच मुख्यमंत्री करीत नसे. आधी पंडितजी, नंतर शास्त्रीजी आणि मग इंदिराजी त्यांच्या शेतीविषयक भाषणांनी प्रभावित झालेले मी पाहिले आहेत असे अण्णासाहेबांनी अगदी मन:पूर्वक सांगितले. नाईकसाहेबांनंतर मुख्यमंत्री झालेल्या श्री. शंकरराव चव्हाण यांच्याहस्ते वसंतराव नाईक कृषी विकास प्रतिष्ठानने नाईकसाहेबांच्या जयंतीला मुंबईच्या के. सी. महाविद्यालयात पराक्रमी शेतकऱ्यांना मानाचा मुजरा करून घसघशीत असे पुरस्कार वितरीत केले. त्याविषयी नाईकसाहेबांच्या कार्याचा गौरव करताना शंकररावांनी आपल्या तीस वर्षाच्या राजकीय जीवनाच्या अनेक आठवणी सांगितल्या, त्यावेळी ते म्हणाले, ''महाराष्ट्राची शेती समृद्ध करायची असेल तर नुसते यंत्र तिथे नेऊन चालणार नाही. शेतीत आणि शेतकऱ्यात समरस होणारा कार्यकर्ताही तिथे गेला पाहिजे.'' असे सांगून शंकररावांनी एक आठवण सांगितली. आणि कार्यक्रमात मोठी खसखस पिकली. मुंबईच्या पशुवैद्यक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना 'गाय' हा प्राणीच माहीत नव्हता. स्वत:चा अनुभव त्यांनी सांगितला. पुस्तकी ज्ञान आणि व्यवहारी ज्ञान यामध्ये केवढा मोठा फरक आहे! गाय न पाहिलेले पशुवैद्यक ग्रामीण भागात पशुधन कसे वाढविणार? त्याची निगा कशी राखणार? नाईकसाहेब सांगायचे की, ''शेती यंत्राने आणि तंत्राने होणार नाही, आणि मंत्रानेही होणार नाही. शेतीत गाडून घेतल्याशिवाय ती फुलत नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीत मी बसलेला असलो तरीदेखील मी शेतीच्या बांधावर बसलेला आहे.'' असे ते नेहमी म्हणायचे. यासंदर्भात एक आठवण अशीच वेधक आहे.

पावसाळा सुरू झाला होता, पण पाऊस पडत नव्हता. चातक पक्षासारखे शेतकरी डोळ्यात प्राण आतून पावसाची वाट पाहत होते. आणि एकदा आकाशात काळ्या ढगांची गर्दी जमली, धो-धो पाऊस पडू लागला. नाईकसाहेबांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. अतिशय आनंदाने आपला शिपाई महंमद याच्या हाती शंभराची नोट देऊन त्याला त्यांनी पेढे आणण्यासाठी पिटाळले. पाऊस पडला म्हणून पेढे वाटणारा हा मुख्यमंत्री जगावेगळाच म्हणावा लागेल. त्यावेळी सुधाकरराव नाईक यवतमाळ जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांना मुंबईहून नाईकसाहेबांनी फोन केला. मुख्यमंत्र्यांचा फोन म्हणून सुधाकररावांनी मोठ्या लगबगीने फोन घेतला. फोनवरून नाईकसाहेबांनी विचारले, ''इकडे मुंबईमध्ये पाऊस सुरू आहे, तिकडे आपल्या जिल्ह्यात पावसाची काय स्थिती आहे?''

इकडेही पाऊस सुरू आहे, असे सुधाकररावांनी सांगताच अतिशय आनंदाने आणि हर्षोल्लासाने सुधाकररावांच्या वक्तव्याला त्यांनी दाद दिली. पाऊस आणि नाईकसाहेबांचे मोठे अतूट नाते होते.

सुप्रसिद्ध नाटककार, ज्येष्ठ पत्रकार, माजी खासदार विद्याधर गोखले यांनी नाईकसाहेबांचे वर्णन 'हिरवा माणूस' या समर्पक शब्दात केलेले आहे. नाईकसाहेबांच्या धर्मपत्नी कै. श्रीमती वत्सलाबाई नाईक यांचे छोटेखानी जीवनचरित्र लता राजे यांनी लिहिले असून त्या 'कर्तबगार जीवनाची सावली' या चरित्र ग्रंथात १९६६ साली नाईकसाहेबांच्या वर्धापनदिनी त्यांनी नाईकसाहेबांच्या घेतलेल्या मुलाखतीचा अंश दिलेला आहे. श्रीमती राजे यांनी नाईकसाहेबांना, मनापासून दाद द्यावी असा कोणता क्षण तुमच्या जीवनात असू शकतो? असे विचारले. श्रीमती राजे यांची अशी कल्पना होती की, विधान सभेत प्रश्नोत्तराच्या तासात विरोधकांना त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची बिनतोड-तर्कसंगत अशा प्रकारची उत्तरे देऊन त्याच्यावर मात करण्याचा, त्यांना नामोहरम करण्याचा प्रसंग असेल. त्याचे वर्णन ते करतील. तथापि क्षणाचाही विलंब न लागू देता नाईकसाहेब म्हणाले, ''आधी पावश्ये ओरडून जातात, मग चाहुलही न लागता, शिरीषाचे प्रचंड वृक्ष गुलाबी फुलांच्या तुऱ्यांनी लहडतात, पाखरांची, अगदी मुंग्याचीही लगबग सुरू होते......... पत्ता नसतो फक्त मनुष्य प्राण्याला, मग एक दिवस ध्यानीमनी नसताना पश्चिमेला काळे ढग जमू लागतात. सर्वत्र पिवळट संधीप्रकाश भरून राहतो. आणि पाहता-पाहता पाणकळा येतात. तो क्षण फक्त दादच घेतो. असे नाही तर मला जिंकून जातो.'' नाईकसाहेब हिरवा माणूस कसे होते हे समजून घ्यावे. पावसाच्या सुरुवातीला पावश्या नावाचा पक्षी सारखा ओरडत जातो. त्याच्या ध्वनीवरून 'पेर्ते व्हा' असे शब्द प्रतिबिंबीत होतात. पावश्ये ओरडून गेले की, शेतकरी पेरणीची तयारी करतात. पावसाची चाहूल ज्या पक्षाला अगोदर लागते त्या पक्षाला 'पावश्या' म्हणतात. त्या पक्षावर आधारित कवी अनिलांची 'पेर्ते व्हा' या नावाची एक नितांत सुंदर अशी कविता आहे.

नाईकसाहेबांनी घडवून आणलेल्या हरितक्रांतीमुळे शेतकरी जागा झाला. संघटित झाला. आपल्या न्याय्य हक्कासाठी प्रसंग विशेषी आंदोलन करू लागला. नाईकसाहेबांचे शेतीप्रेम केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशात आणि विदेशातसुद्धा परिचित होते. प्रभावशाली कवी गोविंदाग्रज महाराष्ट्राचे वर्णन करताना म्हणाले, ''दगडाच्या देशा, राकट देशा-कणखर देशा' ते यथार्थ आहे. डोंगरदऱ्यामध्ये

पसरलेले महाराष्ट्राचे बहुतेक जिल्हे दुष्काळग्रस्त होते. वारंवार दुष्काळाची सत्त्वपरीक्षा देणारा महाराष्ट्र हिरवागार झाला पाहिजे हे नाईकसाहेबांचे स्वप्न होते.

पुसद येथील वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठानने येथील हिंदी वाचनालयाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरलेले श्री. निशिकांत मुगुटकर नाईकसाहेबांचे या संदर्भात वर्णन करताना म्हणतात, ''नाईकसाहेब हे शेतीवेडे मुख्यमंत्री होते. तशी प्रतिमा त्यांनी सिद्ध केली. आपले हिरवे स्वप्न साकार करण्यासाठी शेतीला पाणी मिळाले पाहिजे. शेती ओलिताखाली आली पाहिजे. आणि त्यासाठी जलसिंचन योजना, छोटे-छोटे बंधारे, धरणे ह्यांचा विकास झाला पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी विस्तीर्ण जलाशये त्यांनी जाणीवपूर्वक निर्माण केलीत. 'पाझर तलाव' ही नाईकसाहेबांचीच कल्पना होय. या जलाशयामुळे आणि पाझर तलावांमुळे विहिरींना तर पाणी मिळालेच, शिवाय यामुळे पिकांसाठी, शेतीसाठीसुद्धा पाणी उपलब्ध झाले. ठिकठिकाणी छोटे-छोटे बंधारे निर्माण करून 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना पुढे आणली. या छोट्या बंधाऱ्यांना आजही 'वसंत बंधारे' याच नावाने संबोधले जाते. दुष्काळावर कायमची मात करून हरितक्रांतीकडे महाराष्ट्राला नेणारा नेता म्हणजे वसंतराव नाईक होय.

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी एकदा म्हणाले होते, ''श्रीमंत शेतकरी ही कविकल्पना आहे. एखादा माणूस श्रीमंत शेतकरी असेल तर तो शेतकरी असणार नाही. थोडक्यात हा वदतोव्याघात आहे. असेच त्यांना म्हणायचे होते. मात्र आज शेती विकासातून निर्माण झालेली समृद्धी आणि संपन्नता यामुळे पश्चिम- महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्याचा काही भाग यांचा कायापालट झालेला पाहायला मिळतो. सिंचनाचा अनुशेष भरून काढण्याच्या निमित्ताने लोकप्रतिनिधींच्या आग्रहास्तव विधी मंडळाचे विशेष अधिवेशन शासनाला बोलवावे लागले. एवढी जागरुकता शेती प्रश्नांच्या संदर्भात लोकांमध्ये निर्माण झाली आहे. कृषिक्रांतीचा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे 'निर्वाहापुरती शेती' हा दृष्टिकोन मागे पडून 'व्यापारी शेती' हा दृष्टिकोन शेतकऱ्यांमुळे येईल. त्रुटीचा अन्न संकल्प मागे पडून वाढीचा अन्न संकल्प विचारात घ्यावा लागेल असा आशावादी विचार 'अन्न-धान्य धोरण आणि कृषिविकास' या ग्रंथास नाईकसाहेब यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत व्यक्त केला होता. सदरचा ग्रंथ महाराष्ट्र राज्य सहकारी अधिकोषामार्फत प्रसिद्ध करण्यात आला होता. शरद जोशी यांनी श्रीमंत शेतकरी ही जी संकल्पना मांडली होती. नाईकसाहेबांनी या

प्रस्तावनेत शेतकरी असूनही श्रीमंत! हा विचार मांडून जसा आशावाद प्रकट केला तसेच फार पूर्वीच जोशी यांच्या प्रश्नाला उत्तरही देऊन टाकले आहे. एखाद्या घटनेकडे तुम्ही कोणत्या भूमिकेतून पाहता ही भूमिका सकारात्मक आहे की नकारात्मक आहे यावर तुमचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. या संदर्भात नेहमी एक गोष्ट सांगितली जाते- काचेच्या दोन ग्लासामध्ये ते अर्धे भरले जातील असे पाणी ओतले तर त्याचे वर्णन दोन पद्धतीने करता येईल. ग्लास अर्धा रिकामा आहे असेही म्हणता येईल आणि ग्लास अर्धा भरलेला आहे असेही म्हणता येईल. पहिला दृष्टिकोन निराशावादी आहे. तर दुसरा दृष्टिकोन आशावादी आहे. माणसाने नेहमी आशावादी असावे. हीच भूमिका घेऊन नाईकसाहेबांनी शेतकऱ्यांमध्ये चैतन्य निर्माण केले. या हरितक्रांतीमुळे कृषि व्यवस्थेत एक नवे तत्त्व, एक नवा विचार रुजणार आहे. ''आपली बरीच शेती ही निर्वाहापुरती शेती होती. आजवर पुरत होती. शेतीतून केवळ स्वत:पुरतेच उत्पादन काढण्याची महत्त्वाकांक्षा न बाळगता त्या शेतीतून पिकाऊ माल निर्माण झाला पाहिजे व त्यामुळे शेतकऱ्याला आपली परंपरागत गरिबी नष्ट करण्याची संधी लाभली पाहिजे. शेतकरी असूनही श्रीमंत असे नवे तत्त्व प्रस्थापित झाले पाहिजे.'' असे नाईकसाहेब आग्रहपूर्वक सांगत असत. त्यांच्या दृष्टिकोनातून कृषिक्रांती म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतीविषयक दृष्टिकोनात मूलभूत बदल करणे (Change in outlook of the cultivater) शेतकऱ्याचे पारंपरिक पद्धतीने, निसर्गाच्या लहरीवर व जमिनीच्या मगदुरावरच केवळ भिस्त ठेवणारी शेतीची पद्धत बदलून आधुनिक आणि शास्त्रीय पद्धतीने शेतीचा विकास केल्याशिवाय कृषिक्रांतीच्या कार्यक्रमात केवळ उन्नत आणि संकरित बियाणे व सुधारलेली शेतीपद्धती यांनाच महत्त्व दिले नसून उपसा जलसिंचन योजना, मृदसंधारण, शेतीविषयक कायदे, सहकारी अर्थ व्यवस्थेच्या सवलती या साऱ्या योजनांतून शेतकऱ्याला कृषिविकास साधता यावा असाच हा कृषिक्रांतीचा प्रयोग होता आणि प्रयत्न होता. कृषिक्रांतीचे हे यश शेतकरी, कृषिसंशोधक, कृषिविस्तार अधिकारी आणि सहकारी अधिकोष या चौघांच्या समन्वयाने सिद्ध होणार आहे, असे ते सांगत. भागीदारीत चाललेला जसा व्यापार असतो, एखाद्याचे श्रम, दुसऱ्याचा पैसा, तिसऱ्याची जागा आणि चौथ्याचे मार्गदर्शन आणि व्यापारी कौशल्य यातून जसा एखादा व्यापार-उद्योग उभा राहतो. तसाच शेताचाही हा व्यापार-उद्योग या समन्वयापासून आकाराला येईल, असे नाईकसाहेबांना वाटत असे.

सुदैवाने नाईकसाहेबांच्या या आवाहनाला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी मनापासून चांगला प्रतिसाद दिला. कृषिक्रांतीचा हा मूळ हेतू त्यांना पटला आणि नव्या जोमाने, उत्साहाने व जिद्दीने शेतकरी बांधवांनी ही कृषिक्रांती महाराष्ट्रात घडवून आणली. जगात झालेल्या सर्व क्रांत्या ह्या रक्तलांछित होत्या. महाराष्ट्रातील ही कृषिक्रांती मात्र शेतकऱ्यांच्या निढळाच्या घामातून निर्माण झाली. शेतकऱ्यांच्या स्वेदगंगेतून महाराष्ट्रात एक कर्मतीर्थ उभे राहिले. पुसदचे लोकशाहीर भाऊराव पाटील चोंढीकर नाईकसाहेबांचा गुणगौरव करताना एकदा म्हणाले, ''हरितक्रांतीच्या ओंकारातून तुझेच घडले आम्हां दर्शन.'' भ्रांतचित्त झालेल्या अर्जुनाला भगवान श्रीकृष्णाने कुरूक्षेत्रावर गीता सांगितली. त्याला नि:शंक केले, तो युद्धाला तयार झाला आणि त्या भारतीय युद्धात त्याला विजयही प्राप्त झाला. परंतु गीतेतील तत्त्वज्ञान इतके सीमित राहिले नाही. पाच हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडामध्ये माणसाच्या मनाची ज्या ज्या वेळेला अर्जुनावस्था होते, त्या त्या वेळी त्याला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर त्याला गीतेत सापडते. प्रवचनकार नेहमी या संबंधात एक दाखला देतात; गाईला पान्हा फुटतो तो वासरासाठी, वासराचे तर पोट भरतेच परंतु दूध-दुभत्याच्याबाबतीत सगळ्या घरा-दाराची चंगळ होते. स्वत:च्या कुटुंबापुरती शेती करणारा शेतकरी आत्मकेंद्रीत होता. आपल्या कुटुंबाचे पोट भरले की, त्याच्यातच त्याला समाधान होई. नाईकसाहेबांच्या हरितक्रांतीच्या प्रयोगातून त्याच्यातला पुरुषार्थ जागा झाला. त्याचा दृष्टिकोन विशाल बनला. आपण केवळ शेतकरी नाही, आपण अन्नदाते आहोत. राष्ट्राचे पोषण करण्याचे दायित्व आपले आहे. या विचाराने तो प्रेरित होऊन शेतीकडे पहायला लागला. एक नवीन गीता नाईकसाहेबांनी सांगितली, असे म्हटल्यास ते चुकीचे ठरू नये. नाही तरी नव्या युगसंदेशाला 'गीता' संबोधण्याची प्रथाच आहे आणि कोणतीही 'गीता' हे जीवन जगण्याचेच तत्त्वज्ञान आहे. हा कृषिक्रांतीचा प्रयोग जसजसा अधिक यशस्वी होईल तसतसे आपले अन्नधोरण बदलत जाईल... अन्नधान्यातील तूट नाहीशी होऊन उलट अन्नवृद्धीचा विचार राष्ट्राला नवे बळ देईल. लाचारीने अन्नधान्याची आयात करावी लागणार नाही. उलट आपली अस्मिता प्रकट करणारी धान्य निर्यात आपण करू शकू.

## पंचायतराज कल्पनेचे जनक

शेतीवेडा मुख्यमंत्री म्हणून नाईकसाहेबांचा लौकिक मोठा आहे. त्यांच्या

कार्यकाळात शेती आणि शेतकरी यांच्याकडे विशेषत्वाने लक्ष देण्यात आले. आणि त्यातून महाराष्ट्रात कृषिक्रांतीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. हे निर्विवादपणे खरे आहे. तथापि याशिवाय नाईकसाहेबांनी केलेले काही कार्य अत्यंत मोलाचे असून याकडे दुर्लक्ष करण्यासारखे नाही. नाईकसाहेबच 'पंचायतराज समितीचे' अध्यक्ष होते. त्यांनी सादर केलेल्या अहवालाप्रमाणे महाराष्ट्रात 'पंचायतराज' निर्माण झाले. यात जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांची स्थापना झाली. नागरी सुविधांसाठी जशी नगर पालिका आणि महानगर पालिका तशी ग्रामीण भागाच्या विकासासाठी 'पंचायतराज'. सत्तेच्या विकेंद्रीकरणात खरं तर लोकशाहीच्या विस्तारीकरणाचा हा प्रयोग नाईकसाहेबांच्या कार्यकुशल नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सुरू झाला, रूजला आणि लोकप्रियही झाला. याचा अर्थ तो पूर्णत: निर्दोष आहे, असा नाही. लोकशाही व्यवस्थेत जे दोष आहेत ते याही व्यवस्थेत आहेत. भारत हा खेड्यांचा देश आहे, असे गांधीजी म्हणत. म्हणून 'खेड्यांकडे चला' हा गांधींजींचा नारा होता. खेडी विकसित झाली म्हणजे देश विकसित होतो. ग्रामीण साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. आनंद यादव यांच्या मते "आमची खेडी ही संस्कृतीची आणि साहित्याची नवी केंद्रे आहेत." या पंचायतराजमधून निर्माण झालेले ग्रामीण नेतृत्व केवळ त्या खेड्यापुरते सीमित न राहता राज्य पातळीवर पोहोचले आणि महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि पुरोगामी राज्याचे नेतृत्व करून गेले. पुसद तालुक्यातील त्या काळातील मागास भागातील डोंगर कपारीत असलेल्या 'गहुली' या छोट्याशा खेड्यातील भटक्या विमुक्त जातीत जन्माला आलेले नाईकसाहेब महाराष्ट्राचे दीर्घकाळ मुख्यमंत्री राहिलेत. नाईकसाहेबांचे पुतणे सुधाकरराव नाईक गहुलीचे सरपंच, पुसद पंचायत समितीचे सभापती, यवतमाळ जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, आमदार, राज्यमंत्री, मंत्री आणि मुख्यमंत्री अशा चढत्याक्रमाने त्यांनी महाराष्ट्राला समर्थ नेतृत्व दिले. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे लातूर जिल्ह्यातील 'बाभळगांवचे' सरपंच होते. यशवंतराव चव्हाण हे सातारा जिल्ह्यातील 'देवराष्ट्रे' ह्या गावचे तर वसंतदादा पाटील हे सांगली जिल्ह्यातील 'कवठे' या ग्रामीण भागातून आलेले नेतृत्व होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेले एखादा दुसरा अपवाद वगळता जवळजवळ सर्व मुख्यमंत्री ग्रामीण भागातूनच आलेले होते. सुधाकरराव नाईकांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना लाल दिव्याची गाडी दिली. राज्यमंत्र्यासारखा दर्जा दिला. ग्रामीण भागातून निर्माण झालेल्या नेतृत्वाला प्रतिष्ठा

प्राप्त झाली पाहिजे. ही त्या पाठीमागील भूमिका होती. ग्रामीण भागाच्या प्रश्नांची चांगली जाण असल्याखेरीज त्या प्रश्नांचे निराकरण करता येणार नाही. लोकशाही व्यवस्था झिरपत झिरपत वाडी-तांड्यांपर्यंत गेली पाहिजे, खेडी स्वावलंबी बनली पाहिजे; अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण आणि आरोग्य या प्राथमिक गरजांची परिपूर्ती या पंचायत राजच्या माध्यमातून झाली पाहिजे. आणि म्हणून आज प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे अशा महत्त्वाच्या बाबींची व्यवस्था पंचायत राजच्या माध्यमातून होताना दिसते. आज हे कार्य तितकेसे नीटपणाने चाललेले नाही. हे खरे आहे. पण तो अंमलबजावणीतील व्यवस्थेचा दोष आहे. मूळ हेतूबद्दल शंका घेण्याचे काही कारण नाही. महाविद्यालयात आणि विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना नावाचा एक रचनात्मक उपक्रम असतो. त्याला N.S.S. असे तर राष्ट्रीय छात्र सेनेला N.C.C. असे संबोधण्यात येते. N.C.C. Stands for defence and N.S.S. stands for service. असे म्हणतात. महाविद्यालये आणि विद्यापीठे यांच्याजवळ विद्यार्थ्यांच्या रुपाने प्रचंड मनुष्यबळ असते. हे मनुष्यबळ विधायक कार्यात विनियोजित करावे असा या मागचा हेतू आहे. अशा विद्यार्थ्यांचे दहा दिवसाचे एक शिबिर ग्रामीण भागामध्ये घेण्याविषयी कटाक्ष असतो. शहरातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी खेड्यात दहा दिवसपर्यंत वास्तव्य करावे, ग्रामीण जीवन जवळून न्याहाळावे, त्या जीवनातील प्रश्न सहानुभूतीने समजून घ्यावे, या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी उत्तरे शोधावीत. आणि शक्य झाल्यास त्यातील एखादा प्रश्न हाती घेऊन श्रमसंस्काराच्या माध्यमातून सेवाभावीवृत्तीने तो प्रश्न सोडवावा. पंचायतराजमध्येदेखील हाच हेतू आहे. गांधी-विनोबांच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला चालना देण्यासाठी नाईकसाहेबांनी प्रमाणित केलेली ही पंचायत राज व्यवस्था आहे. स्वतः नाईकसाहेब विनोबांच्या भूदान-ग्रामदानाच्या चळवळीमध्ये सहभागी झाले होते. महाराष्ट्रात विनोबांना भूदान आंदोलनात सर्वात जास्त म्हणजे एक लाख एकर २७,००० जमीन यवतमाळ जिल्ह्यातून प्राप्त झाली. या भूदान महोत्सवाला १९५९ साली नवभारताचे शिल्पकार तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू अगत्यपूर्वक उपस्थित होते. महाराष्ट्राच्या विधायक-रचनात्मक कार्यातील ही मोठी संस्मरणीय घटना आहे.

१९५८-५९ साली महाराष्ट्रात हा पंचायत राज्याचा सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा नवा प्रयोग सुरू झाला. देशातील बहुतेक राज्यांनी, जवळजवळ १०-१२ राज्यांनी, हा प्रयोग स्वीकारला. गुजरात राज्याचे माजी मुख्यमंत्री बळवंतराय मेहता यांच्या

अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या समितीने या संदर्भात ज्या काही शिफारशी सूचविलेल्या होत्या. त्या बाजुला सारून नाईकसाहेबांनी 'तालुका' हा विकेंद्रीकरणाचा घटक न मानता 'जिल्हा' घटक मानावा असे सूचविले. कारण त्याला एक ऐतिहासिक अशी परंपरा होती. मेहता समितीने जिल्हा परिषदेमध्ये अप्रत्यक्ष निवडणुका घेण्यात याव्या असे सूचविले होते. नाईकसाहेबांनी मात्र प्रत्यक्ष निवडणुका घेण्याचे योजिले. परिणामत: मतदारांमध्ये अधिक राजकीय जागृती निर्माण झाली. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये जेवढी चुरस नसेल त्यापेक्षा अधिक चुरस आणि अधिक उत्साह जिल्हा परिषदेच्या निवडणुकींमध्ये पहायला सापडतो लोकशाही प्रणालीचे एक प्राथमिक प्रशिक्षणच या निवडणुकीमध्ये होऊन जाते. खेरीज संघटना कशी बांधावी, पुढाकार घेऊन नेतृत्व कसे करावे याचेही शिक्षण ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना प्राप्त होते. नाईकसाहेबांनी तिसरी एक महत्त्वाची शिफारस केली होती. ती म्हणजे जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी धोरण ठरविणे आणि या धोरणाची अंमलबजावणी मुख्य कार्यपालन अधिकारी आणि जिल्हा परिषदेचे इतर अधिकारी यांनी कसोशीने करावे. हे ते धोरण होय. पंचायत राज्याच्या या धोरणातून नाईकसाहेबांची स्वतंत्र प्रज्ञा दिसून येते. जिल्हा परिषदेच्या उभारणीमुळे गेल्या ४० वर्षांच्या कालखंडात जवळजवळ दहा हजार कार्यकर्ते ग्रामीण भागातून निर्माण झाले. 'महाराष्ट्र म्हणजे कार्यकर्त्यांचे मोहळ' असे गांधीजी म्हणत. जिल्हा परिषदेच्या निर्मितीमुळे ते शब्दश: खरे ठरले आहे. जिल्हा परिषदेच्या प्रयोगामुळे ग्रामीण भागातील सामान्य कार्यकर्त्यांनादेखील लोक प्रतिनिधी या नात्याने, संधी प्राप्त होऊन आपल्या गावचे प्रश्न तळमळीने मांडता आले. नियोजन हे खालून वर जावे हा नाईकसाहेबांचा प्रयत्न होता तो या निमित्ताने यशस्वी झाला.

## रोजगार हमी योजनेचे प्रणेते

१९७२ साली महाराष्ट्रात जो अदृष्टपूर्व, अश्रुतपूर्व व अभुतपूर्व असा दुष्काळ पडला. अवर्षणामुळे शेतीतील मजुरांना काम नव्हते. त्यांची उपासमार होऊ लागली. तेव्हा त्या बेकार हातांना काम देण्यासाठी, 'मागेल त्याला काम आणि त्याच्या पोटाला दाम.' देण्यासाठी रोजगार हमी योजना तयार करण्यात आली. अशा प्रकारची रोजगाराची हमी देणारी योजना कार्यान्वित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. आज 'जवाहर रोजगार हमी योजना' या नात्याने ही

योजना सुरू आहे. नागपूर येथे संपन्न झालेल्या त्या विधी मंडळाच्या हिवाळी अधिवेशनात त्या दरम्यान या संबंधीचा कायदा एकमताने मंजूर करण्यात आला. तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना ही योजना पाहून आश्चर्य आणि आनंद वाटला. देशातील काही अर्थशास्त्रज्ञांनी यावर कठोर टीका केली. शेतमजुरांची क्रयशक्ती वाढून महागाई वाढेल असा आरोप त्यांनी केला. त्यावेळी बोर्डी येथे गाजलेले काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे जे शिबिर झाले. त्या शिबिरात मार्गदर्शन करताना सात्विक संतापाने नाईकसाहेब म्हणाले, ''शेतमजुरांना रोजगार उपलब्ध करून देता येत नसेल तर त्यांना उंदीर मारण्याच्या गोळ्या खाण्यास देऊन त्यांना मारून तरी टाका! हाच एक उपाय देशातील अर्थतज्ज्ञांकडे बाकी असेल.'' नाईकसाहेबांच्या या सडेतोड उत्तराने टीकाकारांच्या टीकेची धार बोथट बनली. या दुष्काळातून नाईकसाहेबांनी महाराष्ट्राला जे सहिसलामत बाहेर काढले ते त्यांचे कार्य ऐतिहासिकच म्हणावे लागेल. अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्र स्वयंपूर्ण करण्याच्या त्यांच्या कार्याची नोंद जशी सुवर्ण अक्षरांनी केली पाहिजे. तशीच नोंद रोजगार हमी योजना अंमलात आणून उपाशी शेतमजुराला काम देऊन त्याला स्वाभिमानाने जीवन जगता येईल आणि या कामातून रस्त्यांचे रुंदीकरण, खडीकरण, छोटे-छोटे बंधारे, पूल बांधणे इ. विकासाची कामेही परस्पर होऊ शकली. या काळातील एक मोठी उद्‌बोधक आठवण विदर्भातील एक ज्येष्ठ पत्रकार दत्ता कवीश्वर यांनी सांगितली आहे. त्या काळात नाईकसाहेब नागपूरला आले असता-कवीश्वर त्यांना भंडारा जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत बोलले. तेव्हा नाईकसाहेब त्यांना म्हणाले, ''कसला घेऊन बसलात भंडारा? तिकडे पश्चिम महाराष्ट्रात शेती नांगरून तयार आहे. पण पाऊस आलाच नाही. मोठी भीषण स्थिती आहे.'' आणि पत्रकारांच्या विनंतीवरून पश्चिम महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीची माहिती घेण्यासाठी त्यांचा दौरा नाईकसाहेबांनी आयोजित करून दिला. त्या दौऱ्यावर गेलेल्या पत्रकारांनी अंगावर काटा आणणारे ते भीषण दृश्य पाहिले आणि विदर्भातील वृत्तपत्रात त्याचे वस्तुनिष्ठ असे तपशिलात विदारक चित्रण प्रसिद्ध झाले. त्याबाबत वैदर्भीय पत्रकारांची पाठ थोपटीत, समाधान व्यक्त करीत ते म्हणाले, ''फार चांगले लिहिले तुम्ही सर्वांनी. या दुष्काळातही आपण सारे एक आहोत हे महाराष्ट्राने दाखवून दिले.'' त्यावर कवीश्वर म्हणाले, ''जी दुष्काळी कामे सुरू आहेत ती पाहून तर आम्हाला 'सुकाळ दौऱ्याचा' अनुभव आला.'' नाईकसाहेब म्हणाले, ''तुझ्या तोंडात साखर

पडो आणि असे घडले तर पुढच्या वर्षी तुमचा आणखी एक दौरा नक्की समजा.'' आणि आपल्या शब्दाला जागून गोव्यासह महाराष्ट्राचा, वैदर्भीय पत्रकारांचा एक दौरा त्यांनी आयोजित करून दिला. या रोजगार हमी योजनेत दलित, स्त्रिया, भूमिहीन-शेतमजूर अशा गरजुंना कामाची हमी मिळाली. आर्थिक स्वावलंबनामुळे त्याच्या स्वाभिमानाला तडा गेला नाही. लाचारीचे जिणे त्याला जगावे लागले नाही. जागतिक बँकेनेदेखील या कामाचे मोठे कौतुक केले. शासनाने 'दुष्काळ निवारण समिती' यासाठी गठीत केली होती. विरोधकांचेही सहकार्य नाईकसाहेबांनी घेतले. आणि सर्वांनी त्याचे 'दुष्काळ निर्मूलन समिती' असे नामकरण केले. दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीत धीर खचू न देता धीराने आणि खंबीरपणे त्याला कसे तोंड देता येईल आणि सामान्य माणसाला दिलासा देऊन त्याचा आत्मविश्वास कसा जागा करता येईल हे दाखवून दिले. या कार्याची आठवण म्हणून अहमदनगर जिल्ह्यातील 'पाथर्डी' येथे रोजगार हमी योजनेवरील कामगारांनी चार-चार आणे गोळा करून नाईकसाहेबांचा जिवंतपणी पुतळा उभारला. यापेक्षा या कार्याची आणखी कोणती पावती हवी?

रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून दुष्काळावर मात करण्यासाठी प्रचंड अशी कामे करण्यात आलीत. दुष्काळाच्या वैशाख वणव्यात होरपळणारी माणसे आणि जनावरे यांना एकाच वेळेला जगविणे सोपे नव्हते. पण हिंमत न हारता साठ हजाराच्या वर मदत कार्य चालू ठेवून दुष्काळाचे निवारण नव्हे तर निर्मूलन करण्यासाठी नाईकसाहेबांनी कंबर कसली.

''जब तक खुली न आँख
तब तक कजराई है।
वरना तम कोनसा है, जो मिटा न जाय ।।
जब तक कशी ना कमर ।
तब तक कठिनाई है,
वरना काम कौनसा है, जो किया न जाय ।।

या काव्यपंक्तीप्रमाणे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून पन्नास लाख लोकांना काम देण्यात आले. खोदल्या गेलेल्या सात हजार विहिरींचे काम यशस्वी ठरले. सहाशे ऐंशी तलाव, दोन हजार पाचशे ग्रामीण तळी तीनशे पासष्ट लांबीचे कालवे आणि साठ हजार किलो मिटर लांबीच्या रस्त्याचे काम या काळात 'दुष्काळी काम म्हणून करण्यात आले. तीस लाख एकर जमिनींमध्ये बांध घालण्यात आलेत. या

बांध-बंदिस्तीचा उपयोग जमिनीत पाणी आणि ओलावा टिकून धरण्यात होत असल्यामुळे जमिनीची उत्पादन क्षमता वाढते. कामावर असलेल्या मजुरांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी अकरा दुष्काळी जिल्ह्यातील बत्तीस लाख लोकांना 'सुखडी' हा पोषक व सकस आहार पुरविण्यात आला. सरकारी यंत्रणा कामाला जुंपून केवढे प्रचंड कार्य करता येऊ शकते याचा एक आदर्श वस्तुपाठच नाईकसाहेबांनी घालून दिला. इतर राज्याने संकटकाळी ज्याचा कित्ता गिरवावा असा हा अनुकरणीय प्रयोग आहे. अभूतपूर्व अशा दुष्काळावर त्यांनी रोजगार हमी योजना या उपक्रमातून केलेली मात तेवढीच अभूतपूर्व म्हणावी लागेल.

## मूल्यमापन

महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर स्वतंत्र विदर्भाची मागणी जोर धरू लागली. लोकनायक बापुजी अणे प्रभावशाली नेते या आंदोलनाचे नेतृत्व करीत होते. नागपूर, अकोला आणि पुसद ही प्रामुख्याने या आंदोलनाची प्रभावक्षेत्रे होती. आंदोलन अगदी शिगेला पोहचले होते. स्वतंत्र विदर्भाच्या प्रश्नावर लोकांच्या भावना अत्यंत तीव्र होत्या. जनतेमधला प्रक्षोभ वाढीला लागला होता. अशा या कसोटीच्या प्रसंगी सार्वत्रिक निवडणुका आल्या. बाबासाहेबांच्या धर्मपत्नी श्रीमती नलिनीबाई उपाख्य माईसाहेब मुखरे वसंतरावांच्या विरोधात उभ्या होत्या. अत्यंत संयमाने आणि शांतपणे विचलित न होता नाईकसाहेबांनी ही निवडणूक १७,५४४ पेक्षा अधिक मताने जिंकली. विदर्भ आणि महाराष्ट्राची संस्कृती एकच आहे. एका मराठी भाषेने आपण सगळे जोडले गेलो आहोत. ही त्यांची भूमिका हळूहळू रूजत गेली. आणि विदर्भ आंदोलनाची तीव्रताही कमी होऊ लागली. याच वर्षी भारत आणि चीनचे युद्ध झाले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावरून यशवंतरावजी केंद्रात संरक्षण मंत्री म्हणून गेले. 'हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला' असे या प्रसंगाचे मोठे भावपूर्ण वर्णन करण्यात आले. याच वेळी वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील असे वाटत होते. तथापि ज्येष्ठतेचा निकष लावून दादासाहेब कन्नमवार मुख्यमंत्री झाले. अवघ्या एका वर्षातच मेंदुतील रक्तस्त्रावामुळे त्यांचे दुःखद निधन झाले. कन्नमवारांच्या अनपेक्षित निधनानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी ५ डिसेंबर १९६३ रोजी वसंतराव नाईकांची निवड करण्यात आली. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात आले. आपल्या सुसंस्कृत व धुरंधर व्यक्तिमत्वाने यशवंतरावांनी महाराष्ट्राची घडी नीट बसविली होती. म. फुले-राजर्षी शाहू

महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन एक प्रगत आणि पुरोगामी राज्य म्हणून यशवंतरावांनी महाराष्ट्राची जडण-घडण केली होती. खऱ्या अर्थाने वसंतरावजीच यशवंतरावजींचे राजकीय उत्तराधिकारी होते. स्वत: यशवंतरावजी एकदा म्हणाले होते, '' वसंतरावांच्या हातात महाराष्ट्र जरूर सुरक्षित आहे. म्हणून त्यांच्या या हाताची महाराष्ट्राला येथून पुढेही आवश्यकता आहे.'' यशवंतरावांसारख्या ज्येष्ठ-अनुभवी आणि कार्यकुशल नेत्यांनी वसंतरावांच्या कार्याचे केलेले मूल्यमापन अगदी यथार्थच म्हणावे लागेल. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात वसंतरावांनी स्थिर असे प्रशासन दिले. कोयना भूकंपासारख्या प्रसंगालाही ते धीरगंभीरपणे सामोरे गेले. महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांचा सुदीर्घ काळपर्यंत व्यक्तिगत प्रभाव राहिला. जनतेची केवळ मतेच नाही तर मनेही त्यांनी जिंकली.

महाराष्ट्रात कोयना भूकंपाच्यावेळी उध्वस्त झालेल्या भागाचे पुनर्वसन १९६५ साली झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी १९७१ च्या बांगलादेश मुक्ती संग्रामाच्यानिमित्ताने केंद्राला महाराष्ट्रातून सर्वाधिक मदत देण्यात नाईकसाहेबांनी मोठी प्रशंसनीय कामगिरी पार पाडली. विदर्भ-मराठवाडा-खानदेश या भागात कापसाच्या रुपाने शेतकऱ्यांना प्राप्त होणारे जे रोखीचे पीक आहे. 'पांढरे सोने' या शब्दात शेतकरी बांधव कापसाचा उल्लेख करतात. शेतकऱ्यांना किमान हमी भाव प्राप्त करून देऊन आडते, दलाल, खरेदीदार-व्यापारी यांच्या पाशातून शेतकऱ्यांना सोडविण्यासाठी १९७२ साली सुरू केलेली 'कापूस एकाधिकार योजना' शेतकऱ्यांना वरदानच ठरली. दारूबंदीचे धोरण शिथील करून राज्याच्या महसुलात एकीकडे भर टाकीत, विषारी, गावठी दारूच्या प्राषणापासून त्यांनी लोकांना मुक्त केले. नवी मुंबई वसविण्याच्या कामातही त्यांचा मोठा पुढाकार राहिला. १९७२ साली महाराष्ट्रात पडलेल्या अभूतपूर्व दुष्काळप्रसंगी रोजगार हमी योजनेंतर्गत दररोज पन्नास लाख लोकांना काम देऊन त्यांनी एक जादूच केली. परिणामत: महाराष्ट्रात एकही भूकबळी पडू दिला नाही. नगर जिल्ह्यातील 'पाथर्डी' गावात नाईकसाहेबांच्या कृतज्ञतेपोटी जिवंतपणी त्यांचा पुतळा उभारण्याची एक किमयाच घडली. शेती हा तर नाईकसाहेबांचा अत्यंत आवडीचा विषय. 'शेतकरी कारखानदार झाला पाहिजे' हे त्यांचे स्वप्न होते. शेतीला उद्योगाची जोड दिली, विकसित झालेले आधुनिक तंत्रज्ञान शेतीत उपयोजित केले तर शेती हा फायदेशीर व्यवसाय ठरू शकतो या विचारावर त्यांची अभंग निष्ठा होती. 'धरतीच्या कणा

कणात समृद्धी फुलविण्याचा त्यांनी आयुष्यभर ध्यास घेतला. खऱ्या अर्थाने ते भूमिपुत्र होते.' अधिक धान्य पिकविण्यासाठी संकरित बियाण्याच्या वाणाचा त्यांनी मोठ्या हिरीरीने प्रचार केला. ते 'हायब्रीड' या नावाने शेतकऱ्यात लोकप्रिय झाले. नाईकसाहेबांचे शेतीवरचे प्रेम जगजाहीरच होते. त्यांच्या या अधिक धान्य पिकवा मोहिमेला लोकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आणि म्हणून हरितक्रांतीचा जनक म्हणून त्यांचा केला जाणारा गौरव योग्यच आहे. महाराष्ट्राचे कवि वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांनी मोठ्या काव्यमय शब्दात त्यांच्या कार्याचे मोठेपण विशद केले आहे. ''वसंतराव राजकारणात आले. मध्यप्रदेशात उपमंत्री झाले. महाराष्ट्रात आरंभी मंत्री आणि पुढे मुख्यमंत्री झाले. हा प्रवास नि:संशय, अभिनंदनीय पण वसंतरावांचा मूळ पिंड शेतकऱ्याचा! शेती हा त्यांच्या खरा जिव्हाळ्याचा विषय. शेती व्यवसाय म्हणून केली गेली पाहिजे. शेतकऱ्याला प्रतिष्ठा लाभली पाहिजे. हे त्यांच्या चिंतन गीताचे धृपद आहे. महाराष्ट्राची शेती आज नागडी उघडी राहिली नाही. तिच्या कटीला लाज राखेल असे हिरवे वस्त्र आहे. शालीनता सांभाळता येईल एवढी कंचुकी तिच्या वक्षस्थळावर आहे. ती पायघोळ पैठणी नेसून मिरविल तेव्हा वसंतरावांचे सारे मनोरथ सिद्धीला जातील.'' काळ्या मातीचे हिरवे स्वप्न वसंतरावांनी साकार केले. या संदर्भातील दोन आठवणी मोठ्या उद्‌बोधक आहेत.

नाट्यपंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सांगलीच्या काही चित्रपट निर्मात्यांनी 'संथ वाहते कृष्णामाई' नावाचा एक चित्रपट काढला होता. याच नावाच्या गीताची एक ध्वनीमुद्रिका माडगूळकरांनी त्यांना ऐकविली. त्यातील खालील ओळी त्यांना खूप आवडल्यात.

**।। सतत वाहत उदंड पाणी,**
**कुणी न वळवून आणि राना ।।**

आणि महाराष्ट्राच्या खेडो-पाडी हे गीत ऐकविले गेले पाहिजे यासाठी त्यांनी माडगूळकरांना सांगितले. गीताच्या सुरांशी त्यांचे सूर जुळले होते. आज 'जलसंधारण' ही जी संकल्पना आहे. आणि त्यातील 'पाणी अडवा पाणी जिरवा' ही जी मोहिम आहे. त्याचे तत्त्वबीज शब्दरुपाने नाईकसाहेबांना या गीतात गवसले होते. उपलब्ध असलेल्या पाण्याचा थेंब न् थेंब शेतीच्या उपयोगात आणला पाहिजे. याचा उत्कट ध्यास त्यांना लागला होता.

वसंतरावांचा खरा पिंड आणि प्रकृती ही एका हाडाच्या शेतकऱ्याची होती. शेती आणि शेतकरी हा त्यांच्या आत्यंतिक जिव्हाळ्याचा विषय होता. 'शेतकरी

कारखानदार झाला पाहिजे' हे त्यांचे स्वप्न होते. शेतकऱ्याला प्रतिष्ठा लाभली पाहिजे हा त्यांचा उत्कट ध्यास होता. आधुनिक शेतीतंत्र शेतीमध्ये उपयोगात आणले पाहिजे, यासाठी त्यांची तळमळ होती. कमाल जमीन धारणेचा कायदा त्यांच्याच कार्यकाळात झाला. कोरडवाहू शेती फायदेशीर होत नाही म्हणून महाराष्ट्रातील अधिकाधिक जमीन ओलिताखाली आली पाहिजे. म्हणजे शेती हा लाभदायक व्यवसाय ठरू शकेल आणि शिवाय अन्न-धान्याच्या बाबतीमध्ये महाराष्ट्र स्वयंपूर्ण होऊ शकेल याकरिता पावसाचे पाणी वाया न घालविता ते अडविले पाहिजे. त्यावर बंधारे घातले पाहिजे. संकरित वाण शेतीत वापरले पाहिजे. पाझर तलाव निर्माण केले पाहिजे. जमिनीचा पोत तपासण्यासाठी माती तपासणी प्रयोगशाळा उभारल्या गेल्या पाहिजे. शेती सुधारल्याखेरीज महाराष्ट्राची प्रगती होणे शक्य नाही. किंबहुना अशा प्रगतीला काही अर्थ नाही असे त्यांचे ठाम मत होते.

वसंतराव नाईक हे शेतकऱ्यांचे मित्र होते, कैवारी होते. अगोदर शेतकरी होते, नंतर मंत्री, मुख्यमंत्री होते. मराठवाड्यातील एक प्रगत शेतकरी श्री. माणिकराव आन्वीकर यांनी या संदर्भात सांगितलेली गोष्ट मोठी उद्बोधक आहे. कै. नाईकसाहेब कृषिमंत्री असताना महाराष्ट्रातील उत्तम शेतीची आणि प्रगत शेतकऱ्याची माहिती संग्रही ठेवीत असत. अशा शेतीची पाहणी करीत, अशा शेतकऱ्यांना आवर्जून भेटत असत. त्यांच्याशी चर्चा करीत असत. श्री. आन्वीकर यांना एक दिवस अनपेक्षितपणे त्यांचे पत्र आले. नियोजित वेळी कै. नाईकसाहेब सपत्नीक आन्वी गावाला आले. पावसाची रिपरिप चालू असतानाही त्यांनी आपला नियोजित दौरा रद्द केला नाही. त्या भर भावसातही त्यांनी आन्वीकरांची शेती सगळीकडे फिरून पाहिली. आस्थेवाईकपणाने आवश्यक ती चौकशी केली. शेतीतील विविध प्रयोगांची माहिती करून घेतली. आणि त्यानंतर गावातील शेतकऱ्यांना बोलावून त्यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली. एका राज्याचा कृषिमंत्री तत्कालीन मागासलेल्या मराठवाड्यातील एका खेड्याला भेट देतो. तेथील प्रगत शेतीची पाहणी करतो. शेतकऱ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारतो आणि संकरित बीज उत्पादनाच्या क्षेत्रात नव्याने प्रारंभ करणाऱ्या उद्योजकांना जाचक वाटणारे शासकीय निर्बंध दूर करण्याच्या संदर्भात सर्वतोपरी सहकार्य करतो, हा सर्वच अनुभव अपूर्वाईचा होता. त्यातून नाईकसाहेबांच्या शेतीविषयक संस्थेचे विलोभनीय पैलूंचे मोठे मनोज्ञ दर्शन घडते.

नाईकसाहेब राज्याचे मुख्यमंत्री असताना भारत कृषक समाजाचे अधिवेशन आणि त्याला जोडून एक प्रदर्शन मुद्दाम मुंबई येथे भरविले होते. या प्रदर्शनाच्या आयोजनात शासनाने भारत कृषक समाजाला सर्वतोपरी मदत केली होती. परिणामतः या अधिवेशनात शेतकऱ्यांना मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्यांच्याच प्रयत्नांमुळे १९७० साली महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला. अन्न-धान्य उत्पादनाची तूट नाईकसाहेबांच्याच प्रयत्नांमुळे भरून निघाली. एवढेच नव्हे तर इतर राज्यांना मदत करता येईल एवढे अधिक उत्पादनही काढण्याइतके सक्षमीकरण महाराष्ट्राच्या शेतीत निर्माण झाले.

## सौजन्यमूर्ती वसंतराव नाईक

वसंतराव नाईक म्हणजे मूर्तिमंत सौजन्य. सौजन्यमूर्ती वसंतराव हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विलोभनीय असा पैलू. थोर समाजसेवक सेनापती बापट काही निमित्ताने उपोषणाला बसले होते. जाणीवपूर्वकच विरोधी पक्षांनी त्यांना नाईकसाहेबांच्या 'वर्षा' या निवासस्थानासमोर उपोषणाला बसविले. नाईकसाहेब त्यांच्याशी इतक्या सौजन्याने आणि नम्रतेने वागले की सेनापती बापटांनी निवासस्थानासमोरील आपले उपोषण निवासस्थानात स्थानांतरीत केले आणि आपोआपच ते उपोषण संपुष्टात आले. स्वतः सेनापती बापट नाईकसाहेबांविषयी वाटणाऱ्या आदरापोटी म्हणाले, ''मोठा हुशार माणूस आहे''. विदर्भातील थोर समाजसेवक आणि महारोग्यांचे मुक्तिदाते दाजीसाहेब ऊर्फ शिवाजीराव पटवर्धन यांची विदर्भातील कथाही अशीच आहे. आपल्याकडे एक मराठी वाक्प्रचार प्रचलित आहे. 'सरकारी काम अन् सहा महिने थांब.' नोकरशाहीच्या अजगरी विळख्यात एखादे विधायक-रचनात्मक कामही अडकले की त्याचा फटका भल्याभल्यांना बसतो. लालफितीचा तडाखाच असा जबरदस्त असतो. शासनाकडून महारोग्यांच्या पुनर्वसनाकरिता मिळणाऱ्या अनुदानास विलंब झाला किंवा काही अडचणी उद्‌भवल्या की दाजीसाहेब तावातावाने सचिवालयातील मुख्यमंत्र्यांच्या दालनात प्रवेश करीत. चिडत, संतापत नाईकसाहेब अतिशय शांतपणे त्यांच्याशी बोलत. आणि अतिशय श्रद्धापूर्वक त्यांच्या पायावर आपले मस्तक ठेवत. आणि दाजीसाहेबांचा सगळा सात्त्विक संताप मावळत असे. थोर समाजसेवकांच्या निरलस सेवाभावी कार्याची नाईकसाहेबांना कृतज्ञतापूर्वक जाण होती आणि त्यांच्याशी ते स्वाभाविक नम्रतेने वागत असत. 'सिंहासन' चित्रपटात

वरील प्रसंग मोठ्या कुशलतेने रंगविला आहे.

वसंतराव नाईक हे अजातशत्रू व्यक्तिमत्व होते. विरोधी पक्षातील जवळजवळ सर्वांशी त्यांचे अत्यंत अनौपचारिक स्नेहबंध होते. विदर्भातील प्रसिद्ध पत्रकार दत्ता कवीश्वर यांनी या संदर्भातील सांगितलेली एक आठवण त्यांच्या या मनोधर्मावर प्रकाश टाकणारी आहे. दरवर्षी हिवाळ्यात महाराष्ट्र विधी मंडळाचे एक विशेष अधिवेशन नागपूर येथे होत असते. या अधिवेशनात सीमाप्रश्न हा एक ऐरणीवर राहणारा प्रश्न असे. मोर्चा-धरणे, सभागृहात गरमागरम चर्चा हा नित्यक्रम ठरलेला. एकदा सभागृहातून विरोधी पक्षाने सभात्याग केला आणि मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयासमोरील व्हरांड्यात खाली टाकलेल्या चटईवर त्यांनी ठाण मांडले. सभागृहात उपस्थित असलेल्या नाईकसाहेबांना हे समजले. वातावरण खूपच तापलेले होते. पत्रकारांना तर एक मोठे खाद्यच गवसले होते. एवढ्यात नाईकसाहेब तेथे आले आणि नाईकसाहेबांनी एकेका नेत्यांना त्यांच्या नावासह हाक मारून आपल्या कार्यालयात आत येऊन बसण्यास सांगितले. सचिवांना खुर्च्या लावायला सांगितले. नाईकसाहेबांच्या या सौजन्यशील पावित्र्याने विरोधक अस्वस्थ झाले. आणि ते म्हणाले, ''आमचे धरणे आहे आम्ही आत येणार नाही.'' आपला तंबाखूचा पाईप शांतपणे पेटवित नाईकसाहेब म्हणाले, ''ठीक आहे. मी ही तुमच्या येथेच बसतो.'' आणि खाली चटईवरच मांडी मारून ते बसले. त्यांच्या या अकृत्रिम वृत्तीने विरोधकांच्या विरोधाची धार बोथट झाली. वातावरणातील ताणतणाव कमी झाला. गप्पा रंगू लागल्या. आणि विरोधकांना ते म्हणाले, ''तुमचे तर धरणे आहे, उपोषण नाही ना?'' आणि सेवकांना सांगून त्यांनी खाद्य-फराळ मागविला. आणि आपोआपच धरणे आंदोलन संपुष्टात आले. विरोधकांना जिंकण्याची एक वेगळीच हातोटी त्यांच्या सौजन्यशील वृत्तीत होती. ते मुख्यमंत्री असताना तर त्यांच्या 'वर्षा' बंगल्यावर सारखी वर्दळ असायची. मंत्री, राजकीय नेते, कार्यकर्ते, सामान्य माणसे, खेड्यातील ग्रामस्थ इ. मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यावरदेखील अशीच गर्दी कायम होती. हे मात्र खरोखरच आश्चर्य होते. कवीश्वरांनीच सांगितलेली या संदर्भातील ही आठवण अशीच उद्‌बोधक आहे. नागपूर अधिवेशनात 'रवी भवन' परिसरातील बावीस नंबरच्या बंगल्यात त्यांचे वास्तव्य होते. रात्री बारा वाजता पत्रकारांची आणि त्यांची भेट झाली. मनमोकळ्या गप्पा झाल्या. पत्रकारांनाच नाईकसाहेबांनी स्वतः ऐकविलेला किस्सा तसा धक्कादायकच. एकदा एक साधू महाराज त्यांची वाट पाहत थांबला होता. रात्रीचे

जवळजवळ तीन वाजले होते. तोपर्यंत भेटणाऱ्यांची वर्दळ चालूच होती. तो साधू महाराज कवी होता. त्याला आपल्या कविता नाईकसाहेबांना ऐकवायच्या होत्या. त्याच्या आग्रहास्तव नाईकसाहेबांनी त्याच्या दोन कविता ऐकल्या. आणि मगच ते झोपायला गेले. लोक आपल्यावर उदंड प्रेम करतात. त्या प्रेमाचा आपण सहर्ष स्वीकार करायला पाहिजे. ही त्यांची वृत्ती होती. अजातशत्रू, सौजन्यमूर्ती ही नाईकसाहेबांना लावण्यात येणारी नुसती विशेषणे नाहीत. ते त्यांच्या अभिजात सुसंस्कृतपणाचे एक अविभाज्य अंग होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक माधवराव गोळवलकर गुरुजी कर्करोगाशी झुंज देत होते. ते दवाखान्यात भरती होते. इंदिरा गांधीचे संघाबद्दलचे फारसे चांगले मत नव्हते. परंतु एक मोठा माणूस आजारी आहे. मतभेद, मतभेदाच्या जागेवर असले पाहिजे यावृत्तीने ते त्यांना भेटायला गेले. जांबुवंतराव धोटे विदर्भातील सर्वात मोठे आणि शक्तीशाली विरोधक. त्यांचे वडील आजारी होते. आणि नागपुरात दवाखान्यात भरती होते. त्यांची विचारपूस करायला ते स्वत: दवाखान्यात गेले.

विरोधकांशी अत्यंत सौजन्यशीलवृत्तीने वागणे हा नाईकसाहेबांच्या अभिजात सुसंस्कृतपणाचाच भाग होता. त्यात कुठेही कृत्रिमता नव्हती, दिखाऊपणा नव्हता. याच संदर्भातील खालील आठवण त्यांच्या या वृत्तीचे निदर्शक आहे.

वसंतराव नाईकसाहेबांना त्यांचे मित्र असलेल्या गोधाजी उपाख्य बाबासाहेब मुखरे व डॉ. द. शं. उपाख्य भाऊसाहेब सरनाईक यांनी राजकारणात आणले. पुढे स्वत:च्या कार्यकर्तृत्वाने नाईकसाहेब यशाची एकेक पायरी ओलांडीत मुख्यमंत्री-पदावर जाऊन पोहचले. आणि मुख्यमंत्री पदावर राहण्याचा एक विक्रम त्यांनी नोंदविला. बाबासाहेब मुखरे व भाऊसाहेब सरनाईक ह्या एकेकाळच्या मित्र असलेल्या सहकाऱ्यांशी पुढे त्यांचे राजकीय मतभेद झालेत. लोकनायक बापुजी अणे, ब्रिजलालजी बियाणी, मुखरे-सरनाईक, टी. जी. देशमुख यांनी स्वतंत्र विदर्भाची मागणी करून एक तीव्र आंदोलन १९६० च्या दरम्यान छेडले. राजकीय मतभेद कितीही तीव्र असले तरी आपले वैयक्तिक संबध जिव्हाळ्याचे असावेत यावर नाईकसाहेबांचा सुरूवातीपासून कटाक्ष होता. नाग-विदर्भ आंदोलन समितीने पुसदची नगर पालिका जिंकल्यावर डॉ. अब्दुल मन्नान नगर परिषदेचे अध्यक्ष झाले. ते मुखरे-सरनाईक गटाचे कार्यकर्ते होते. पुसद येथे नळाद्वारे पाणी पुरवठा करण्याची योजना कार्यान्वित करण्यासाठी पुसद नगर परिषदेने सर्व अटी पूर्ण करून आवश्यक ती कागदपत्रे शासनाकडे सादर केली. तथापि ही योजना मंजूर

होत नव्हती. नाईकसाहेब त्यावेळी राजस्वमंत्री होते. त्यांच्या मार्गदर्शनाने आणि प्रयत्नाने योजना मंजूर करून घेण्यासाठी डॉ. मन्नान यांनी सरनाईक यांना विनंती केली. आणि मुंबईला जाण्यासाठी गळ घातली. त्याप्रमाणे डॉ. सरनाईक मुंबईला गेले. मैत्रीचे संबंध लक्षात घेऊन डॉ. सरनाईक मुंबईला गेल्यावर 'वर्षा' बंगल्यावर गेलेत. तेथे त्यांनी नाईकसाहेबांची भेट घेतली. येण्याचे प्रयोजन सांगितले. नाईकसाहेबांनी त्यांना दहा वाजता यायला सांगितले. आपणाला दोन तासांनी बोलावल्याबद्दल डॉ. सरनाईक काहीसे रूष्ट झाले. मात्र दहा वाजता पोहोचल्यावर नाईकसाहेब त्यांचीच वाट पाहत होते. आग्रहांनी त्यांनी आपल्यासोबत जेवायला लावले. आणि त्यानंतर त्यांना घेऊन ते सचिवालयात गेले. (त्यावेळी मंत्रालयाला सचिवालय म्हणत असत.) तिथे गेल्यानंतर संबंधित मंत्री आणि अधिकाऱ्यांशी बोलून त्यांनी एकाच दिवसात योजना मंजूर करून घेतली. तसे मंजुरीचे पत्र डॉ. सरनाईकांना दिले. एवढेच नव्हे तर मुंबई ते अकोल्यापर्यंतच्या रेल्वेचे आरक्षण करून त्यांचे तिकीट त्यांच्या हातात दिले. आणि त्यांची पाठवणी केली. आपल्या राजकीय मतभेदापोटी गावचा विकास थांबता कामा नये अशी नाईकसाहेबांची भूमिका होती.

वसंतराव नाईकसाहेबांचे जीवन हे सौजन्याचे मूर्तिमंत उदाहरण. सौजन्याला अवतीर्ण व्हायचे होते. आणि त्यांनी वसंतराव नाईकांचे रूप धारण केले होते. असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये. त्यांच्या गुणवैशिष्ट्यांचा परिचय करून देणाऱ्या आणखी काही आठवणी प्रा. डॉ. गोविंद देशपांडे (यवतमाळ) यांनी सांगितलेल्या आहेत. १९५७च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या दरम्यानची ही आठवण. पुसद विधानसभा मतदार संघाचे उमेदवार म्हणून नाईकसाहेब निवडणूक लढवित होते. त्यांची जीपगाडी प्रचारार्थ ग्रामीण भागात फिरत होती. कुठल्या तरी खेड्याकडे प्रचार कार्यासाठी ती जीप निघाली होती. शेताच्या बांधावर उभ्या असलेल्या एका शेतकऱ्याने हात दाखवून गाडी थांबविली. नाईक साहेबांनी जीप चालकाला गाडी थांबविण्यास सांगितले. चिलीम पेटविण्यासाठी त्या शेतकऱ्याला आगपेटीची गरज होती. नाईकसाहेबांनी त्याला आगपेटी तर दिलीच. परंतु अतिशय आस्थेवाईकपणाने त्याची चौकशी केली. अनेकांना हा निवडणुकीतील प्रचाराचा स्टंट वाटला. मात्र ज्यांनी नाईकसाहेबांचे जीवन जवळून पाहिले आहे. त्यांना मात्र हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अंगभूत गुण विशेष आहे. याची जाणीव होती. वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाल्यानंतर प्रथमच यवतमाळ जिल्ह्याच्या दौऱ्यावर यावयाचे होते.

त्यानिमित्ताने मालखेड ता. नेर, जि. यवतमाळ येथे भूमिक्रांती दिनाचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वृत्त संकलनासाठी मुंबईहून मुद्दाम काही पत्रकार आले होते. ते सभामंडपात उपस्थित होते. सभामंडपात प्रवेश करताच नाईकसाहेबांनी पत्रकार कक्षात जाऊन अत्यंत आपुलकिने आणि आस्थेने त्यांची चौकशी केली. अनेक ठिकाणी कार्यक्रम संपल्यानंतर जेवणाच्या वेळी पत्रकारांना सोबत घेऊन ते जेवण करीत असत. आणखी एक आठवण या संदर्भातीलच अतिशय मौलिक आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर नाईकसाहेब औरंगाबादला प्रथमच आले होते. त्यावेळी तेथील ज्ञान विज्ञान या शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख हे होते. मा. गो. मूळचे पुसद तालुक्यातील विडूळ येथील रहिवासी. नागपूर येथील जुन्या मॉरिस कॉलेजचे ते मराठीचे प्राध्यापक. पुढे त्याच महाविद्यालयात ते प्राचार्य झाले. एल.एल.बी. करीत असतानाच मराठी विषयात एम.ए. करण्याचा नाईकसाहेबांचा मानस होता. या वर्गात त्यांनी प्रवेशही घेतला होता. प्राचार्य श्री. ना. बनहट्टी हे तिथे मराठीचे प्राध्यापक व विभाग प्रमुख होते. त्यांच्या रजा काळात मागोंनी नाईकसाहेबांना काही काळ मराठीचे अध्यापन केले होते. ती आठवण ठेवून औरंगाबादला आल्यानंतर मी तुमच्या भेटीला येत आहे, असा निरोप त्यांनी मागोंना पाठवला. त्याप्रमाणे ते त्यांच्या निवासस्थानी गेले. आणि त्यांनी मागोंना वाकून नमस्कार केला. एम.ए.च्या वर्गात मी तुमचा विद्यार्थी होतो असे त्यांनी अतिशय नम्रपणे सांगितले. त्यांच्या या सौजन्यशीलवृत्तीने सगळे वातावरणच भारावून गेले.

विरोधकांशीदेखील नाईकसाहेब अत्यंत सौजन्याने वागत असत. त्या संदर्भातील किती तरी आठवणी आहेत. जुन्या समाजवादी पक्षाचे प्रख्यात नेते बापुसाहेब काळदाते यांनी सांगितलेली आठवण मोठी बोलकी आहे. त्यावेळी ते विरोधीपक्षाचे दमदार आमदार होते. १९७० सालातील ही गोष्ट. त्यावेळी ते क्षयाने आजारी होते. डॉक्टरांनी त्यांना विधानसभेच्या कामकाजात प्रकृती अस्वास्थामुळे सहभागी न होण्याचा सल्ला दिला. विधीमंडळ सभागृहातील बापुसाहेबांची अनुपस्थिती नाईकसाहेबांना प्रकर्षाने जाणवली. ते आजारी असल्याचे कळल्यावरून.आमदार निवासात थांबलेल्या बापुसाहेबांना भेटण्यासाठी ते तातडीने गेले. या आजारातून ते बरे होण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याचे त्यांनी बोलून दाखविले. गरज असेल तर परदेशात देखील उपचारार्थ जाण्याच्या संदर्भात सूचविले. १९७२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत बापुसाहेब पराभूत झालेत. परत त्यांना

क्षयाची बाधा झाली. औरंगाबादला दौऱ्यावर असताना नाईकसाहेबांना अतिशय उत्कटतेने त्यांची आठवण झाली. दिवसभराचे सर्व कार्यक्रम आटोपून रात्री ११ वाजता त्यांच्या घरी ते त्यांना भेटायला गेले. प्रकृतीची आणि इतर महत्त्वाच्या विषयांवर जवळजवळ दीड तास मनमोकळे चर्चा केली. विधानसभेचा सभासद असलेल्या विरोधी पक्षातील एका मातब्बर सदस्याच्या आजारपणाची चौकशी करणे एखाद्या वेळेला स्वाभाविक मानले जाऊ शकते. परंतु पराभूत झालेल्या आणि विरोधीपक्षातील माजी आमदाराची अत्यंत प्रांजळपणाने, आस्थेने चौकशी करण्याचा नाईकसाहेबांचा हा गुणविशेष अलौकिकच म्हटला पाहिजे. माणुसकीने ओथंबलेले हे नाईकसाहेबांचे व्यक्तिमत्व म्हणूनच इतरांना आकृष्ट करीत असे.

विदर्भवीर जांबुवंतराव धोटे हे नाईकसाहेबांचे विदर्भातील प्रमुख व प्रखर विरोधक. आपल्या मंत्री, मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत नाईकसाहेबांनी प्रचंड संपत्ती कमावली. भ्रष्टाचार केला. पुसद येथील बंगल्याला त्यांनी इटालीवरून संगमरवरी दगड आणून बसविला. गहुलीच्या शेताला सरकारी मालकीचे कुंपन घातले, असे गंभीर आरोप जाहीररीत्या केले. सध्याचे संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस त्यांच्यासोबत होते. या आरोपाने नाईकसाहेब व्यथित झाले. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांनी पुसदला महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वृत्तपत्राच्या प्रतिनिधींना निमंत्रित केले. ज्या बंगल्याला परदेशी मार्बल लावले असा आरोप करण्यात आला होता. तिथेच पत्रकार परिषद आयोजित केली. त्यांना सगळा बंगला दाखविला. आणि आरोप निराधार आहेत. हे कोणताही वाद-विवाद न करता सिद्ध केले. जांबुवंतरावांच्या नेतृत्त्वाखाली महाविदर्भराज्य संघर्ष समितीने तीव्र आंदोलन छेडले होते. नागपुरात एकदा कृषी उत्पन्नबाजार समितीच्या समोर पोलीसांनी गोळीबार केला. त्याच्या निषेधार्थ जांबुवंतरावांनी प्राणांतिक उपोषण केले. त्यांची प्रकृती ढासळली. आपल्या भूमिकेपासून जांबुवंतराव परावृत्त व्हायला तयार नव्हते. जांबुवंतरावांनी न्यायालयीन चौकशीची मागणी केली. अखेर नाईकसाहेबांनी ती मागणी मान्य केली. जांबुवंतरावांचे उपोषण सुटले. गोळीबार रास्त होता हे नाईकसाहेबांचे भाकीत खरे ठरले. प्रचंड सत्ता पाठीशी असतानाही कोणताही प्रश्न प्रतिष्ठेचा न करता विरोधकांच्या भूमिकेचा सहानुभूतीने विचार करणाऱ्या वृत्तीचा दिलदारपणा नाईकसाहेबांच्या ठिकाणी होता.

अमरावती येथील दैनिक हिन्दुस्थान या नियतकालिकाचे संपादक व स्वातंत्र्य संग्राम सैनिक बाळासाहेब मराठे यांचे जोशी मार्केटजवळ वृत्तपत्रीय कार्यालय होते.

काही निमित्ताने स्थानिक नगर पालिकेने त्यांचे कार्यालय उखडून टाकायचे ठरविले. आणि कुदळ-फावडे घेऊन मजूर आले. बाळासाहेबांनी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून तात्पुरती स्थगिती मिळविली. मात्र राज्य सरकारचा स्थगनादेश मिळविणे आवश्यक होते. त्यासाठी ते मुंबईला आले. नाईकसाहेब आपल्या कामात व्यस्त होते. कोणते तरी परदेशी शिष्टमंडळ त्यांच्या भेटीला आले होते. बाळासाहेब नाईकसाहेबांचे स्वीय सचिव श्री. मोहनी यांना भेटले. त्यांच्याजवळ आपला अर्ज दिला. त्यांनी तो शिपायामार्फत नाईकसाहेबांकडे पाठविला. एवढ्या व्यस्ततेतही नाईकसाहेबांनी तो अर्ज पाहून बाळासाहेबांना बोलावून घेतले. आणि स्थगनादेशासाठी मंजुरी दिली. बाळासाहेब मराठे यांनी सांगितलेल्या एक-दोन आठवणी अशाच उद्बोधक आहेत.

अमरावतीला जवानांच्या कुटुंबीयांच्या सत्काराचा कार्यक्रम होता. कार्यक्रमाच्या आयोजकांनी जाणीवपूर्वक बाळासाहेबांना व्यासपीठावर विराजमान केले नाही. भाषणाला आरंभ करून बाळासाहेबांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली आणि हा आयोजित करण्याचे खरे श्रेय त्यांचेच आहे असे सांगून त्यांचा यथोचित सन्मान केला. गोवा येथे पत्रकार संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्याही कार्यक्रमाला अतिथी म्हणून आलेल्या नाईकसाहेबांनी संमेलनात शेवटी बसलेल्या बाळासाहेबांकडे त्यांचे लक्ष जाताच त्यांना सन्मानपूर्वक समोर आणून बसविले. 'अत्युच्चपदी थोरही बिघडतो'. असा वाक्प्रचार आहे. याला नाईकसाहेब अपवाद होते. महाराष्ट्रातील सत्तेच्या सर्वोच्च स्थानी विराजमान होऊनही सामान्य कार्यकर्त्यांबद्दल त्यांच्या मनात किती आत्मीयता होती, त्यांचा सन्मान राखला गेला पाहिजे. त्याबाबतीत किती कटाक्षाने ते लक्ष घालीत असत. हे यावरून सिद्ध होते.

समाजवादी पक्षाच्या आणखी एक नेत्या श्रीमती मृणाल गोरे यांनीदेखील नाईकसाहेबांच्या सौजन्यशील गुणवैशिष्ट्यांबद्दल सांगितलेल्या एक-दोन आठवणी उद्बोधक आहेत. १९७२ साली महाराष्ट्रात अभूतपूर्व असा दुष्काळ पडला होता. सप्टेंबरमध्ये तेलाच्या किमती भरमसाठ वाढलेल्या. साखर-धान्य गोडतेल इ. जीवनावश्यक वस्तू रेशनच्या दुकानातून गायब झाल्या. त्यात भरीला भर म्हणून तत्कालीन पुरवठा मंत्री हरिभाऊ वर्तक महागाई प्रतिकार महिला समितीच्या कार्यकर्त्यांशी उपरोधिकपणे बोलले. तेव्हा समितीने दिवाळी तोंडावर आली असताना लाटणे मोर्चा काढण्याचे ठरविले. सामान्यत: ज्या ठिकाणी मोर्चे अडविले

जातात त्या मार्गाने न जाता जमसेठजी टाटा रोडवर वेगवेगळ्या मार्गाने जाऊन जवळजवळ दहा ते बारा हजार बायका हातात लाटणे घेऊन घोषणा देत मोर्चात सामील झाल्यात. मंत्रालयात मंत्रिमंडळाची बैठक सुरू होती. मुख्यमंत्र्यांनी आमच्या मोर्चाला सामोरे येऊन आमचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि आपली भूमिका स्पष्ट करावी. असे पोलीस प्रमुखांना सांगितले. संतप्त झालेल्या महिलांच्या उग्र मोर्चासमोर मुख्यमंत्र्यांना कसे आणावे? रागाच्या भरात एखाद्या बाईने लाटणे फेकून मारले तर? पोलीस प्रमुखांनी मृणालताईंशी बोलणे केले. त्यांनी आश्वासन दिले. ''आमचा हा शांततापूर्ण मोर्चा आहे लाटणे मारले जाणार नाही. फक्त हात उंच करून, हातात लाटणे धरून आम्ही मुख्यमंत्र्यांचे स्वागत करू.'' उघड्या जीपमधून तत्कालीन मुख्यमंत्री असलेले वसंतराव नाईक मोर्चाला सामोरे गेले. जीपमधून उतरले आणि म्हणाले, ''तीन दिवसाच्या आत सर्व रेशन दुकानातून अपेक्षित माल मिळेल.'' विरोधकांच्या शब्दावर विश्वास ठेवून त्यांच्या न्याय्य मागण्यांचा सहानुभूतीपूर्ण विचार करून आणि मोठ्या धाडसाने मोर्चाला सामोरे जाण्याचा मनाचा मोठेपणा त्यांनी दाखविला. एकदा व्याख्यानाच्या निमित्ताने मृणालताई नागपूरहून पुसदला आल्यात. त्या वेळी नागपूरला हिवाळी अधिवेशन सुरू होते. पुसदला आल्यानंतर येथील काही भगिनींनी महागाई विरोधात मोर्चा काढण्याचे ठरविले. त्या मोर्चाला मार्गदर्शन करून त्या परत नागपूरला आल्यात. अधिवेशनात भेट झाल्यानंतर नाईकसाहेब मृणालताईंना म्हणाले, ''तुम्ही पुसदला गेल्या असे मला समजले असते तर मी आमच्या घरी तुम्हाला निदान चहाला बोलाविले असते.'' विरोधकांच्या मनात इतकी आपुलकी असणारा असा हा एक दुर्मिळ नेता होता.

कर्मकांडावर नाईकसाहेबांचा फारसा विश्वास नव्हता. तथापि श्री. दिनेश देसाई यांनी विमान अपघातातून नाईकसाहेब सुखरूप वाचल्याबद्दल सत्यनारायणाच्या पूजेचा नवस केला. त्या पूजेचे निमंत्रण त्यांनी नाईकसाहेबांना दिले. देवपूजा आणि पूजापाठ याबाबत उदासिन असणारे नाईकसाहेब मात्र श्री. देसाई यांच्या दादर येथील निवासस्थानी आवर्जून उपस्थित राहिले. एवढेच नव्हे तर स्वतः पूजेला बसलेत. आणि त्या कार्यक्रमात इतके रंगून गेले की, रात्रीला साडेबारा वाजता घरी परत गेले. आपल्या एका निकटतम सहकाऱ्याशी नाईकसाहेब किती सौजन्याने वागत असत त्याचे हे एक उदाहरण आहे.

नवभारताचे शिल्पकार पं. जवाहरलाल नेहरू यांना त्यांनी एकदा महाराष्ट्र

भेटीच्या दरम्यान घरी स्नेहभोजनासाठी बोलाविले. आपल्या सौजन्यशील आणि सुसंस्कृतपणाने पंडितजींचा त्यांनी विश्वास संपादन केला होता. भोजनानंतर अनौपचारिक गप्पा-गोष्टी करीत असताना पंडितजींनी त्यांना विचारले, ''पाईपसारखी सवय सोडण्याचा कधी प्रयत्न केला नाही काय?'' वसंतरावांनी लगेच उत्तर दिले, ''पंडितजी सोडण्यासारख्या सवयी मी कधी लावूनच घेतल्या नाहीत.''

नाईकसाहेबांच्या मंत्रिमंडळात सहकार मंत्री राहिलेले यशवंतराव मोहिते यांचे कृषि आणि सहकार क्षेत्रात त्यांना मोठे मोलाचे सहकार्य लाभले. १९६२ च्या भारत-चीन युद्धात महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण दिल्लीला संरक्षण मंत्री म्हणून गेल्यानंतर त्यांच्या रिक्त पदावर दादासाहेब कन्नमवार मुख्यमंत्री झाले. त्यांना लालबहादूर शास्त्री आणि यशवंतराव चव्हाण यांचे आशीर्वाद लाभले होते. मुख्यमंत्री पदासाठी बाळासाहेब देसाई आणि पी. के. सावंत हेदेखील इच्छुक होते. तथापि मुख्यमंत्री झाल्यावर नाईकसाहेबांनी कोणतेही सुडाचे राजकारण न करता आपल्या अभिजात सुसंस्कृतपणाने राज्याच्या विकासाच्या कामात सर्वांचे सहकार्य घेतले. लोकशाहीचा पाया हा सर्वसमावेशक असतो या विचारावर त्यांची नितांत श्रद्धा होती. या अभंग श्रद्धेमुळे आणि निष्ठेमुळे, मूर्तिमंत सौजन्यशीलतेमुळे ते राज्याचे मुख्यमंत्री होऊ शकले.

पुसद येथील जुन्या पिढीतील स्थानिक राजकारणातील नाईकसाहेबांचे लक्ष्मणराव जाधव हे एक महत्त्वाचे कार्यकर्ते होते. 'लक्ष्मणराव पहेलवान' या नावाने ते प्रसिद्ध आहेत. 'दादा' या टोपण नावाने ते सुपरिचित आहेत. पूर्वायुष्यात वृत्तीने ते अतिशय बेदरकार होते. त्यांच्या ठिकाणी असणारी ही कमावलेली शक्ती विधायक कामात परिवर्तीत व्हावी असे नाईकसाहेबांना वाटे. ऋजू अंत:करणाच्या सुस्वभावी व सुसंस्कृत अशा नाईकसाहेबांच्या सहवासात आल्यानंतर लक्ष्मणराव दादा वृत्तीने नम्र, संयमी बनले. नाईकसाहेब त्यांच्या चंद्रमोळी झोपडीमध्ये येत, पोत्यावर बसत. दादांचे वडील महादजी जाधव यांच्याशी आस्थेवाईकपणाने मनमोकळ्या गप्पा करीत. आपल्या पक्षाच्या एका सामान्य कार्यकर्त्याच्या कौटुंबिक जीवनाशी अनौपचारिकरितीने समरस होण्याची नाईकसाहेबांची वृत्ती होती. विख्यात समाजवादी नेते आणि लंडन येथील भारताचे राजदूत राहिलेले सुप्रसिद्ध विचारवंत नानासाहेब गोरे एकदा व्याख्यानाच्या निमित्ताने पुसदला आले होते. ते विमानाने औरंगाबादला आले, आणि तेथून टॅक्सीने पुसदला जाणार होते. विमानतळावर नाईकसाहेबांची आणि त्यांची गाठ-भेट झाली. या भेटीत

नाईकसाहेबांना नानासाहेबांनी पुसदला व्याख्यानाला जात असल्याचे कळविले. तुमच्या भाषणाला मला उपस्थित राहता येत नाही अशी खंत नाईकसाहेबांनी व्यक्त केली. त्यात कोणताही औपचारिकपणा नव्हता. पुसदला पोहचल्यानंतर नानासाहेबांचे विश्रामगृहावर सर्वप्रथम स्वागत कोणी केले असेल तर ते सुधाकरराव नाईक यांनी. सुधाकरराव नाईक नानासाहेबांना घेऊन आपल्या बंगल्यावर गेले. आणि तेथे नानासाहेबांचा चहा-फराळ झाला. या सर्व प्रकाराने नानासाहेब आश्चर्यचकित झाले. नाईकसाहेबांनी औरंगाबादवरून पुसदला फोन करून सुधाकररावांना निरोप दिला. आणि नानासाहेबांचे स्वागत करावे असे सूचविले. एका छोट्या प्रसंगातून नाईकसाहेबांच्या ठिकाणी असलेल्या अभिजात सुसंस्कृतपणा आणि सौजन्यशीलतेचा प्रत्यय येतो. विरोधी पक्षातील एका आदरणीय आणि ज्येष्ठ नेत्याकडे पाहण्याचा नाईकसाहेबांचा दृष्टिकोन किती उदात्त होता हे त्यातून स्पष्ट होते. असाच अनुभव शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विधानसभेतील माजी विरोधीपक्ष नेते कृष्णराव धुळप यांनाही आलेला आहे. एकदा धुळपसाहेब काही कारणानिमित्ताने मुख्यमंत्र्यांच्या दालनात बसले होते. बाजुला काँग्रेस आमदारांची बैठक नाईकसाहेबांनी आयोजित केली होती. बराच वेळ बैठक सुरू राहिल्याने कंटाळून ते बाहेर जायला निघाले. तत्पूर्वी त्यांनी नाईकसाहेबांच्या सचिवांकडे चिठ्ठी पाठविली. दालनातून धुळपसाहेब बाहेर पडताच चिठ्ठी मिळाल्याबरोबर बैठक सोडून नाईकसाहेब बाहेर आले आणि "कोणीकडे आले होते?" अशी त्यांनी विचारणा केली. काही प्रसंगातून नाईकसाहेबांच्या सौजन्यशीलतेचा प्रत्यय येतो. नाईक साहेबांच्या यशस्वी जीवनाचे मर्म कशात आहे याचे वर्णन धुळपांच्या शब्दात वाचण्यासारखे आहे. "कै. वसंतराव नाईक बुद्धीचे प्रकांड पंडित नव्हते, संघटनेचे अध्वर्यू नव्हते, राजकारण धुरंधर नव्हते, मैदानी वक्तृत्व गाजविणारे पट्टीचे वक्ते नव्हते, हजरजबाबी संसदपटू नव्हते. मग कै. वसंतरावजींच्या यशस्वी जीवनाचे मर्म कशात आहे? त्यांचे व्यक्तिमत्व लोभस होते. वागणुकीत वैदर्भीय गोडवा होता. बोलण्यात खानदानी ऋजुता होती. मित्रत्वात प्रेमळपणाची झांक होती. आणि हाडाच्या शेतकऱ्याचा जगन्नाथी उदार हात होता. यशस्वी संघटनाची शान आणि भूमिपुत्राचा सखोल व्यवहारी बाणा यांचा सुंदर संगम कै. नाईकांच्या अष्टपैलू स्वभावात आला होता!"

एका विरोधीपक्षाच्या नेत्यांनी दिलेले हे प्रमाणपत्र नाईकसाहेबांनी केलेल्या लोकोत्तर कार्याची पावती आहे. नाईकसाहेबांचे व्यक्तिमत्त्व अतिशय ऋजू होते.

विरोधकांशी वागताना वृत्तीत पारदर्शकता होती. ओठात एक आणि पोटात एक अशी दांभिकता नव्हती. व्यक्तिमत्त्व अतिशय प्रसन्न आणि प्रभावशाली होते. विदर्भाच्या मातीचा कस आणि सुगंध त्यांच्या वृत्तीतून दरवळत असे. केवळ विरोधकांशीच नाही तर स्वकीयांशीही त्याच सौजन्यशीलतेने आणि सुसंस्कृत-पणाने वागत असत. महाराष्ट्र राज्याच्या कापूस पणन महासंघाचे सध्याचे मुख्य प्रशासक आ. डॉ. एन. पी. हिराणी हे नाईकसाहेबांनी स्थापन केलेल्या जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे दीर्घकाळ अध्यक्ष राहिले. व्यवसायाने वैद्यकीय चिकित्सक असलेले डॉ. हिराणी नाईक परिवाराचेही डॉक्टर होते. त्यांनी सांगितलेली ही आठवण नाईकसाहेबांच्या उपरीनिर्दिष्ट गुणवैशिष्ट्यांवर प्रकाश टाकते. १९ जानेवारी १९७३ रविवारचा दिवस. हिराणी हॉस्पिटलमध्ये रूग्णांची मोठी गर्दी होती. दुपारचे १२ वाजलेले आणि मुंबईहून नाईकसाहेबांनी डॉ. हिराणी यांना फोन केला आणि नाईकसाहेब म्हणाले, ''आगाखान साहेबांना मी स्नेहभोजन देत आहे. तू तुझ्या पत्नीला घेऊन ताबडतोब निघ. आणि यवतमाळच्या तुमच्या खोजा समाजाच्या तुमच्या कार्यक्रमाला तुला जाण्याची व्यवस्था करून देतो. ही आनंदवार्ता ऐकताच डॉ. हिराणींना अत्यानंद झाला. प्रिन्स आगाखानसाहेब हे त्यांच्या शिया इमामी इस्माइली समाजाचे धर्मगुरू; त्यांचे जणू दैवतच! त्यांच्या समवेत मुख्यमंत्र्याच्या तालेवार उपस्थितीत स्नेहभोजनाची संधी त्यांना प्राप्त झाली. दुसऱ्या दिवशी मुंबईला पोहचताच डॉ. हिराणी नाईकसाहेबांना भेटलेत. नाईकसाहेब पुण्याला जाण्याच्या गडबडीत होते. म. गांधी-कस्तुरबा गांधी यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या पुण्याचा आगाखान पॅलेस केंद्र शासनाला बहाल करण्याचा कार्यक्रम तेथे आयोजित करण्यात आला होता. त्याही कार्यक्रमाला नाईकसाहेब आपल्यासोबत हिराणी दाम्पत्याला घेऊन गेले. पॅलेस पाहून झाल्यावर वरच्या मजल्यावर निवडक लोक उपस्थित होते. तेथे नाईकसाहेबांनी आगाखान-साहेबांना डॉ. हिराणींचा परिचय करून दिला. ''हिज हायनेस हिअर इज माय डॉक्टर फॉर युवर कम्युनिटी.'' ज्यांच्या दर्शनासाठी खोजा समाजबांधव ताटकळत थांबत असतात आणि त्यांचे देवदुर्लभ दर्शन झाले म्हणजे स्वतःला कृतकृत्य समजत असत. त्या श्रेष्ठ धर्मपुरूषांशी रूबाबदार हस्तांदोलन करण्याची संधी केवळ नाईकसाहेबांमुळेच डॉ. हिराणी यांना प्राप्त झाली. आणि त्यानंतर मुंबईचे वैभव असलेल्या ताजमहल हॉटेलमध्ये प्रिन्सेस हॉलमधील एका प्रशस्त दालनात आगाखानसाहेब त्यांच्या धर्मपत्नी व नाईकसाहेब-वत्सलाबाई नाईक असे चौघेच

बोलत बसलेले असताना आपले सचिव श्री. देशमुख यांना पाठवून डॉ. हिराणी यांना बोलावून घेतले आणि त्यांची आणखी तपशीलात माहिती आगाखानसाहेबांना दिली. आणि त्यानंतर त्यांचे शाही असे स्नेहभोजन झाले. दुसरे दिवशी सकाळी आगाखानसाहेब विमानाने नागपूरला आणि तेथून मोटरकारने यवतमाळला खोजा समाजाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला जाणार होते. दरम्यान विमान सेवा कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्यामुळे विमान प्रवासाचा लाभ डॉ. हिराणी यांना घेता आला नाही. त्यांची ही अडचण लक्षात घेऊन शासकीय विमानामध्ये हिराणी दांम्पत्यासाठी नाईकसाहेबांनी दोन जागेचे आरक्षण करून घेतले. एवढेच नव्हे तर आगाखान-साहेबांच्या अगोदर डॉ. हिराणी यांना पोहचता यावे म्हणून शासकीय विमानाची वेळ सकाळी ७ ऐवजी ६ वाजता ठरविली. आगाखानसाहेब यवतमाळला नियोजित वेळी उपस्थित झाले. आणि त्यांच्या स्वागतासाठी स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या सोबत डॉ. हिराणी यांना पाहून आगाखानसाहेब अचंबित झाले. आणि म्हणाले, "How you are reach earlier than me" डॉ. हिराणी म्हणाले, ''नाईकसाहेबांच्या कृपेमुळे!'' त्यानंतर पुसदच्या भेटीत डॉ. हिराणी यांनी नाईकसाहेबांना विचारले, ''आगाखानसाहेबांच्या मुंबई-पुणे येथील भेटीत मला निमंत्रित करण्याचे तुम्हाला कसे काय सुचले?'' नाईकसाहेब म्हणाले, ''या प्रसंगात पुसदच्या कोणत्या माणसाला सर्वाधिक आनंद होईल? असा मी स्वतःला प्रश्न केला, आणि तुला बोलविण्यासाठी फोन केला झाले!'' विवाह होऊन वसंतराव नाईकसाहेबांच्या जीवनामध्ये आलेल्या वत्सलाबाईंनी (पुसद परिसरात सर्वजण त्यांना काकू म्हणत) त्यांना सावलीसारखी साथ दिली. १८ ऑगस्ट १९७९ रोजी हृदय विकाराने नाईकसाहेबांचे दुःखद निधन झाले. त्यानंतर त्यांच्या मृत्यूपर्यंत (२९ सप्टेंबर २००२) नाईकसाहेबांच्या पश्चात आपली दोन मुले अविनाश आणि निरंजन, दोन पुत्रवधू सौ. नीता व सौ. मीना आणि दोन नाती चि.कु. नंदिनी आणि चि.कु. अंजली (अविनाश नाईक यांच्या सुकन्या) यांच्यावर आणि नाईक परिवारावर त्यांनी उदंड प्रेम केले. त्यांच्या नावातच 'वात्सल्य' होते. वत्सलाबाई हे त्यांचे नावही मोठे अर्थपूर्ण राहिले. नाईकसाहेब प्रेमाने आणि कौतुकाने त्यांना 'वच्छी' म्हणत. दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनादेखील त्यांच्याबद्दल मोठा आदर होता. एकदा काही कामानिमित्ताने आपले सुपुत्र श्री. अविनाश नाईक यांना घेऊन त्यांना भेटण्यासाठी त्या दिल्लीला गेल्यात. आणि तिथे गेल्यानंतर निरोप पाठविला, आपली हातातील कामे टाकून त्यांना भेटावयास श्रीमती इंदिरा

गांधी आल्यात. वत्सलाबाईंनी त्यांना आपल्या येण्याचा हेतू सांगितला. तेव्हा प्रकृती बरी नसताना येण्याचा त्रास कशाला घेतला? फोन करून निरोप दिला असता तरी चालले असते. असे श्रीमती गांधी म्हणाल्या. त्यांच्या प्रकृतीची आस्थेवाईकपणाने त्यांनी चौकशी केली आणि आपल्या नियोजित कार्यक्रमातील थोडा वेळ काढून त्यांनी त्याच्यासोबत घालविला. नाईकसाहेबांचे कर्तबगार पुतणे माजी मुख्यमंत्री कै. सुधाकरराव नाईक यांना वत्सलाबाईंबद्दल विलक्षण आदर होता. वाङ्मयीन प्रेमाचे निरंजन आपल्या जीवनात त्यांनीच आपल्या समर्थ हातांनी लावले आणि तेवत ठेवले. मराठी शुद्धलेखनाची जाण त्यांच्यामुळेच माझ्यात निर्माण झाली. सुसंस्कृतपणा संस्कार त्यांनी माझ्यावर व आम्हां भावंडावर केला. असे ते जाहीरपणे सांगत. त्यांच्या गौरवार्थ सुधाकररावांनी पुसदच्या जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने १९८९ साली कला आणि गृहविज्ञान विद्याशाखा असलेले महिला महाविद्यालय सुरू केले. वत्सलाबाईंच्या वर्धापनदिनी ७ जुलै १९९० रोजी या महिला महाविद्यालयाला 'श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय' हे नामाभिधान देण्याचा शानदार कार्यक्रम संपन्न झाला. गोव्याच्या माजी मुख्यमंत्री श्रीमती शशिकला काकोडकर ह्या या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी होत्या. आपल्या नावाने आणि गौरवार्थ पुसदला महिला महाविद्यालय सुरू झाले याचा त्यांना मोठा आनंद झाला. आणि विनयाने त्या संकोचूनही गेल्यात. प्रस्तुत चरित्र ग्रंथाचे लेखक आणि या महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उत्तम रूद्रवार यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीच्या संदर्भात प्रसंगोपात त्यांना काही पत्रे पाठविलीत. महाविद्यालयाचे मुख्यपत्र असलेले 'वात्सल्य' हे अनियतकालिक त्यांना पाठविले. त्यावेळी स्वत:च्या हस्ताक्षरात त्याला पाठविलेले उत्तर महाविद्यालयाच्या प्रगतीबद्दल व्यक्त केलेले समाधान त्यातून प्रतिबिंबीत होते. एकदा योगायोगाने त्यांच्या वर्धापनदिनी मुंबईत असताना त्यांचे अभीष्टचिंतन करण्यासाठी गुलदस्ता घेऊन ते गेले तेव्हा त्यांना आणि महाविद्यालयाला त्यांनी तोंड भरून आशीर्वाद दिले. जेवायला थांबवून घेतले. लता राजे या लेखिकेने 'कर्तबगार जीवनाची सावली' हे छोटेखानी जीवनचरित्र त्यांच्या जीवनावर लिहिले. त्यांनी सदहू ग्रंथात सांगितलेली एक आठवण मोठी विलक्षण आहे. १९५३-५४ चा काळ असेल. मुख्यमंत्री झाल्यानंतर नाईकसाहेब सपत्नीक नागपूरला आलेत. सायंकाळच्या वेळेला अंबाझरी तलावावर फिरायला गेलेत. अंधार पडल्यानंतर एक स्त्री आत्महत्या करण्याच्या हेतुने तलावाकडे जाताना त्यांना दिसली. दोघांनीही धावत जाऊन तिला थांबविले.

आत्महत्येपासून तिला परावृत्त केले. तिला उपद्रव देणाऱ्या समाजकंटकाला ताकीद दिली. आज त्या विधवाबाईचा मुलगा चांगला शिकून प्रतिष्ठेचे जीवन जगत आहे. ८५ वर्षाचे दीर्घायुष्य वत्सलाबाईंना लाभले. २९ सप्टेंबर २००२ रोजी वृद्धापकाळामुळे मुंबई येथे त्यांच्या राहत्या घरी त्यांचे दु:खद निधन झाले. आज ते कृतार्थ जीवन काळाच्या पडद्याआड गेले आहे. ३ सप्टेंबर १९६० रोजी वसंतरावजींचे वडील फुलसिंग चतुरसिंग नाईक यांचे देहावसान झाले. त्यावेळी स्वत: नाईकसाहेब आणि त्यांचे वडीलबंधू कै. राजुसिंग ऊर्फ बाबासाहेब नाईक हे दोघेही मुंबईला होते. अग्निसंस्काराच्या वेळेस परिस्थितीविवश त्यांना उपस्थित राहणे शक्य झाले नाही. त्यावेळी वसंतराव नाईकांचे निकटचे सहकारी असलेले कै. देवराव पाटील चोंढीकर यांनी फुलसिंग नाईक यांच्या पार्थिवाला अग्नी दिला. फुलसिंग नाईक यांना लोक 'बापू' म्हणत. फुलसिंग बापूंच्या अंतिम इच्छेला मूर्तरूप देण्यासाठी कै. देवराव पाटील (चोंढीकर) कै. श्रीराम अप्पाजी आसेगांवकर, कै. जेठमलजी माहेश्वरी, कै. गुणवंतरावजी देशमुख, श्री. विठ्ठलराव देशमुख (सवनेकर) श्री. गोविंदराव पाटील, कै. शेषराव पाटील आदी नाईकसाहेबांच्या निकटच्या शिक्षणप्रेमी सहकाऱ्यांनी जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. फुलसिंग बापूंचा देह अग्निकाष्ठ भक्षण करीत असताना त्यांच्या पार्थिवाला साक्षी ठेवून एखाद्या शिक्षण संस्थेची स्थापना होण्याची घटना शिक्षण क्षेत्रात अभूतपूर्व म्हटली पाहिजे. पुढे याच शिक्षण संस्थेच्या माध्यमातून जून १९६१ मध्ये कला आणि वाणिज्य विद्याशाखा असलेले महाविद्यालय पुसद येथे सुरू करण्यात आले आणि त्याला फुलसिंग बापुंच्या स्मरणार्थ 'फुलसिंग नाईक महाविद्यालय' असे नामाभिधान प्राप्त झाले. आज जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यमाने पुसद शहरात कला-वाणिज्य शाखांबरोबरच विज्ञान, गृहविज्ञान, औषधी निर्माण, अभियांत्रिकी, शारीरिक शिक्षण आणि तंत्रशिक्षण या विद्याशाखांची स्वतंत्र अशी सहा महाविद्यालये कार्यरत आहेत. शिवाय ग्रामीण भागात विद्यालये, वसतिगृहे स्थापन करण्यात आली आहेत. ज्ञानगंगा झिरपत झिरपत झोपडीत, वाडी-तांड्यात पोहोचली पाहिजे. या तळमळीतून संस्थेने केलेले हे कार्य शिक्षणक्षेत्रात नोंद करण्यासारखेच आहे. गवताचा भारा डोक्यावर घेऊन जाणाऱ्या किंवा एखाद्या पशुलाही ज्याचा भार पेलवणार नाही अशा मोळी विकणाऱ्या ग्रामीण मजुराचा मुलगा उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये ही या पाठीमागे असलेली तळमळ मोठी आहे. जनता शिक्षण प्रसारक मंडळ हे आज

अमरावती विद्यापीठीय विश्वात एक मोहरेदार आणि संपन्न व्यक्तिमत्व लाभलेली अग्रेसर अशी शिक्षण संस्था आहे. कै. नाईकसाहेबांनी या संस्थेच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. या महाविद्यालयाच्या जडणघडणीत वसंतरावजींनी कै. डॉ. मा. गो. देशमुखांचा सल्ला घेतला होता. या संस्थेला एक बऱ्यापैकी देणगी नाईकसाहेबांनी स्वत: दिली. 'घार हिंडते आकाशी चित्त तिचे पिलांपाशी' या उक्तीप्रमाणे त्यांनी या संस्थेची सदैव काळजी घेतली. या संस्थेचे आरंभीचे अध्यक्ष होते त्यांचे निकटचे सहकारी कै. जेठमलजी माहेश्वरी, कै. आबासाहेब पल्लेवार आणि त्यांचा संजीवक सहवास लाभलेले माजीमंत्री डॉ. एन. पी. हिराणी. डॉ. हिराणी यांच्या प्रदीर्घ कार्यकाळांत संस्थेने प्रगतीची खूपच घोडदौड केली. आणि या कृतज्ञतेपोटी संस्थेने पुसद येथील तंत्रनिकेतनला 'डॉ. एन. पी. हिराणी' यांचे नांव दिले. संस्थेचे संस्थापक सचिव होते नाईकसाहेबांचे कर्तबगार पुतणे कै. सुधाकरराव नाईक. त्यांनी फुलसिंग नाईक महाविद्यालयाच्या उभारणीसाठी अपार कष्ट केले. पाच रुपयांपासून लोकवर्गणी गोळा केली. सर्वसामान्य जनतेच्या कष्टाच्या घामातून इमारतीच्या विटा भिजवून बांधकाम केले. सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत कै. प्रभाकर उपाख्य नानासाहेब उर्ध्वरेषे. हे फुलसिंग नाईक महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य होते. नाईकसाहेबांनी मुद्दाम त्यांना मुंबईला पाचारण करून मुंबईतील विख्यात महाविद्यालये त्यांना दाखविलीत. तेथील संस्थाचालक आणि प्राचार्यांच्या भेटी घडवून आणल्यात आणि त्यामुळे एक दृष्टी लाभून भक्कम पायावर फुलसिंग नाईक महाविद्यालयाची पायाभरणी झाली. आज या महाविद्यालयात तीन हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आहेत. नाईकसाहेबांचे नातू आणि सुधाकररावांचे सुपुत्र जय नाईक. तर दीर्घ काळापासून सचिव आहेत नाईकसाहेबांचे पुतणे आणि सुधाकररावांचे धाकटे बंधू मनोहरराव नाईक. दोघेही काका-पुतणे संस्थेची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. वसंतरावांचे वडीलबंधू बाबासाहेब नाईक यांचे नाव अभियांत्रिकी महाविद्यालयाला तर नाईकसाहेबांच्या धर्मपत्नी श्रीमती वत्सलाबाई नाईक यांच्या गौरवार्थ पुसद येथे महिला महाविद्यालय सुमारे चौदा वर्षापूर्वी स्थापन करण्यात आले. तेथील औषधी निर्माण संस्थेला सुधाकरराव नाईक यांचे नाव देण्यात आले. पु. ल. देशपांडे एकदा म्हणाले होते, 'जगात सर्वात सुंदर काही असेल तर ती 'कृतज्ञता' आणि ही नामकरणे या कृतज्ञतेच्याच पोटी देण्यात आलीत.

## शिकारी वसंतराव नाईक

वसंतराव नाईक यांच्या विलोभनीय गुण वैशिष्ट्यांपैकी त्यांना असलेला शिकारीचा छंद हे एक वैशिष्ट्य. त्यांनी जोपासलेला शिकारीची छंद याबद्दल अनेकांना मोठे कुतूहलपूर्ण असे आश्चर्य व आकर्षण होते. नाईकसाहेबांना हा छंद कसा लागला या संदर्भात मागोवा घेतला असता त्या संबंधातील माहिती कळू शकते. गहुली हे त्यांचे जन्मगांव. डोंगर कपारीत आणि घनदाट अशा जंगलांनी वेढलेले होते. त्या निबिड अरण्यात अनेक हिंस्त्र श्वापदांचा वास होता. भोवतालच्या परिसराला या श्वापदांचा मोठा उपद्रव होत असे. त्या वेळेच्या अनेक सधन कास्तकारांकडे या उपद्रवापासून संरक्षण मिळावे म्हणून बंदुकीचा परवाना प्राप्त झालेला होता. त्यातील अनेक शेतकरी शिकार करीत असत. त्या वेळचे ब्रिटिश सरकारकडून शिकारीची मुभाही होती. तत्कालिन अनेक इंग्रज सनदी अधिकारी देखील शिकार करीत असत. नाईकसाहेब स्वत: सधन शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांच्याकडे बंदुकीचा परवाना होता. नाईकसाहेबांचे मित्र आणि राजकारणातील सहकारी असलेले बाबासाहेब मुखरे यांनाही शिकारीची आवड होती. कदाचित या आवडीतूनच उभयतांची मैत्री झाली असावी. नाईकसाहेबांनी या छंदाची जोपासना करीत असताना कटाक्षाने ससे, हरीण यांसारख्या निरुपद्रवी अशा निष्पाप मुक्या जनावरांची शिकार केली नाही. त्यांनी शिकार केली ती रानच्या राजाची, वाघाची. त्यात बिबट्या, चित्ता (पँथर), पट्टेदार वाघ (टायगर) अशा क्रूर आणि नरभक्षक वाघांची शिकार केली. पुसद येथील त्यांच्या प्रसिद्ध बंगल्यातील प्रशस्त अशा दिवाणखान्यात नाईकसाहेबांनी शिकार केलेल्या दोन वाघांची व्याघ्रचर्म भिंतीवर त्यांच्या मुंडक्यांसह टांगलेले आहेत आणि या दोन व्याघ्रचर्मांच्यामध्ये त्यांनीच शिकार केलेल्या रान रेड्याचे (बायसन) मुंडके लटकवलेले आहे. या व्याघ्रचर्मामुळे आणि मुंडक्यांमुळे बंगल्यातील दिवाणखाना त्यांच्या छंदावर प्रकाश टाकतो आणि आपला भारदस्तपणा जोपासतो. शिकारीच्या निमित्ताने नाईकसाहेब अमरावती जिल्ह्यातील धारणी, मेळघाट, चिखलदरा या भागात अनेकदा गेले. त्यामुळे त्या भागातील रस्त्यांचे डांबरीकरण, मजबुतीकरण अनायसे होऊन गेले. त्या ठिकाणी नाईकसाहेबांचा एक सुंदर पुतळादेखील उभारण्यात आला असून हा सगळा परिसर आदिवासी बहुल असा आहे. धारणी येथे स्थापन करण्यात आलेल्या कला-वाणिज्य महाविद्यालयाला नाईकसाहेबांचे

नामाभिधान देखील देण्यात आलेले आहे. आजही हा परिसर अतिशय घनदाट आणि निबिड आहे.

नाईकसाहेबांच्या या छंदाची एक आठवण अतिशय उद्‌बोधक आहे. नेपाळ नरेश राजे वीरेंद्र एकदा आपल्या पत्नीसमवेत भारत भेटीवर आलेले असताना त्यांनी मुंबईला भेट दिली असता नाईकसाहेब राजे वीरेंद्र यांना घेऊन चंद्रपूरच्या ताडोबा जंगलात गेले व तेथील अभयारण्य मोठ्या आवडीने त्यांना दाखविले. मचानावर बसून वाघाची प्रतीक्षा करण्याची मौज त्यांनी अनुभवली.

या शिकारीच्या छंदातून अचूक निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्या ठिकाणी निर्माण झाली. राजकारणाच्या धकाधकीत अनेक गुंतागुंतीच्या क्लिष्ट समस्या असतात. तातडीने योग्य निर्णय घेतला नाही तर गुंतागुंत वाढत जाऊन जनतेचा क्षोभ होण्याची शक्यता असते. तथापि या शिकारीच्या छंदामुळे नाईकसाहेबांच्या ठिकाणी योग्य त्या वेळी योग्य निर्णय घेण्याचे कसब निर्माण झाले होते. शिकार करून आल्यानंतर आपल्या उघड्या जीपच्या बॉनेटवर ते जनावर टाकून नाईकसाहेब पुसदला आले की त्या जीपला गराडा घालून लोक ते जनावर पाहण्यासाठी मोठी गर्दी करत असत. तो प्रसंग मोठा रोमहर्षक असे.

यवतमाळचे श्री. दयाशंकर त्रिवेदी हे देखील शिकारीची आवड असणाऱ्या नाईकसाहेबांचे मित्र होते.

माहुरचे राजे मधुकरराव देशमुख, पुसदचे गोधाजीराव मुखरे, यवतमाळचे त्रिवेदी आणि नाईकसाहेब यांनी केलेल्या शिकारीच्या कथा लोक मोठ्या चवीने सांगत असत. 'युद्धस्य कथा रम्या:' असे जे म्हणतात तसेच शिकारीच्या कथेबद्दलही म्हणता येईल. या सगळ्या शिकारकथा मोठ्या रंगतदार आणि श्रवणीय आहेत. त्यावर आधारित काही कथादेखील प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या मोठ्या वाचनीय आहेत.

## काँग्रेसचे निष्ठावान पाईक

९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या क्रांती मैदानावर आवर्जून उपस्थित असलेल्या नाईकसाहेबांनी गांधीजींच्या विचाराने प्रभावित होऊन काँग्रेस पक्षाची दीक्षा घेतली. आणि मृत्यूपर्यंत काँग्रेसची साथ कधी सोडली नाही. काँग्रेस दुभंगली. इंदिरा काँग्रेस आणि स्वर्णसिंग काँग्रेस अशी तिची दोन शकले झालीत. त्याही काळात आपले ज्येष्ठ मित्र आणि मार्गदर्शक यशवंतराव चव्हाण यांच्या समवेत ते

स्वर्णसिंग काँग्रेसमध्ये राहिलेत. ''ज्या काँग्रेसने मला इतके मोठे केले तिला आयुष्याच्या सायंकाळी दगा देण्याची माझी इच्छा नाही'' अशा त्यांच्या भावपूर्ण उद्‌गारातून त्यांची काँग्रेसवरील निष्ठा व्यक्त होते. दोन्ही काँग्रेसमधील मतभेदाची दरी कमी करण्यासाठी त्यांनी शर्थीचे प्रयत्न केले. दुर्दैवाने त्या प्रयत्नांना यश आले नाही. तरीही त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे मोल कमी नाही. मुख्यमंत्रीपदाची सूत्रे खाली ठेवल्यानंतर कोणाबद्दल ही आकस न बाळगता, मनात कटूता न ठेवता एका निष्ठावान सैनिकाप्रमाणे शेवटपर्यंत ते काँग्रेसपक्षाची साथ करीत राहिलेत. त्यांच्या अव्यभिचारी काँग्रेस निष्ठेचे उदाहरण नेहमी सांगितले जाते. १९५२ साली पहिली सार्वत्रिक निवडणूक यवतमाळ जिल्हा काँग्रेस समितीने आणि विदर्भ प्रांतिक काँग्रेस समितीने वसंतराव नाईक यांच्या नावाची पुसद विधानसभा मतदार संघात एकमताने शिफारस केली. तथापि दिल्लीहून ॲड. अण्णासाहेब महाजन यांच्या नावाची शिफारस झाली. कार्यकर्त्यांचा मोठा विरस झाला. आणि कार्यकर्त्यांच्या, सहकारी मित्रांच्या आग्रहाखातर ते दिल्लीला जाऊन लालबहादूर शास्त्री यांना भेटले. शास्त्रीजींनी त्यांना विचारले. ''तुम्हाला उमेदवारी दिली नाही तर तुमची भूमिका काय राहील.'' नाईकसाहेबांनी उत्तर दिले, ''काँग्रेस पक्षाचा कोणताही उमेदवार असला तरी त्याला माझा पाठींबा राहील.'' यानंतर शास्त्रीजींनी नाईकसाहेबांना एक बंद पाकीट दिले. आणि म्हणाले, ''पक्षाचा अंतिम निर्णय या पाकिटात बंदिस्त आहे, हे पाकीट असेच्या असे प्रांतिक अध्यक्षांना द्या.'' त्या बंद लखोट्यात पुसद विधानसभा मतदार संघाचे तिकीट नाईकसाहेबांना दिल्याचा आदेश होता. अशी होती नाईकसाहेबांची काँग्रेस पक्षावरची निष्ठा. पुसद येथील प्रा. पुंडरिक धुमाळे यांनी आपल्या एका लेखात ही आठवण मुद्दाम सांगितली आहे. मात्र येथील कै. बाबासाहेब मुखरे यांच्या पुतळा अनावरण प्रसंगाच्यानिमित्ताने दि. ३ डिसेंबर २००३ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या 'ऋणानुबंध' या स्मरणिकेतील ॲड. आप्पाराव मैंद यांच्या लेखात स्वत: बाबासाहेब मुखरे यांनी दिल्ली येथे जाऊन नाईकसाहेबांचा उमेदवारी अर्ज सादर केला व त्यांना उमेदवारी देण्यात यावी अशी शिफारस केली असे म्हटले आहे.

## महानिर्वाण

१९७९ च्या ऑगस्ट महिन्यात विश्रांतीसाठी नाईकसाहेब सपत्नीक सिंगापूरला गेले होते. सिंगापूरच्या हॉटेल ओबेरॉयमध्ये ते थांबले होते. तिथेच दि. १८ ऑगस्ट

रोजी उद्वाहनात (लिफ्ट) हृदयविकाराचा त्यांना तीव्र झटका आला. आणि तिथेच ते कोसळले. हॉटेलातील खोलीमध्ये प्रवेश करेपर्यंत वैद्यकीय उपचारापूर्वीच त्यांचा प्राणपक्षी उडून गेला होता. त्यावेळी त्यांच्या हातात तजेलदार निंबू फळाचे रोप होते. १९ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता त्यांचा पार्थिव देह पुसदला येणार होता.आणि तिथून अंत्यसंस्कारासाठी गहुलीला जाणार होता. नाईकसाहेबांच्या अंत्यदर्शनासाठी सकाळपासूनच नाईकबंगल्यावर जनसागर लोटला होता. सगळे शोकमग्न होते. पुसद परिसर शोकसागरामध्ये बुडून गेला होता. सुमारे सत्तर हजार लोकांनी अंत्यदर्शनासाठी अलोट गर्दी केली होती. त्यात सर्वच स्तरातील माणसे होती. बंजारा समाजाचे तर ते दैवतच होते. स्वाभाविकपणानेच या गर्दीमध्ये बंजारा समाजबांधव शोकविव्हल अंतःकरणाने मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. गहुलीला अंत्यसंस्काराच्या वेळी सुमारे पंचवीस हजारावर माणसे उपस्थित झाली होती. वाहनाची रांगच तीन किलोमीटरपेक्षा अधिक लांब होती. भारतीय संस्कृतीने मृत्यूलाही सोहळा म्हटले आहे. कारण मृत्युमुळेच माणसांची परमेश्वराशी भेट होते. आणि परमेश्वराच्या भेटीला जाणारा जो माणूस असतो त्याचे महानिर्वाण हा एक अनुपम सोहळाच आहे. अशी भारतीय जनमानसाची श्रद्धा आहे. ''ज्याची अंत्ययात्रा मोठी तो माणूस मोठा' असे मानतात. हजारो नागरिकांनी साश्रू नयनांनी नाईकसाहेबांचे अंत्यदर्शन घेतले. प्रा. बाबुराव जगताप यांनी या शोकविव्हल प्रसंगाचे मोठे भावव्याकुळतेने वर्णन केले आहे.

हुंदके फेट्यात बांधलेले
हुंदके साड्यात सांडलेले
हुंदके घुंगरात घुसमटलेले
हुंदके अनवाणी
हुंदके फाटलेले
हुंदके गाड्यात भरलेले

गहुलीच्या पहाडात जन्मलेला हा युगपुरुष आता पुसदपासून पुन्हा पहाडात चिरनिद्रा घेण्यासाठी निघालेला. रस्त्या-रस्त्यात गावं गजबजून गेलेली, नजरेच्या पाकळ्या उधळीत असलेले. गदगदून आलेल्या गळ्यात घोष, 'नाईकसाहेब अमर रहे!' नाईकसाहेब...... 'गहुलीचे पहाड पाझरून गेलेले.'

नाईकसाहेबांच्या राजकीय आणि एकूणच जीवनचरित्राचे साक्षेपी समीक्षक मूल्यमापन करताना म्हणतात, ''आकाश आणि पृथ्वी, पाऊस आणि माती यांचा

स्वाभाविक संबंध जाणून घेणारे भूमिपुत्र.'' महाराष्ट्राच्या सर्व भूमीचा सर्व कणखरपणा आणि चिवटपणा आत्मसात करणारे माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांची कारकीर्द म्हणूनच संस्मरणीय राहील. प्रदीर्घकाळ राजकीय सत्ता उपभोगण्याचा आणि जनतेच्या मनावर अधिराज्य गाजविण्याचा अपूर्व राजयोग, लोकयोगही त्यांच्या कुंडलीमध्ये अधोरेखित केलेला होता. वर्षाकाळाशी, पावसाच्या हंगामाशी, भूमीशी आणि एकूणच सर्व निसर्गकाळांशी एकरूप होण्याचा नियतीचा संकेत त्यांना लाभला होता, आणि त्या संकेताशी ते आयुष्यभर इमान बाळगून होते. दुर्मिळ गुणांच्या संचितांवर त्यांनी गहुली-पुसदसारख्या एकेकाळच्या मागास भागातून मुंबईसारख्या अतिप्रगत महानगरीमध्ये येऊन, तिथे राजकारण केले. समर्थ नेतृत्व, विचारशील कृती व व्यवहारी दृष्टिकोन हे नाईकसाहेबांच्या एकूण कारकिर्दीची वैशिष्ट्ये होती. स्वातंत्र्यपूर्वकाळात लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्याची पंढरी' या शब्दात पुसद शहराचा यथोचित गौरव केलेला होता. नाईकसाहेबांच्या कर्तृत्वातून फुललेल्या अनेक संस्था आज येथे कार्यरत आहेत. 'विद्यानगरी', 'आरोग्यनगरी' आणि 'उद्योगनगरी' असा या नगरीचा होणारा गौरवपर उल्लेख नाईकसाहेबांनी पुसद परिसरासाठी केलेल्या महनीय कार्याची पावती आहे. या परिसराचा अक्षरशः कायापालटच झालेला आहे. नाईकसाहेबांच्या विचाराच्या प्रकाशात कृतीची पावलं टाकणारा हा परिसर कृतज्ञतेपोटी असेच म्हणेल.

**''तव स्मृतीला नकोत मुजरे नकोत माळा तुरे। आठवणीची तव एक जाग हृदयामधील पुरे ।।''**

नाईकसाहेबांची स्मृती जिवंत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या कार्यापासून प्रेरणा प्राप्त व्हावी म्हणून मुंबई येथे वसंतराव नाईक कृषी संशोधन आणि ग्रामीण विकास प्रतिष्ठान ही पंजीईत संस्था निर्माण झाली असून शेती, शेतकरी आणि शेती उद्योग यातील मानकऱ्यांना त्यांच्या जयंतीच्या दिवशी (१ जुलै) पुरस्कार प्रदान करीत असते. नाईकसाहेबांचे सुपुत्र श्री. अविनाश नाईक हे या प्रतिष्ठानचे अध्यक्ष आहेत.

पुसद येथे वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान, त्यांच्या स्मृतिदिनी (१८ ऑगस्ट) भूमिपुत्रांना शाल-श्रीफळ आणि मानचिन्ह देऊन दरवर्षी मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना मानाचा मुजरा करीत असते. शेतकऱ्यांसाठी शैक्षणिक सहल, कृषिप्रदर्शनी, पशुधन मेळावे आदी कार्यक्रमांचे आयोजनही प्रतिष्ठानने सातत्याने केले आहे. ५ डिसेंबर या त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या शपथ ग्रहण कार्यक्रमदिनाचे

औचित्य साधून अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या विद्यमाने राष्ट्रीय पातळीवर कृषिविषयक एका परिसंवादाचे आयोजन करण्यात येत असते. ॲड. जी. के. सोनी हे पुसद येथील प्रतिष्ठानचे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र शासन नाईकसाहेबांच्या कृतज्ञतेपोटी त्यांची जयंती 'कृषिदिन' म्हणून साजरी करते. श्रद्धायुक्त अंत:करणाने नाईकसाहेबांना वाहिलेली ही श्रद्धांजलीच आहे.

**आहे तो मनातला अढळ आदर।**
**पुतळा असो की प्रतिमा।**
**तोच सर्वांना अटळ जागर ।।**

समाज पुरुषाशी एकरुप झालेल्या नाईक परिवाराची थोर परंपरा चवथ्या पिढीचे प्रतिनिधी ॲड. निलय नाईक सांप्रत समर्थपणे चालवित आहेत.

☆

## परिशिष्ट-१

## वसंतराव नाईक : संक्षिप्त जीवनालेख

| | |
|---|---|
| १ जुलै १९१३ | : यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुली येथे बंजारा जमातीच्या सधन शेतकरी कुटुंबात जन्म. |
| १९३३ | : नागपूर येथील नीलसिटी हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण. |
| १९३७ | : मॉरिस कॉलेज (सध्याचे वसंतराव नाईक सामाजिक विज्ञान संस्था) नागपूर येथून बी.ए.ची पदवी प्राप्त. |
| १९४० | : नागपूर विद्यापीठ विधी महाविद्यालय नागपूर येथून एल.एल.बी. पदवी उत्तीर्ण. |
| १९४१ | : प्रारंभी अमरावतीचे प्रख्यात वकील कै. बॅ. पंजाबराव देशमुख ह्यांच्या बरोबर व नंतर पुसद येथे स्वतंत्रपणे वकिली व्यवसाय प्रारंभ. समाज शिक्षणाद्वारे ग्राम सुधारणा करण्याच्या कार्यात रस घेण्यास प्रारंभ. समाज शिक्षणा-बाबतच्या उल्लेखनीय कार्याबद्दल प्रशस्ती प्रमाणपत्र मिळाले. पुसद तालुक्यातील आदर्श ग्राम चळवळीत पुढाकार. त्यांच्या प्रयत्नांमुळे व तळमळीमुळे त्यांचे स्वतःचे गाव 'गहुली' हे नमुनेदार बनले. |
| ६ जुलै, १९४१ | : नागपूर येथील प्रतिष्ठित ब्राह्मण घराण्यातील कु. वत्सला घाटे, बी.ए. यांच्याशी विवाह. |
| ९ ऑगस्ट १९४२ | : ऑगस्टमध्ये मुंबईला भरलेल्या अ. भा. काँग्रेस समितीच्या बैठकीला आवर्जून उपस्थित. म. गांधीच्या विचाराने विलक्षण प्रभावित. |
| १९४३ | : पुसद तालुका काँग्रेस समितीचे अध्यक्ष, १९५० पर्यंत या पदावर कार्यरत. |
| ९ ऑक्टोबर १९४६ | : पुसद नगर पालिकेचे अध्यक्ष म्हणून निवड, जुन्या मध्यप्रदेश राज्यात उपमंत्री म्हणून १९५२ मध्ये नियुक्ती होईपर्यंत याच पदावर होते. पुसद कृषी संघटनेचे अध्यक्ष. |

१९५० : पुसद हरिजन मोफत वसतिगृहाचे व दिग्रस येथील राष्ट्रीय मोफत छात्रालयाचे अध्यक्ष.

१९५१ : विदर्भ प्रदेश काँग्रेस समितीचे व तिच्या कार्यकारिणीचे सदस्य.

१९५२ : पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत मध्यप्रदेश मंत्रिमंडळात राजस्व खात्याचे उपमंत्री म्हणून नियुक्ती. ह्याच काळात मध्यप्रदेश गृहनिर्माण मंडळाचे अध्यक्षपद भूषविले. तसेच मध्यप्रदेश भू-सुधारक समितीचे उपाध्यक्ष व मध्यप्रदेश सरकारच्या मेट्रिक समितीचे अध्यक्ष.

१९५६ : राज्य पुनर्रचनेनंतर जुन्या द्विभाषिकातील कै. यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्वाखाली मंत्रिमंडळात सहकार, कृषी व दुग्ध वसाहत खात्याचे मंत्री म्हणून नियुक्ती. अ. भा. काँग्रेसचे तसेच महाराष्ट्र विभागीय काँग्रेस समितीचे व तिच्या कार्यकारिणीचे तेव्हापासूनचे सदस्य.

१९५७ : सार्वत्रिक निवडणुकीत द्विभाषिकाच्या विधी मंडळावर पुसद मतदार संघातून दुसऱ्यांदा निवड; मंत्रीमंडळात कृषिमंत्री म्हणून नियुक्ती. इंडिया कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल फायनान्स सोसायटीचे सभासद म्हणून निवड.

१९५८ : जपानला गेलेल्या आंतरराष्ट्रीय राईस कमीशनच्या भारतीय शिष्टमंडळात समावेश. व जपानला भेट, टोकियो येथे एफ.ए.ओ.च्या बैठकीला उपस्थित.

१९५९ : चीन सरकारच्या शेतकी संघटनेच्या निमंत्रणावरून सौ. वत्सलाबाईंसमवेत चीनला भेट. महाराष्ट्राचे कृषीमंत्री असताना त्यांच्या प्रयत्नाने यवतमाळ जिल्ह्यातून एक लाख सदतीस हजार एकर जमीन भू-दानात प्राप्त. या कार्यक्रमासाठी यवतमाळ येथील संस्मरणीय कार्यक्रमात तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु मुद्दाम उपस्थित होते.

१९६० : महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर राज्याच्या पहिल्या मंत्रिमंडळात महसूल मंत्री म्हणून नियुक्ती. (१ मे १९६० ते ४ डिसेंबर १९६३) ह्यावेळी शासनाने महत्त्वपूर्ण असा कमाल जमीन धारणा क्षेत्रासंबंधीचा कायदा संमत केला.

| | |
|---|---|
| ३ सप्टेंबर १९६० | : वडील फुलसिंग चतुरसिंग नाईक यांचे निधन. राजस्वमंत्री या नात्याने लोकशाही विकेंद्रीकरण समितीचे अध्यक्ष. महाराष्ट्रात पंचायत राज्याची मुहूर्तमेढ रोवली. |
| १९६२ | : सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्र विधानसभेवर पुसद विधानसभा मतदार संघातून तिसऱ्यांदा निवड. राजस्वमंत्री म्हणून नियुक्ती. |
| ५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५ | : पर्यंत आपल्या अकरा वर्षांच्या अखंड कारकिर्दीत महाराष्ट्राला स्थिर प्रशासन दिले. |
| १९६४ | : युगोस्लाव्हीयाचा दौरा आटोपून परत. दारुबंदीचे नवे धोरण जाहीर केले. |
| १९६५ | : पाकिस्तानने भारतावर स्वारी केली. त्यावेळी नाईकसाहेबांनी केंद्राला सर्वाधिक सहाय्य देऊन महाराष्ट्राची मान उंचावली. |
| १९७२ | : महाराष्ट्रात पडलेल्या अभूतपूर्व दुष्काळ प्रसंगी रोजगार हमी योजनेंतर्गत दररोज पन्नास लाख लोकांना काम देऊन एक किमयाच केली. |
| २० फेब्रुवारी १९७५ | : श्रेष्ठींचा निर्णय शिरोधार्य मानून मनात कुठलीही कटुता न ठेवता धीरोदात्त वृत्तीने मुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून मुक्त. काँग्रेसचे एक निष्ठावंत सैनिक म्हणून अखेरपर्यंत कार्यरत. |
| १९७७ | : वाशीम लोकसभा निर्वाचन क्षेत्रातून लोकसभेवर निर्वाचित. |
| २६ जून १९७९ | : पितृतुल्य ज्येष्ठ बंधू राजुसिंग उर्फ बाबासाहेब नाईक यांचे दु:खद निधन. |
| १८ ऑगस्ट १९७९ | : सिंगापूर येथे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने वयाच्या ६६ व्या वर्षी दु:खद निधन. महाराष्ट्रात भूकंपाच्या वेळी उध्वस्त झालेल्या भागाचे पुनर्वसन, १९६५ व १९७१ च्या दोन्ही युद्ध काळात प्रशंसनीय कामगिरी, भात व ज्वारी खरेदी योजना, एकाधिकार कापूस खरेदी, नवीन मुंबई आदी धडाडीच्या योजना कार्यान्वित केल्यात. १९७८ साली पुन्हा दुभंगलेल्या काँग्रेस पक्षाच्या ऐक्यासाठी अविरत प्रयत्न. मुख्यमंत्रीपदाचा काटेरी मुकुट लीलया सांभाळून महाराष्ट्राच्या अभ्युदयाची पायाभरणी. |

# परिशिष्ट-२

## संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १. महाराष्ट्राचे वसंत वैभव- संपादक प्रथमावृत्ती- १८ ऑगस्ट १९९२ | प्रा. डॉ. उत्तम रुद्रवार/ प्रा. पुंडरिक धुमाळे | प्रकाशक: डॉ. एन. पी. हिराणी अध्यक्ष, जनता शिक्षण प्रसारक मंडळ, पुसद, जि. यवतमाळ. |
| २. हिरवी क्षितीजे प्रकाशन-१९७३ | संपादक राजाराम राठोड प्राचार्य, वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद. | वसंत प्रकाशन, औरंगाबाद. |
| ३. वर्षा प्रकाशन- १८ ऑगस्ट १९८० | संपादक राजाराम राठोड प्राचार्य, वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद. | |
| ४. वसंतराव नाईकांचे जीवनचरित्र. | संपादक-रामबिहारीसिंह बयास | ..... |
| ५. आवाहन प्रकाशन-१९७१ | लेखन-वसंतराव नाईक | प्रकाशक-दिनेश नागेश देसाई पारिजात प्रकाशन, मुंबई. |
| ६. कर्तबगार जीवनाची सावली: वत्सलाबाई नाईक | लेखिका-लता राजे | ............... |

७. वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान पुसद व वसंतराव नाईक कृषी संशोधन आणि ग्रामीण विकास प्रतिष्ठान मुंबई यांच्या नाईकसाहेबांच्या पुण्यतिथी व जयंतीप्रित्यर्थ प्रसिद्ध झालेल्या सर्व स्मरणिका.